तः पुरंतु दरुनी स्याहुर्यवनभाषया ॥ १ ॥ युवराजापरीज्ञेयो
२ ॥ अमात्यस्या न्मुजुंदारः सेनाकर्ता हुकूमतः ॥ प्रवीणास्तुद
यायाधीशोप्यदालतः ॥ कार्मुकी तुसु मंत्रस्यात्सभासत्स्या
ल इतितुप्रो । क्तः कार्यस्छानाधिकारिकः ॥ ५ ॥ संदेशलेख
कार्येपूरुषः ॥ ६ ॥ सबनीसस्तथा सेनालेखकः परिकीर्ति
तालीको गुरुः पीर इतीरितः ॥ शिष्यो मुहेरी नामास्यात्सिधो
माः ॥ अतशानामाभवेदग्नि वायुर्बाब इतीरितः ॥ ९ ॥ जल
द्विजली विद्युदुच्यते ॥ १० ॥ दुर्दिनंस्याद्बूदह्वामेहु पर्जन्य ॥ १ ॥
फकीर इत्युक्तः काजी पंडितनामकः ॥ मुल्लाभट्टः परिज्ञे
कमान् ॥ स्यादंतर्द्वारपालस्तु हरंबंकी प्रकीर्तितः ॥ १३ ॥

राजकोश

कारीतिनिगद्यते ॥ १४ ॥ हुजूरीस्यात्संनिहितो नुचरस्तु
रकः सेवकः प्रोक्तो नफरः किंकरस्मृतः ॥ वेगल्वारो वेगचारी
दउच्यते ॥ वार्ताहरो बखेदारः परिचर्या तु खिज्मतिः ॥ १७ ॥
इत्यनुवर्ण्यते ॥ १८ ॥ कलाचीपारकः पीकदानीबादोर
छत्राचामरधरश्चौरीबादार उच्यते ॥ नर्कशबादार इ
पालकः ॥ पताकाधर इत्येव विज्ञेयश्च निशानदारः ॥ २१ ॥
जीदीपधरास्तु ने ॥ २२ ॥ दिवद्याखु स्युः हकालीतु प्रदी
॥ यस्तु नरख़ह वाहल्दारः सासिंहासनपालकः ॥ च
फर्जेदादास चंडप्रचंडकाः ॥ नेजदारः कुंतधरः तरवृतासि
। दोलानाम तुदोल्हारा तस्तगंडूषपात्रकं ॥ २५ ॥ पीकदानी

राजकोश

(शिवकालीन उर्दू–मराठी राज्यव्यवहार कोश)

संपादक

अश्विनीकुमार दत्तात्रेय मराठे

प्रस्तावना

सेतुमाधवराव पगडी

ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ

वितरक

इंडियन एज्युकेशन सोसायटीज

गर्ल्स हायस्कूल, नं. १

वाबरेकर मार्ग, दादर (प.)

मुंबई ४०० ०२८

प्रकाशक
सौ. सूर्या अ. मराठे
६ मंजुषा, विकास हाउसिंग सोसायटी
शास्त्रीनगर, डोंबिवली (प.)
जि. ठाणे. ४२१ २०२

प्रथमावृत्ती
१२–२–१९८६

मुद्रक
वि. उ. गांगल
युनिप्रिंट,
आग्रा रोड, कल्याण

स्क्रीन प्रिंटिंग व छायाचित्रे
सुहास मुकुंद साने
विश्वास म. देशपांडे
स्टुडिओ ग्राफिअर्स
सुहन, ४०८ यशवंतनगर
तळेगाव स्टेशन, (पुणे)
('ग्रंथाली' अभिनव वाचक चळवळ
यांच्याकडून रु. ५०००।– अनुदान)

मूल्य ४५ रुपये

ज्याच्या किनाऱ्यावर बसण्याचे भाग्य मला लाभले त्या–

ज्ञानसागर अच्युत बाळकृष्ण पाध्येगुर्जर

म्हणजेच राजापुरवासीयांच्या अण्णा पाध्ये

यांच्या स्मृतीला अर्पण

— मनोगत —

‘ग्रंथाली’ चे श्री. कुमार केतकर यांनी या पुस्तकाला मी मनोगत लिहावे अशी सूचना केली तेव्हा मला ती पटली नाही. कारण हे ‘मनोगत’ अखेर आत्मचरित्रावर जाते. आणि परिणाम म्हणून आपणच आपला गौरव करून घेणे, आत्मसमर्थन करणे, दुसऱ्या माणसांना (क्वचित शिवराळपणे) दोष देणे हे आत्मचरित्राचे दोष त्यात येतात. मला हे इष्ट वाटले नाही. निदान पहिल्याच पुस्तकात तरी हे नको होते.

– – – – माझे पुस्तक प्रसिद्ध होणार व त्याला ‘ग्रंथाली’ सारख्या संस्थे-कडून अनुदान मिळणार हे कळल्यावर माझ्या सहकारी मित्र-मैत्रिणींनी माझे हार्दिक अभिनंदन केले. पण प्रत्येकजण म्हणे, ‘आमच्या लेव्हलचा विचार करता आम्ही तुमच्या पुस्तकाला हात तरी लावू शकू का? तुमचे पुस्तक म्हणजे काय आमच्या डोक्यावरून जाणार!’ अशा उद्‌गारांचे मला मनोमन वाईट वाटते. किमान दोन पदव्या मिळविणारी माणसे आपली बौद्धिक पातळी आपणच इतकी कमी कां लेखतात? माझा हा ‘राजकोश’ विद्वानांनी आणि संशोधकांनीच केवळ हाती घ्यावा असे मला वाटत नाही. ऐतिहासिक कथा कादंबऱ्या वाचणाऱ्या ‘सामान्य’ वाचकांना व लेखकांनाही तो तितकाच उपयुक्त आहे, असे मला वाटते. किंबहुना हे पुस्तक जो चाळील त्याला त्याच्या आवडीचे काहीतरी यात मिळेल अशा उमेदीने मी कुठून कुठून माहिती गोळा करून यात भरली आहे. कदाचित एखादा ‘सामान्य’ वाचक यातील मला न उलगडलेले कोडे सहज सोडवून दाखवील! – – – –

या पार्श्वभूमीवर मला श्री. कुमार केतकरांचे एक वाक्य आवडले. ‘व्यासंगाची वाचकाला जाण यावी, संवय जडावी’ यासाठी मनोगत लिहावे. विद्वत्ता, व्यासंग याकडे आदराने बघावे; पण गूढता, मूढता, आश्चर्य, भाबडा भक्तिभाव अशा दृष्टींनी मुळीच बघू नये. माझी ही ठाम भूमिका असल्याने मी हे मनोगत लिहायला घेतले आहे.

मी ठाणे येथील मो. ह. विद्यालयात संस्कृत व इंग्रजीचा शिक्षक आहे. एकदा मी रिकाम्या तासाला (रिकामाच) बसलो असताना माझे सहकारी डॉ. अरुण जोशी आपल्या नेहमींच्या प्रसन्न व सुहास्य मुद्रेने माझ्या जवळ आले. त्यांनी मला ‘राजव्यवहारकोश’ हे पुस्तक माझ्या ‘संस्कृत व

संस्कृतीच्या प्रेमाबद्दल ' सप्रेम भेट दिले. मी ते माझ्या संवयीप्रमाणे अगदी अक्षरान् अक्षर वाचून काढले. त्या पुस्तकाच्या संपादनात इतका हलगर्जीपणा झालेला होता की मला अतोनात संतापायला झाले. त्या पुस्तकाबद्दल अत्यंत कडक अभिप्राय मी मनात तयार केला होता. परंतु पुस्तकाचे संपादक होते. डॉ. चिदंबर कुळकर्णी आणि ते तर पडले अरुण जोशींचे पी. एच्. डी. चे मार्गदर्शक! अरुण जोशींना त्यांच्याविषयी रास्त आदर होता. परिणाम असा झाला की ' विद्वत्तेला संयमी भाषेची आवश्यकता असते ' हा धडा मी येथेच प्रथम गिरवला ! मात्र या ग्रंथाचे नवीन संपादन कोणीतरी केले पाहिजे हे मला जाणवले. अरुण जोशी म्हणाले, ' कोणीतरी कशाला ? तुम्हीच करा. मी तुम्हाला सर्व मदत करीन.' मी त्यांच्या बोलण्याचा गंभीरपणे विचार केला व त्याचे फलित म्हणजे हा ग्रंथ.

माझा परमेश्वर किंवा अशाच काही अतर्क्य गूढ शक्तीवर मुळीच विश्वास नाही. पण एखादी गोष्ट करण्यासाठी आपण खंबीरपणे पुढे सरसावलो की मदतीचे अनेक हात पुढे येतात व त्याच्यातून निर्माण होणाऱ्या जाळ्यातून सुखद योगायोगांची निर्मिती होते असा अनुभव मात्र मी घेतला. अर्थात याच्या विरुद्धही अनुभव आले. परंतु या सर्वच गोष्टींकडे मी आज अपरिहार्य अलिप्ततेने पहात आहे. असाच एक योगायोग म्हणजे राजापुरला ज्या भलुभाऊ रानड्यांच्या घरात मी २०।२२ वर्षे काढली त्यांना आपल्या घरात जुनी हस्तलिखिते आहेत हे नेमक्या वेळी मला सांगावेसे वाटले व त्या हस्तलिखितात 'राजकोश' निघाला !

मी मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचा सदस्य असल्याने मला तंजावरच्या सरस्वतीमहाल लायब्ररीची हस्तलिखित सूची मिळू शकली. त्यातून मी राजकोशाच्या हस्तलिखितांचे क्रमांक मिळवून त्या संस्थेशी पत्रव्यवहार केला. त्यांनीही मोठ्या तत्परतेने अल्प रक्कम घेऊन मला हस्तलिखितांच्या नकला करून पाठविल्या. डॉ. अरुण जोशींची सक्रीय मदत होतीच. या सर्वातून मी कोशसंहिता सिद्ध केली. ती करताना वाटले की या कोशात उल्लेखिलेल्या वस्तू प्रत्यक्ष पहायला मिळाल्या किंवा चित्ररूपाने मिळाल्या तर ? या दिशेने पहिला प्रयत्न म्हणजे वस्तुसंग्रहालये पहाणे. पुण्याचे राजा केळकर वस्तुसंग्रहालय व मुंबईचे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम पाहून आलो. पण त्यांत वस्तू मिळत नव्हत्या, मिळालेल्या ओळखता येत

नव्हत्या व ओळखलेल्यांना ' तज्ञां ' कडून दाद मिळत नव्हती. मग याही बाबतीत स्वतःच निर्णय घेण्याचा पवित्रा घेतला. पुढे श्री. ग. ह. खरे यांची भेट झाली, तेव्हा त्यांनी काही पुस्तके सांगितली व त्यातून काही मौलिक माहिती मिळाली. एका पुस्तकाच्या वाचनातून दुसरे पुस्तक असे जोडत डोंगर पोखरीत होतो. कधी मामुली उंदिर निघायचा तर कधी चमकदार खडा ! कंटाळा येण्याची आणि निराशा वाटण्याची हीच वेळ होती. एक दिवस एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयात इंडियन आर्ट ॲण्ड इंडस्ट्रीचे जुने अंक बघत होतो. त्याचवेळी बाजूने दुर्गाबाई भागवत जात होत्या. त्यांचा माझा पूर्वपरिचय होताच. त्यांनी मोठ्या आस्थेने ' काय करता ?' विचारले. मी त्यांना काय ते सांगताच त्या म्हणाल्या, ' अहो, या इंग्रज लोकांनी या गोष्टींचा फक्त वरचा थर उकरून काढला. त्यांची कामगिरी मोलाची आहे. पण या गोष्टींचे खालचे थर आपणच शोधून काढायचे आहेत.' बाईंचे हे उद्‌गार मला अजूनही मार्गदर्शक वाटतात.

राजकोशाची रचना झाली, त्या काळचे सर्व लेखक एक खंत व्यक्त करताना दिसले. ती म्हणजे यवनांच्या प्रादुर्भावाने संस्कृतवाणी आणि धर्म यांचा लोप झाला. यातील धर्म शद्बाचा अर्थ आधुनिक काळातील 'संस्कृती' या शद्बाला जवळचा आहे हे नंतर उमगले. पण संस्कृतवाणी लोप पावली म्हणजे काय ? त्याकाळी संस्कृत काव्यें लिहायला काय अडचण येत होती ? आधुनिक विज्ञान मराठीत आणायला जशा सध्या अडचणी येतात तशा त्या काळात तत्कालीन समाजस्थिती, रीतिरिवाज इ. संस्कृतातून आणायला अडचणी येत होत्या का ? या प्रश्नांची उत्तरे शोधायला शिवकालीन संस्कृत ग्रंथ मिळवून त्यांचे राजकोशाशी तुलना करीत वाचन केले. तेव्हा असे दिसून आले की संस्कृत भाषेने आपला लवचिकपणा त्याही काळी सिद्ध केला होता!

हे सर्व चालू असतानाच आणखी एक योगायोग आला. आमच्या शाळेच्या वार्षिक पारितोषिक वितरणाच्या कार्यक्रमाला बडा साहित्यिक बोलवायचा अशी प्रथा आहे. एका वर्षी श्री. सेतुमाधवराव पगडी यांचे नांव पुढे आले. त्यांच्या घरी जाऊन त्यांना विचारण्याची कामगिरी मी माझ्यावर घेतली. त्यांनी कार्यक्रमाला येण्याला ठामपणे नकार दिला. मग मी थोड्या साशंकतेने त्यांच्याजवळ राजकोशाचा विषय काढला. त्यानी राजकोश हे नाव

आपण आयुष्यात प्रथमच ऐकतो आहो असा आव आणला आणि मला उलट सुलट प्रश्न विचारून माझी कडक परीक्षाच घेतली. त्या परीक्षेत मी बहुधा उतरलो असणार ! कारण पुढे ते लोडाला टेकून बसले आणि दोन तास अस्खलितपणे बोलत राहिले. मी ऐकत होतो आणि गुरु अंजन घालून शिष्याला दृष्टी देतो म्हणजे काय याचा साक्षात अनुभव घेत होतो !

या कोशाचा अभ्यास करताना काही नवीन मिळाले की मी माझ्या मित्रांना ते सांगत किंवा दाखवीत होतो. यावर प्रतिक्रिया अशी असे 'हे सर्व तुम्हालाच कसे मिळते ? हे कुठून मिळवलेत ?' या सर्व प्रतिक्रिया कौतुकाच्या असत. मी कॉलेजात शिकत होतो तेव्हा 'याला तेवढ्या कविता कशा झटकन सुचतात. मला कां काहीच सुचत नाही ?' हा प्रश्न मलाही पडायचा. याचे उत्तर मिळवायला मीं खूप धडपडलो; या विषयावरील लेखकांच्या मुलाखती कुठे दिवाळी अंकात वगैरे दिसल्या की मी त्या पुन्हा पुन्हा वाचायचा. कित्येकदा त्या कळत नसत तर कित्येकदा त्यात गूढतेचाच आश्रय घेतलेला दिसून येई. आता ही प्रक्रिया उलगडून सांगायची वेळ माझ्यावर आली आहे. पहिली गोष्ट म्हणजे या सर्व प्रकारात कसलीही गूढता नाही! आहे ते सर्व आपकमाईचेच आहे. या कोशाचा म्हणून अभ्यास करण्यापूर्वी मी विविध विषयांचे वाचन करीतच होतो. हे विषय काही एकमेकांपासून फटकून दूर बसलेले नव्हते. भाषा, व्याकरण, संस्कृती, लोकतत्त्व, भारतीयविद्या, इतिहास आणि मराठी, संस्कृत इंग्रजी वाङमय हे माझे वाचनाचे विषय एकमेकांना अगदी पूरकच आहेत. त्यामुळे एखादे पुस्तक वाचताना इकडचे तिकडचे संबंध जुळविण्याची मनाला एक संवयच लागली आहे. एक उदाहरण देतो. राजकोशात एक शब्द आला 'सरायंदा तु गायक:' त्याचा पाठभेद दिसला–'गायकस्तु गुनीजन: ।' पैकी पहिला शब्द सरायंदा हा मनात रुजला. कारण लहानपणी गाणी गाऊन भीक मागणारे 'सरवजे' पाहिले होते. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'लोकसंस्कृतीची क्षितिजे' या पुस्तकात त्याची वेगळ्या रूपात ओळख झाली होती. त्यामुळे मनाच्या कॉम्प्युटरमध्ये त्याची चांगली नोंद होऊन बसली. गुनीजन हा शब्द मात्र कॉम्प्युटर स्वीकारीना. सेतुमाधवराव पगडींना विचारले. त्यांनी फारसी कोश काढून पाहिला व गायक या अर्थी 'गना' शब्द असल्याचे सांगितले. पुढे जयराम पिण्डये याचे राधामाधवविलास हे संस्कृत चंपुकाव्य वाचताना

त्यात गायक याच अर्थी वापरलेला गुणिजनः हा शब्द आढळला. संस्कृत कोश पाहिले; पण त्यात कुठेही हा शब्द आढळला नाही. मग प्रश्न पडला हा शब्द कोणत्या भाषेतील आहे ? उत्तर मिळाले नाही. पण प्रश्न सतावीत राहिला. मग याच आडनावाचे एक परिचित गृहस्थ आठवले. ते आपली जात सुद्धा गुणिजन असल्याचे सांगत. आम्ही वेश्यापुत्र असल्याने आमची हीच जात व हेच आडनांव असे ते ठामपणे सांगत असत. कशाचाच कशाला ताळमेळ बसत नव्हता. तेवढ्यात हा शब्द शास्त्रीय संगीतात वापरत असल्याचे आठवले. म्हणजे या शब्दाचा गायनाशी संबंध आहे हे नक्की झाले. सुप्रसिद्ध पत्रकार व संगीततज्ञ श्री. रामकृष्ण बाक्रे यांच्या पत्नी सौ. सुशीला बाक्रे या माझ्या सहकारी. त्यांच्याबरोबर मी पत्र पाठविले. श्री. बाक्रे यांनी वेळात वेळ काढून मला सविस्तर उत्तर दिले व सर्वच गोष्टींचा उलगडा झाला. संस्कृत व्याकरण जाणणाऱ्यांनी हा शब्द संस्कृतमध्ये बसू शकत नाही याचा निर्वाळा दिला. अशाच प्रकाराने ताम्र याही शब्दाची व्युत्पत्ती जाणवली. शिवकालीन मराठीवर युद्ध संस्कृतीचा कसा प्रभाव पडला हे लक्षात आले.

संशोधक असो, वा लेखक असो त्याचे डोळे व कान सतत उघडे हवेत. आणि मुख्य म्हणजे जे आपणाला हवे ते कोणाकडूनही मिळविण्याची तयारी हवी. मला जी माहिती हवी होती ती मी अक्षरशः कोणालाही विचारीत होतो. कारण आपण ज्यांना सामान्य समजतो, त्यांच्यापैकी एखाद्याच्या खिशात कोहिनूर सुद्धा ठेवलेला असतो. माझ्या या विचारण्याची अनेकजण मनमुराद चेष्टा करीत. माझे नातेवाईक मला गंभीरपणे निरोप पाठवीत, ' शिवाजीची दाढी करणाऱ्या न्हाव्याचा सातवा वंशज मिळाला आहे. त्याची भेट घ्यायला त्वरित या ! ' राजकोशाच्या उपोद्घातातील ' उत्सादितां चिरतरं यवनैः प्रतिष्ठां ' या श्लोकाचा अर्थ लागत नव्हता. तो लावल्यावर ही देवळे कुठे आहेत, त्या ठिकाणी काय प्रकार घडले हे कळत नव्हते. ठाण्यातील सुलोचनादेवी सिंघानिया हायस्कूलच्या संस्कृत शिक्षिका डॉ. शंकरनारायण या माझ्या परियाच्या आहेत. त्यांची भेट झाली असता त्यांना यासंबंधी विचारले. त्यांनी श्लोक वगैरे लिहून घेऊन मद्रासमधील त्यांच्या एका परिचित गृहस्थाला कळविले. त्याने पत्रातून जी माहिती कळविली ती विस्मयकारक होती. मी तात्काळ पगडींना फोन केला. अत्यंत उत्तेजित आवाजात मी ओरडत होतो, 'बाबा, मला लाखो रुपयें किंमतीचा हिरा मिळाला.' सर्व वृत्तान्त ऐकल्यावर त्यांचीही अवस्था

अशीच झाली असावी हे त्यांच्या स्वरावरून जाणवत होते. पुढे त्यांनी ३० ऑक्टोबर १९८२ च्या 'स्वराज्य' मध्ये 'देवदेवतांची आणि देवालयांची कथा' हा लेख प्रसिद्ध केला. त्यात त्यानी माझ्या नांवाचा उल्लेख करून सर्व माहिती दिली आहे. मला याचा आनंद झाला व आश्चर्यही वाटले. मी त्यांना म्हणालो, 'बाबा, तुमच्या माझ्या वयात आणि ज्ञानात केवढे अंतर. पण तुम्ही माझा 'मित्र' म्हणून उल्लेख केलात. त्यावर ते म्हणाले, 'तुम्ही केलेल्या संशोधनाचे श्रेय तुम्हालाच मिळाले पाहिजे. आणि तुम्ही बोलला नाहीत तरी मला कळले की तुमचे संशोधन मी प्रसिद्ध केले म्हणून तुम्ही नाराज आहात. पण लक्षात ठेवा ज्ञानावर कोणी मक्तेदारी गाजवू नये. ज्ञान मिळविण्याच्या कामात आपण एक साधन ठरलो म्हणून ते ज्ञान आपल्या मालकीचे झाले असे समजू नका. अहो, ज्ञान हे लोकांचे असते. त्यांना ते तत्परतेने देऊन शहाणे करून सोडावे अवघे जन.'

बौध्दिक प्रामाणिकपणाच्या या पार्श्वभूमीवर एक कटु अनुभवसुध्दा आला. शिवाजीशी संबंधित अशा एका थोर व्यक्तीकडे मदतीच्या अपेक्षेने गेलो होतो. स्वागत चांगले झाले. पण ते गृहस्थ म्हणाले ' महाराजांनी उर्दू-संस्कृत कोश रचून घेतला असे म्हणू नका. फार्सी संस्कृत कोश म्हणा.' मी त्यांना कोशाची भाषा उर्दूच आहे—त्याकाळच्या भाषेत दख्खनीयावनी-असे पटवून देऊ लागलो. पण ते आपला हेका सोडीनात. का तर उर्दू ही 'हलकी' भाषा ! तिच्या कोशाचे कार्य महाराजांनी केले म्हणणे म्हणजे महाराजांच्या थोरवीला कमीपणा येतो ! या कोशात काही भाग प्रक्षिप्त (मागाहून कोणीतरी घुसडलेला) असावा असे मी म्हणताच ते नाटकी कळवळयाने म्हणाले, 'नका हो. नका असे काही प्रसिध्द करू.' या सर्वांवर त्यांनी कळस केला तो म्हणजे 'मी तुम्हाला प्रकाशक मिळवून देतो' 'असे म्हणून त्यांनी माझ्या पुस्तकाच्या हस्तलिखिताची प्रत मागून घेतली. मी त्यांना माझा पत्ता लिहून घेण्याचे सुचविताच त्यांनी मला डायरी आणून दिली. मास्टर विनायकांच्या 'ब्रह्मचारी' चित्रपटातील नायिका तिच्याकडे येणाऱ्या प्रेमवीरांना देते, तशी ती डायरी अनेकांच्या पत्त्यांनी आधीच पूर्ण भरून गेली होती ! पुढे त्या गृहस्थांना मी दोन पत्रे पाठविली, माझ्या मित्रामार्फत निरोप पाठविले. पण त्यांनी कसलीही दाद दिली नाही की या क्षणापर्यंत माझे हस्तलिखितही दिले नाही. मी त्यांचे मनःपूर्वक आभार

एवढ्यासाठीच मानतो की त्यांनी माझे हस्तलिखित स्वतःच्याच नांवावर प्रसिध्द करून टाकले नाही !

पुस्तकाचे प्रकाशन करण्यासाठी मी तीन वर्षे विविध प्रकाशकांकडे पत्रव्यवहार केला. काहींनी उत्तरेच दिली नाहीत, काहींनी गोड किंवा रोखठोक नकार कळविला तर काहींची मासलेवाईक उत्तरे आली. या सर्वांतून मी एकच निष्कर्ष काढला–शिवाजीची थोरवी आणि प्रकाशकांची नफ्यातोटयाची गणिते यांच्या रस्सीखेचीत शिवाजीच कमजोर ठरतो ! प्रकाशक ही नफा मिळविण्यासाठी धंदा काढून बसलेली माणसे आहेत हे सत्य मी मान्य करतो. पण जेव्हा हे प्रकाशक 'रॉयल्टी म्हणून एक पैसा सुद्धा देणार नाही, तशी अपेक्षा असेल तर आमच्याकडे पाऊलसुद्धा टाकू नका.' किंवा 'तुम्ही आम्हाला दहा हजार रुपये देणार असाल तर प्रकाशनाचा विचार करता येईल' असे बोलतात (व पत्रात लिहितात सुद्धा !) त्यावेळी मला फार दुखावल्यासारखे झाले. या संशोधनासाठी मी हजार रुपये खर्च केले. त्यावर मला नफा नको पण ते परत मिळावेत एवढीही मी रास्त अपेक्षा करायची नाही ? एका प्रकाशकाला मी म्हणालो, 'मला एक पैसापण रॉयल्टी देऊ नका. मात्र माझ्या पुस्तकावर तुम्हीसुद्धा एक पैशाचाही नफा मिळविता नये.' यावर मात्र त्यांच्या नाकाला मिर्च्या झोंबल्या. अर्थशास्त्रात साहस घेण्याला किंमत आहे; व्यासंगाला नाही !

मी अखेर 'ग्रंथाली'कडे पत्रव्यवहार केला. त्यांची अडचण अशी की त्यांनी अशा प्रकारचे प्रकाशन पूर्वी केलेले नव्हते. त्यामुळे ही जबाबदारी स्वीकारावी की नाही याचा त्यांना निर्णय घेता येईना. मात्र श्री. दिनकर गांगल, कुमार केतकर व त्यांचे अन्य सहकारी यांनी मला बोलावून घेतले व आस्थापूर्वक चौकशी केली. 'कुठल्याही बाबतीत तुम्हाला नकार देणे आम्हाला अन्यायाचे वाटते' असे म्हणून त्यांनी मला प्रकाशनासाठी अनुदान म्हणून पाच हजार रुपये देण्याचे व ग्रंथाचे वितरण करण्याचे आश्वासन दिले. प्रकाशनासाठी आणखी पांच हजार आवश्यक होते. ते मी उभे करायचे होते. माझे भाऊ व मित्रमैत्रिणी यांच्या माझ्याविषयी असलेल्या सद्भावना लक्षात घेता मला हे आवाक्यातील वाटले. त्यातच 'युनिप्रिंट'चे श्री. गांगल हे माझे सहकारी मित्र असल्याने त्यांनी मुद्रण खर्च हप्त्यांनी घेण्याची तयारी दर्शविली. ग्रंथवितरणाबद्दल आपणास योग्य कमिशन घेऊन 'ग्रंथाली' मला

पैसे देणार आहे म्हणजे माझे कालान्तराने कां होईना पैसे मिळतील. मला हा तोडगा सन्माननीय वाटला. 'ग्रंथाली'चे मी मनःपूर्वक आभार मानतो.

ठाणे येथील नाणीसंग्राहक श्री. शितूत यांनी आपल्या संग्रहातील 'लारी' हे नाणे रेखाचित्र काढण्यासाठी उपलब्ध करून दिले. त्या नाण्या–मागची दंतकथा सांगून इतरही उपयुक्त माहिती दिली. परमेश्वरीलाल गुप्ता यांचे 'कॉइन्स' हे आपल्या संग्रहातील पुस्तक वाचायला दिले. त्यांचा मी आभारी आहे.

स्व. आण्णा पाध्ये माझ्या जीवनात आले नसते तर मी हे पुस्तक नक्कीच सेंट्रल रेल्वेला अर्पण केले असते ! या पुस्तकासाठी केलेले अर्ध्याहून अधिक वाचन मी लोकल गाड्यांची वाट बघत प्लॅटफॉर्मवरच केले आहे. या गाड्यांनी इतरांचा, वेळ मोडला असेलही, पण मला मात्र पुरेपूर वेळ उपलब्ध करून दिला ! !

हे पुस्तक ज्यांना अर्पण केले आहे ते अच्युत बाळकृष्ण पाध्येगुर्जर हे प्रथितयश वैद्य होते वैद्यकीचा शवविच्छेदनपूर्वक अभ्यास त्यांनी लाहोर येथे केला होता. वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी ते उत्तर भारताच्या जंगलातून फिरले होते. या विषयात त्यांनी काही मूलभूत संशोधन केलेले होते. कायाकल्प, किमया, मंत्रशास्त्र या विषयांतही त्यांनी अनाग्रही पण चिकित्सक प्रयोग केले होते. आयुर्वेदाचे गुरु म्हणून त्यांना महाराष्ट्र शासनाची मान्यता होती. त्यांची बुद्धिमत्ता ज्ञानकोशासारखी सर्वसमावेशक होती व ग्रहण केलेली प्रत्येक गोष्ट त्यांच्या जिव्हाग्री होती. त्यामुळे व्याकरण, साहित्यशास्त्र, वेदवेदान्त, क्रियाकल्प इ. सर्व विषयांत त्यांची अप्रतिहत गती होती. उत्तरेकडील विविध भाषा, लिपी, चालिरीती इ. चे त्यांचे ज्ञान अनेकांना मार्गदर्शक ठरले आहे. निगर्वी परोपकारी वृत्ती, शुद्ध आचरण, ज्ञान या सर्वांमुळे ते सर्व जातिधर्माच्या लोकांना आदरणीय होते. त्यांच्याकडे मी संस्कृत वाङ्मय, व्याकरण, साहित्यशास्त्र यांचा परिचय करून घेतला. त्यांनी बुद्धीवर केलेले संस्कार दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरत आहेत.

माझ्या वडिलांना संस्कृतच्या बरोबरीने उर्दू, फारसी व अरबी या भाषा येत होत्या. त्यामुळें त्यांचा या कोशाच्या अभ्यासात आधार होता. ते

नेहमी मला म्हणत, 'तुझ्या पुस्तकात माझे नांव लिही हो. कारण मला प्रसिद्धी मिळण्याचा तो एकच मार्ग आहे. नाहीतर माझे नांव कोण छापणार ?' त्यांना हा आनंद मिळण्यापूर्वीच ते आमच्यातून निघून गेले.

या ग्रंथाच्या रचनेचे श्रेय सर्वात जास्ती डॉ. अरूण जोशी यांना आहे. त्यांनी मला सतत मार्गदर्शन केले संदर्भग्रंथ केवळ सुचविले नाहीत, तर स्वतः आणून दिले. माझे विवेचन शास्त्रीय लेखनपद्धतीत कसे बसवायचे याचे त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

माझी पत्नी सौ. सूर्या हिने सर्व प्रापंचिक जबाबदाऱ्या आपल्यावर घेऊन मला वेळ मिळवून दिला. माझ्या विद्वत्तेचा आणि थोर व्यासंगाचा कोणाला उपयोग होईल तो होवो; त्याचा सर्वात जास्त उपद्रव तिलाच सहन करावा लागतो !

माझा भाचा रूपक साने व सहकारी शिक्षकमित्र श्री. शिरीष पितळे व अ. वा. मोडक हे केवळ प्रेमापोटी माझ्याबरोबर ठिकठिकाणी आले, माझ्यासाठी त्यांनी गैरसोयी व हालअपेष्टा सोसल्या व मला रेखाचित्रे, छायाचित्रे काढून दिली.

राजा केळकर वस्तुसंग्रहालयाचे श्री. काका केळकर, भारत इतिहास संशोधक मंडळाचे श्री. ग. ह. खरे, श्री. गो. नी. दांडेकर व श्री. सेतुमाधवराव पगडी या थोर व्यक्तींनी आपलेपणाने इतकी मदत केली की त्यांचे शाब्दिक आभार उपचार म्हणूनच मानायचे. 'श्रीप्रतापशस्त्रागार' हे दुर्मिळ पुस्तक श्री. गो. नी. दांडेकर यांनी उपलब्ध करून दिले. सेतुमाधवरावजींच्या मदतखुणा तर या ग्रंथात पावलोपावली दिसून येतील. त्यांच्या प्रस्तावनेमुळेच माझ्या पुस्तकाचे मोल वाढले आहे.

आता अखेरीला ज्यांच्यासाठी हा सर्व खटाटोप केला त्या वाचकांशी हितगुज करू इच्छितो. माझ्या संग्रहातील सर्व पुस्तकांवर 'कथासरित्सागर' या संस्कृत ग्रंथातील एक वाक्य लिहीलेले असते. 'रसिको हि वहेत्काव्यं पुष्पामोदमिवानिलः ।' फुलांचा सुगंध वारा जसा सर्व दिशांना वाहून नेतो, त्याप्रमाणे रसिक काव्याची कीर्ती सर्वत्र पसरवितो. आपल्याकडून मी

माझी केवळ कीर्ती पसरावी अशी अपेक्षा करीत नाही; मार्गदर्शनाचीही अपेक्षा करतो. माझे संशोधन हा या क्षेत्रातील काही शेवटचा शद्ब नाही. कित्येक ठिकाणी माझ्या चुका झाल्या असतील. त्या सुधारून पुढील अभ्यासकांना निर्दोष माहिती देणे या कामी आपणच मला सहकार्य करू शकता. या कोशातील उल्लेखिलेल्या काही वस्तू आपण पाहिल्या असाल; काही आपल्या घरातही असतील. यातील काही शद्ब आपण वापरतही असाल. अशा वेळी आपण मला काय मदत करायची हे आपण जाणताच. म्हणूनच हा कोश आपण नीट वाचा, पहा अशी विनंती करतो.

या कोशाचा उपयोग काय व कोणाला हा प्रश्न प्रकाशकांसकट सर्वच विचारतात. त्यावर माझे उत्तर असे-अशा स्वरूपाची सर्वच संशोधने हीं विज्ञानातील 'रामन इफेक्ट' या संशोधनासारखी असतात. 'रामन इफेक्ट' ला नोबेल पारितोषिक मिळाले पण सामान्य लोकांना त्याचा काय उपयोग आहे? तो नाही हे खरेच आहे. परंतु या शोधामुळेच अणूचे अंतरंग निश्चित झाले. आकाशाचा रंग निळा कां? विशिष्ट ठिकाणच्या समुद्राचे पाणी विशिष्ट रंगाचे कां?-अशासारखी विज्ञानातील गूढे उकलली व विज्ञान एक पाऊल पुढे गेले. आणि हाच त्याचा श्रेष्ठ उपयोग. त्याची तुलना एडिसनने शोधलेल्या विद्युत-दीपाशी होणार नाही व करूही नये. डॉ. रा. चिं. ढेरे व प्रा. ना. सी. फडके या दोघांत लोकप्रियतेचा विचार केला तर फडके श्रेष्ठ ठरतीलच. पण काही विशिष्ट क्षेत्रात डॉ. ढेऱ्यांनी बांधून ठेवलेले ज्ञानाचे घाट त्या वाटेने जाणाऱ्याला केवढे उपयुक्त आहेत! माझ्या या संशोधनाने शिवकालीन अभ्यास विषयात मुंगीच्या पावलाइतकी जरी प्रगती झाली तरी मी स्वत:ला धन्य मानीन. ही धन्यता आपण मला मिळवून देणार आहात.

माझ्या कामात मदतीचा हात आपणहून व आपलेपणाने पुढे करणारे अनेक नातेवाईक व मित्र आहेत. त्यांचे आभार मानण्यापूर्वी त्यांना सांगावेसे वाटते-ही तर केवळ सुरुवात आहे. तुमच्याच मदतीने आणखी पुढे जायचे आहे.

६ मंजुषा,
१३ ए, विकास हाउसिंग सोसायटी,
शास्त्रीनगर-डोंबिवली,
ता. कल्याण, जि. ठाणे. ४२१ २०२

अश्विनीकुमार दत्तात्रेय मराठे.
१२-११-१९८४

– प्रस्तावना –

शिवाजी महाराजांच्या असामान्य प्रतिभेची झेप निरनिराळ्या क्षेत्रांतून निर्वेधपणे चालू असे. राजकारण, मोहिमा, मसलती, प्रत्यक्ष युद्धे, शत्रूशी सामदामाचे संबंध, राजकीय डावपेच हे त्यांचे गुण तर प्रसिद्ध आहेतच. पण कल्याणकारी राज्याची कल्पना ही सुद्धा महाराजांच्या प्रतिभेचीच निदर्शक आहे. हा सर्व व्याप सांभाळीत असताना महाराजांनी विद्या आणि कला यांच्याकडेही लक्ष पुरविले होते. अनेक विद्वान, पंडित आणि कलावंत यांना त्यांचा आश्रय लाभला होता. कवीन्द्र परमानंद, जयराम पिण्डये, भूषण कवी, समर्थ, गागाभट्ट अशी अनेक नांवे या संदर्भात घेता येतील. या बरोबरच राज्यव्यवहारामध्ये प्राचुर्याने आढळून येणारे फारसी व दख्खनी उर्दूतील शब्द यांच्या ऐवजी संस्कृत पर्याय वापरून राज्यव्यवहाराचे मराठीकरण करण्याची योजनाही शिवप्रभूंनी आखली. अशा प्रकारचा एक कोश तयार करण्याचे काम त्यांनी प्रसिद्ध मुत्सद्दी व प्रशासक रघुनाथ नारायण हणमंते याजकडे सोपविले. त्याने धुंडिराज व्यास या विद्वानाच्या सहाय्याने राजव्यवहारकोश सिद्ध केला. ही घटना इ. स. १६७८ ची असावी. राजव्यवहारकोशाच्या सुरुवातीला रघुनाथ पंडिताने राजव्यवहारकोश लिहिण्याचे प्रयोजन काय या संबंधी पुढीलप्रमाणे म्हटले आहे.

कृते म्लेच्छोच्छेदे भुवि निरवशेषं रविकुला –
वतंसेनात्यर्थं यवनवचनैर्लुप्तसरणिम् ।
नृपव्याहारार्थं स तु विबुधभाषां वितनितुम्
नियोक्तोभूद्विद्वान्नृपवर शिवच्छत्रपतिना ।।

' या पृथ्वीतलावरून म्लेंच्छांचा पूर्ण उच्छेद केल्यानंतर सूर्यवंशाला ललामभूत ठरलेल्या त्या छत्रपती शिवाजीने यवनांच्या भाषेने लोपून गेलेल्या राजव्यवहार पद्धतीचा संस्कृत भाषेतून प्रसार करण्यासाठी (रघुनाथ) पंडिताची नियुक्ती केली.

वरील श्लोकावरून या कोशाची मर्यादा स्पष्ट व्हावी. यवनांच्या भाषेने लोपून गेलेल्या राजकीय व्यवहार पद्धतीचा संस्कृत भाषेतून प्रसार करण्यासाठी या कोशाची निर्मिती झाली आहे. वरील श्लोकावरून कोशाचे

स्वरूप आणि त्याच्या मर्यादा या स्पष्ट होतात. महाराष्ट्रातील पूर्वीच्या ३०० वर्षे नांदलेल्या राजवटीमुळे फारसी आणि दक्षिणी उर्दू या दोन्ही भाषांना राजभाषांचे स्वरूप प्राप्त झाले होते. पण विविध थरात, उदा. इनामे, दानपत्रे, नेमणुका, वृत्ती, वतने इ. बाबतीत मराठीचा वापर हा अपरिहार्य होता. मराठीवरील फारसी आणि दक्षिणी उर्दूच्या संस्करणा-मुळे राज्यव्यवहार व लोकव्यवहार या दोन्ही क्षेत्रांत शेकडो फारसी शद्ब मराठी कागदपत्रांतून वापरण्यात येऊ लागले त्या काळात उत्पन्नाचे मुख्य साधन जमीन आणि शेतसारा हे असल्याने जमिनीसंबंधी शेकडो फारसी शद्ब मराठीतून सामान्यांच्याही तोंडी खेळू लागले. मराठी कागदपत्रातूनही यांचा वापर होऊ लागला. ज्ञानेश्वर व महानुभावकालीन मराठीचे स्वरूप जवळ जवळ लुप्त होऊन गेले. रूढ झालेल्या शद्बांना पूर्वी शुद्ध मराठी रूपे होती हेही लोक विसरून गेले. आजही म्हणजे २–३ शतके लोटल्यावरसुद्धा मराठीतील फारसी अगर त्यासारख्या शद्बांची संख्या कमी झाली असली तरी शेकडा दहापर्यंत निश्चितच ती टिकून राहिली आहे. आजही सामान्यांच्या तोंडी आणि घरादारात प्रविष्ट झालेले शद्ब पाहिले तर संवयीमुळे माणसे किती रूढिप्रिय बनतात हे बघून विस्मय वाटतो. उदाहरण म्हणून अद्याप प्रचलित असलेले काही शद्ब पहा–माल, मसाला, इमारत, गुलाम, वसवस (करणे), फजिती, फराफरा (ओढणे), अवलाद, मेहरपी, मोल, मजुरी, मुकादम, मेहनत, कारकून, जबरदस्ती, दहशत, कब्जा, जमीन, किल्ला, मजला, कलम, कायदा, कानून, मोबदला, कारंजे, बागाईत, जिरायित, नाकबूल, गुन्हा, तसदी, तोशीस, मुभा, बिलवर (दागिना), शर्थ, शिकस्त, बिशात, आफत, आस्मानी, मुलामा, समई, बक्षिस, इमान, जहागिर, गुलाब, जिलबी, कलंदर, अफलातून, तुफान, बंदर, नाराज, खुशी, खून–असे किती म्हणून सांगावेत ! ही जर आजची स्थिती आहे तर २००/ २५० वर्षांपूर्वीची मराठी पत्रे पाहिली तर त्यातील फारसी शद्बांची संख्या शेकडा ७५ पर्यंत सहज जाते, याचे आश्चर्य वाटायला नको. त्या काळातील काही पत्रे पाहिली तर फक्त नाम, सर्वनाम आणि क्रियापदे तेवढी मराठी वाटतात. 'शाबास तुमच्या दिलेरीची, रूस्तुमीची आणि सफेजंगीची'–या वाक्यात मराठी किती हे वाचकांनी ठरवावे. शाबास हा शद्ब कोणाला मराठी वाटेल. पण शाद=सुखी व बास=रहा या दोन फारसी शद्बांचा मिळून शाबास हा शद्ब झाला आहे ! अधिकाऱ्यांची नांवेही त्या काळास अनुसरून फारसीवरूनच मराठीत रूढ झाली होती. हवालदार, सरहवालदार,

नविशिंदा, मीरजुम्ला, मुजुमदार, सुभेदार, सरलश्कर, सरनोबत, सरपरदा-दार इत्यादी. विविध खात्यांची नांवेंही जशीच्या तशी सर्रास मराठीत वापरण्यात येतात. उदा. जवाहरखाना, पोशाकखाना, पीलखाना, शुतुरखाना. शस्त्रांची फारसी नांवे अशीच मराठीत रूढ झाली होती. तोफा, बंदुका, गोळे, गरनाळे, बर्ची, निमचा, गुरगुज इ. महसूल आणि न्याय खात्यातील असंख्य फारसी शद्ब मराठीत घुसले होते. कज्जे, फैसले, महजर, मजलीस, गवाह, हाजिरमजलिसी, नामजाद, हाशिल, महसूल, जकात, कुलबाब, कुलकानून इत्यादी. विशिष्ट धर्माच्या संकेतांचे शद्बही काही कमी संख्येत आले नव्हते! उदा. मशीद, दर्गा, पीर, उरूस, मुशाफिरखाना, खिरापत, शादी, सुन्ता, कफन, दफन, कबर, गलाप, असे कितीतरी शद्ब सांगता येतील. राज्य-व्यवहारात हरघडी येत असलेल्या अशा शद्बांची त्यावेळी मोठी अडचण वाटत असली पाहिजे.

दक्षिण दिग्विजयानंतर शिवाजी महाराजांना राज्यव्यवहाराच्या दृष्टीने ही अडचण विशेषच जाणवली असली पाहिजे. महाराजांचे राज्य महाराष्ट्रात ६ जिल्हे, कर्नाटकात ४ जिल्हे व तामिळनाडमध्ये २ जिल्हे अशा भूप्रदेशात पसरले होते. मराठीत रूढ असलेली परिभाषा दक्षिणेत चटकन समजेल अशी परिस्थिती नसावी हेही एक कारण कोशाच्या रचनेबाबतीत संभवते.

कारण काहीही असो, पण या पाठीमागील शिवाजीमहाराजांची प्रेरणा ही उत्तम, सुगम आणि सुटसुटीत राज्यकारभाराची होती हे निश्चितच दिसते. मराठीत अनेक नवीन शद्बांची भर तर पडत होतीच. पण त्याच्या बरोबरच पूर्वी प्रचलित असलेले आणि मध्यंतरीच्या राजवटींमुळे वापरातून गेलेले अनेक शद्ब पुन्हा व्यवहारात आणले गेले, हा मराठीचा मोठा लाभच झाला.

हा कोश फारसी-संस्कृत कोश असावा अशी समजूत काही ठिकाणी व्यक्त झालेली माझ्या अनुभवाला आली आहे. ही समजूत खरी नाही. दक्षिणेतील राजवटीमध्ये फारसी ही राजभाषा होती हे खरे. पण लोकांची भाषा ही आजच्या उर्दूशी मिळती जुळती असलेली अशी होती. या भाषेला राज्यकर्ते 'दखनी' या शद्बाने संबोधीत. ही दखनी म्हणजेच हिंदी होय

अशीही समजूत आढळून येते. वास्तविक पहाता ही समजूत खरी नाही. तुकाराम, रामदास इ. साधुसंतांची हिंदी भाषेतील रचना आहे. ती देवनागरी लिपीतील आहे. मुस्लीम राज्यकर्त्यांच्या बरोबर जो समाज उत्तरेकडून आला व जी भाषा बोलू लागला ती 'दखनी' होय. या भाषेला जेव्हा साहित्याचे स्वरूप आले तेव्हा ती भाषा फारसी लिपीतून लिहिली जाऊ लागली. या दखनी भाषेला हळुहळू उठाव मिळू लागला व फारसी भाषा मागे पडू लागली. या दखनी भाषेत अनेक नामांकित कवी व गद्यलेखक झाले. इब्राहीम आदिलशहा, मुहंमद कुली कुतुबशहा, नुस्रती असे अनेक कवी या भाषेला लाभले. त्या भाषेचे पूर्वीचे स्वरूप हिंदीशी मिळतेजुळते होते. पण काव्याचे विषय हे इस्लाम धर्माशी संबंधित आहेत. वृत्ते, शैली इ. बाबतीत फारसीचे अनुकरण करण्यात येई. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही भाषा फारसी लिपीतून लिहिण्यात येई. त्या भाषेच्या लेखकांमध्ये हिंदूंची नांवे जवळ जवळ आढळतच नाहीत. जयराम पिंडये या संस्कृत कवीने या भाषेला दाक्षिणात्य यावनी म्हटले आहे. ते सर्वथैव समर्पक आहे. आजच्या उर्दू भाषेचे मूळ या दखनीत आहे हे विसरता कामा नये.

मराठीचा संबंध जो आला असेल, तो रास्त फारशीशी असा कमी आला असावा. जो आला तो प्रामुख्याने दखनीउर्दूशी आला. कारण विजापूर असो की अहमदनगर; गोवळकोंडा असो की ब्रेदर; -दरबारापर्यंत लोक फारसीत लेखन करीत. पण बोलत मात्र उर्दूत ! फारसी ही क्वचितच इथे कोणाची मातृभाषा होती. पग राजव्यवहारात फारसी प्रचलित असल्याने लोकांच्या तोंडी फारसी भाषेतील असंख्य शद्ब दक्षिणीउर्दूच्या द्वारे प्रकट होऊ लागले. दक्षिणीउर्दूचा संपर्क मराठीशी आल्याने हे शद्ब मराठीत आले.

मराठीतील या फारसी शद्बांची संख्या पाहून मराठी भाषेचे स्वरूप अजिबात बदलले असे कोणास वाटण्याचा संभव आहे. पण संतकवी व पंडितकवी यांच्या मराठी साहित्यामध्ये अत्यल्प प्रमाणातच फारसी शद्ब सांपडतील. एकतर हे वाङ्मय मूळ वैदिक संस्कृतीच्या धर्मग्रंथांतून निर्माण झालेले. त्यामुळे त्यात संस्कृत शद्बांचे प्राचुर्य हे अपेक्षितच होते. दुसरे असे की, परकीय भाषांतील शद्बांचे प्राचुर्य हे व्यावहारिक मराठीमध्ये येणे साहजिकच आहे. पण त्याचा संबंध अभिजात मराठी साहित्याशी नाही, असे सामान्यपणे समजले जाते. त्यामुळे मराठी साहित्यातील हे दोन प्रवाह आपल्याला स्पष्टपणे आढळतात. त्याकाळचे मराठी गद्य हे प्रामुख्याने

पत्रव्यवहार, सनदा, महजर, निवाडे इ. स्वरूपातील असल्यामुळें त्यातील फारसी शब्दांच्या प्राचुर्याकडे साहजिकच संशोधकांचे लक्ष गेले. पण विशिष्ट राजवटीतून निर्माण झालेली ती एक प्रक्रिया होती. ती राजवट संपल्यानंतर ती प्रक्रिया ओहोटीला लागणार हेही उघड होते. पण राजव्यवहारातील मराठीचे स्वरूप अधिक शुद्ध असावे असा जाणीवपूर्वक प्रयत्न शिवाजी महाराजांनी केला ही त्या महापुरुषाच्या चतुरस्र प्रतिभेची साक्ष आहे. एखाद्या भाषेतून मूळ शद्ब नाहीसे व्हावेत, त्यांची जागा परकीय शद्बांनी घ्यावी आणि ही सवय लोकांच्या अंगवळणी पडावी अशी परिस्थिती झाली होती. पण अस्मिता जागृत झाल्यावर माणसे सर्वच दृष्टींनी विचार करू लागतात. आजची परिस्थिती पहा आणि ४० वर्षांपूर्वीच्या परिस्थितीशी तिची तुलना करा. राष्ट्रपतिभवन, सचिवालय, प्रतीक्षालय, मुख्यमंत्री, मंत्रालय, वायुदल, भूसेना; रोहिणी, भास्कर, आर्यभट हे उपग्रह; गंगा, गोदावरी, धवलगिरी ही नौकानांवे; पद्मश्री, पद्मभूषण इ. बिरुदे, परमवीरचक्र, वीरचक्र इ. पारितोषिके ही अस्मितेचीच जागृती दाखवितात. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासातील हा एक टप्पा असतो. राजव्यवहारातील शद्बांचे मराठीकरण करावे ही कल्पनाच मुळी महाराजांचे स्वप्न किती भव्य होते हे दाखवून देण्यास समर्थ आहे. कुणास वाटेल की ही गोष्ट इतकी महत्त्वाची आहे कां ? त्याला उत्तर हेच की, राष्ट्राच्या जागृतीतील हे एक महत्त्वाचे पर्वच म्हणावे लागेल.

रघुनाथ पंडिताने राजव्यवहारकोशाच्या उपोद्घातात काहीशी आग्रही भूमिका जी घेतली आहे ती समजण्यासारखी आहे.

उद्देशाय गृहीतात्र म्लेंच्छभाषा न दुष्यति ।
नापेक्ष्यते किं रत्नानि खचितुं जतु जातुचित् ॥८३॥
विपश्चित्संमतस्यास्य किं स्यादज्ञविडम्बनैः ।
रोचते किं क्रमेलाय मधुरं कदलीफलम् ॥८४॥

'विशिष्ट हेतुने वापरलेली म्लेंच्छभाषा या ठिकाणी संस्कृत भाषेला दूषित करीत नाही. रत्ने जडविण्यासाठी लाखेचा नाही कां उपयोग करावा लागत ?

विद्वानांची मान्यता लाभल्यावर, मूर्खांनी या कोशाची कुचेष्टा केली म्हणून, काय होणार ? उंटाला कधी गोड केळी आवडतात कां ?

या श्लोकावरून राजव्यवहारकोशाच्या रचनेमागच्या भावना किती तीव्र असाव्यात याची थोडीशी कल्पना करता येते. राजव्यवहारकोशाच्या उपोद्घातात रघुनाथ पंडिताने थोडक्यात पण मार्मिकपणे स्वतःबद्दल माहिती तर दिली आहेच; पण त्या बरोबरच शिवचरित्राचे मोजक्याच शद्वात जे कथन केले आहे, ते एका समकालीनाच्या लेखणीतून निघाल्यामुळे निश्चितच महत्त्वाचे झाले आहे. दक्षिणदिग्विजयाची हकीगत रघुनाथ नारायणनें दोन श्लोकात मोठ्या समर्पक रीतीने दिली आहे –

क्रान्त्वा मंत्रबलेन यस्य निखिलामाशामवाचीं क्रमात्
कर्नाटक्षितिपांश्च भागनगराधीशं च कृत्वा वशे ।
आसेतुप्रसृतांश्च यावनगणानुच्छिद्य तत्रावनी –
पातारं व्यदधाद्यमेव तु शिवः साम्राडमात्यं निजम् ।।७८।।

'ज्याच्या सल्लामसलतीने (किंवा मंत्रबळामुळे) शिवराजाने कर्नाटकातील राजे, हैद्राबादचा (भागनगराचा) राजा जिंकून क्रमाक्रमाने सर्व पूर्व दिशा जिंकली, आसेतु पसरलेले यवनसंघ नष्ट करून टाकले त्यालाच (रघुनाथालाच) त्या शिवसम्राटाने तेथे राज्यरक्षणकर्ता अमात्य म्हणून नेमले.'

दक्षिणभारतातील देवालये उध्वस्त तरी झाली असावीत किंवा त्यांचे पूजादि उत्सव बंद पडले असावेत. पण शिवाजीमहाराजांच्या आज्ञेन हे उत्सव पुन्हा सुरू झाले. या अतिशय महत्त्वाच्या घटनेकडे रघुनाथ नारायणने पुढील श्लोकात आपले लक्ष वेधले आहे –

उत्सादितां चिरतरं यवनैः प्रतिष्ठाम्
शोणाचलेशितुरयं विधिवद्विधाय ।
श्रीमुष्णवृद्धगिरिरुक्मसभाधिपानाम्
पूजोत्सवान प्रथयति स्म सहात्मकीर्त्या ।।८०।।

'ज्या शोणाचलपतीचे (तिरूवन्नमलाई येथील समोत्तिपेरूमल मंदिर, अरूणाचलम्) निवासस्थान यवनांनी दीर्घकाळ उध्वस्त केले होते, ते पुन्हा एकदा विधिपूर्वक स्थापन करून (रघुनाथाने) श्रीमुष्ण (भूवराहस्वामी) वृद्धगिरी (वृद्धाचलम् येथील महादेव) रुक्मसभाधिप (चिदंबरं येथील नटराज) या देवांचे पूजोत्सव सुरू केले व आपली कीर्ती वाढवली.'

प्रत्यक्ष राजव्यवहारकोशातील शद्व पाहिले तर मूळ शद्वास जे संस्कृत प्रतिशद्व दिले आहेत तेथे मतभेदास जागा रहात नाही. कोशात दिलेल्या शद्वांची संख्या १३८० आहे. त्या शद्वात फारसी भाषेतील शद्व आहेतच. पण फारसीशी यत्किंचितही संबंध नसलेले पण दखनीउर्दूत प्रचलित असलेले असे अनेक शद्व आढळतील. उदा. अडकित्ता, आडेकरी, कर्त्ता, चोळी, छीट, ढाल, दुटा, दुर्मा, दुवल, दौड इ. असे अनेक शद्व आल्यामुळे या कोशाचे स्वरूप उर्दू–संस्कृत कोशाचे म्हणता येईल; फारसी–संस्कृत कोशाचे म्हणता येणार नाही. या कोशात योजलेल्या अनेक शद्वांपैकी काही संस्कृत शद्व पुढील काळात चालू राहिले. उदा. अमात्य=मुजुमदार, सचिव=सुर्नीस, मंत्री=वाकेनीस, देशाधिकारी=सुभेदार, मुद्राधारी=किल्लाहवालदार, देशलेखक=मुजुमदार.

शिवाजी महाराजांची राज्याभिषेकानंतरची पत्रे आणि संभाजी, राजाराम इत्यादींची पत्रे पाहिली तर भाषेच्या दृष्टीने त्यातील फरक जाणवू लागतो. हा प्रकार पुढे वाढत गेला असता तर पुढील काळातील पत्रव्यवहाराचे स्वरूप आमूलाग्र बदलले असते. परंतु तसे झाले नाही. याचे कारण म्हणजे १८ व्या शतकात मराठ्यांचा विस्तार भारतभर झाला हे होय. अटकेपासून कृष्णाथडीपर्यंत आणि मुर्शिदाबादेपासून द्वारकेपर्यंत मराठ्यांची सैन्ये सर्वत्र फिरू लागली. मराठी राजकारणाला भारतीय स्वरूप प्राप्त झाले. अनेक प्रांतांतील जाती आणि धर्म, त्यांचे सत्ताधीश आणि प्रजा यांच्याशी त्यांचा संबंध आला. मराठी राज्यकर्ते, सेनापती आणि मुत्सद्दी यांचे वरील मंडळींशी घनिष्ट संबंध आले. १८ व्या शतकातील मराठी पत्रव्यवहारांची संख्या काही कोटीपर्यंत जाते. सहाजिकच या भारतव्यापी राजकारणात मराठी पत्रव्यवहाराचे स्वरूप बदलत गेले. असंख्य फारसी शद्व पुन्हा पत्रव्यवहारात आढळू लागले. हे एका दृष्टीने अपरिहार्य होते. ही परिस्थिती १८१८ नंतर पालटली आणि मराठी शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाल्यानंतर फारसी शद्वांचे प्रमाण घटत चालले. ते आता शेकडा दहावर येऊन थांबले आहे.

अलीकडे मात्र मराठीतून सर्रास वापरले जात असलेले इंग्रजी राजव्यवहारातील शद्व काढून त्यांच्या जागी देशी किंवा मूळ संस्कृत शद्व वापरण्याची चळवळ सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनातर्फे प्रसिद्ध झालेल पदनामकोश किंवा निरनिराळ्या विषयांवरील परिभाषा कोश ही याच

चळवळीची फळे आहेत. अशावेळी आज मराठीत रूढ करण्यात येत असलेले काही शब्द राजव्यवहारकोशात आढळतात हे पाहून मोठी गंमत वाटते. सचिव, मंत्री, सभासद, न्यायाधीश, दुर्ग, कोशागार, शस्त्रागार, चषक, आदाय, सभा, लेखा, आय–व्यय, वेतन, ऋण (कर्ज), प्रतिभू (जामीन), कारागृह, आयपत्र, सहकारी, अनुक्रमणिका, संवाद, गणना–तीनशे वर्षानंतर सुद्धा हा कोश आजही उपयुक्त ठरू पहात आहे हे लक्षणीय आहे. या कोशातील एक शब्द तर आपले मन वेधून घेणारा आहे. राजदरबारातील खलबतखान्याला त्या काळात गुसलखाना म्हणत. आग्र्यातील दिवाण ई खासला बरीच वर्षे गुसलखाना हेच नांव होते. याला पर्याय रघुनाथ नारायणने मन्त्रस्थानं असा दिला आहे. आज ३०० वर्षांनी, मुंबईच्या सेक्रेटेरिएटला मंत्रालय हे नांव मिळालेले पाहून, शिवाजीमहाराज व रघुनाथ नारायण हणमंते यांच्या आत्म्यांस अगदी संतोष झाला असेल.

या कोशाचा अभ्यास अनेक पद्धतींनी करता येऊ शकेल. कोशातील विविध क्षेत्रातील लोकांचे, वस्तूंचे, व्यवहाराचे आणि परंपरांचे निदर्शक असे जे शब्द आले आहेत ते शिवकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनावर कितीतरी प्रकाश पाडून जातात. यातील अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे हुद्दे हे जुन्या राजवटीतूनच चालत आलेले असल्यामुळे या कोशाच्या अभ्यासामुळे विजापुरची आदिलशाही व अहमदनगरची निजामशाही या दोन्ही राज्यातील व्यवहाराची आपणाला सहज कल्पना येऊ शकेल. इतिहासाच्या अभ्यासकाला हे एक वरदानच आहे. कोश मर्यादित असला तरी रघुनाथ नारायणची वृत्ती बारीक व मर्मग्राही आहे. समाजाच्या सगळ्या थरांची वर्णने त्याने केली आहेत. कोशाच्या पण्यवर्गातील उल्लेख पहा–दुकान, चाटी, सराफ, सोनार, तांबट, कासार, खाती, सुतार, कुंभार, तेली, जुल्हई, वाणी, तांबोळी, फुलारी, बुक्केफरोस, मणियार, शिंपी, तारकशी, कागदकार, रंगारी, निळारी, पट्वेगर, लोणारी, जिनगर, बुरूड, बागवान असे किती म्हणून सांगावेत! केवढे विश्व रघुनाथ नारायणाने आपल्या डोळ्यासमोर उभे केले आहे! शिवकालातील एका कल्याणकारी राज्याचे हे स्वरूपच आपण पहात आहोत असे आपणाला वाटू लागते.

दक्षिणी उर्दू या भाषेच्या अभ्यासकांना हा कोश म्हणजे एक अमूल्य ठेवाच वाटावा. या कोशाची रचना १६७८ च्या सुमारास झाली असल्यामुळे उर्दू भाषेचा हा पहिलाच कोश म्हणावा इतके याचे महत्त्व आहे. उर्दू

साहित्याच्या प्रवाहाचे दोन भाग पडतात. एक दक्षिणीउर्दू व दुसरी आधुनिक उर्दू. या दोन्हीमधला संबंध सांगावयाचा झाल्यास ज्ञानेश्वर आणि महानुभाव-कालीन मराठी व आधुनिक मराठी असा सांगावा लागेल. दक्षिणी उर्दूचे साहित्य मोठ्या प्रगतावस्थेत पोचले होते. त्या साहित्यात फारसी शब्द कमी, हिंदी अधिक, भारतीय वातावरण अधिक चित्रित आणि भारतातील पुराणादी परंपरांची दखल हे या दक्षिणीउर्दू साहित्याचे विशेष होत. ही परंपरा चालू राहिली असती तर उर्दू आणि हिंदी एकजीव होऊन गेल्या असत्या आणि भाषेचा वाद शिल्लक राहिला नसता.

पण असे होणे नव्हते. उत्तर भारतात फारसी ही राजव्यवहाराची भाषा म्हणून ५०० वर्षे नांदली. लोक उर्दू आपली मातृभाषा म्हणून बोलत; पण साहित्याचे माध्यम म्हणून त्यानी उर्दू भाषेचा वापर केला नाही. दक्षिणी उर्दूचे वैभव पाहून त्यांचे डोळे दिपले. त्यातच नादिरशहाच्या स्वारीमुळे आणि दिल्लीतील भयंकर कत्तली व लुटालुटी यामुळे सामान्यांच्या मनात इराणबद्दल घृणा निर्माण झाली. आणि म्हणून ५०० वर्षे पर्यंत आपल्या साहित्याचे माध्यम म्हणून फारसी भाषेचा वापर करणारे कवी, इतिहासकार, कोशकार आणि इतर लेखक हे साहित्यासाठी उर्दूचा वापर करू लागले. ही परंपरा इ. १७३८ पासून सुरू झाली. दिल्लीतील राज्यकेन्द्रामुळे या उर्दू साहित्याने दक्षिणीउर्दूला मागे टाकले आणि एकेकाळची सर्वमान्य असलेली दक्षिणीउर्दू ही उपप्रादेशिक व मागासलेली ठरली. दिल्लीतील उर्दू साहित्यिक हे फारसी भाषेचे मोठे पंडित होते. त्यांनी उर्दूतून लिहिण्यास सुरूवात केली, तरी फारसीचा पगडा कांही जाईना. फारसी साहित्यातील संकेत, मध्यपूर्वेतील लैला-मजनू, युसुफ-जुलेखा, खुश्रोव-शीरीन इत्यादींच्या दंतकथा, फारसी वृत्तांचे अनुकरण, फारसी शब्दांचे प्राचुर्य हे उत्तरेतील उर्दूचे विशेष बनले. भारतीय वातावरण, भारतीय परंपरा, इत्यादींना खो बसला. हीच ती गेली २००-२५० वर्षे भारतभर पसरलेली उर्दू भाषा आणि तिचे साहित्य. दक्षिणी उर्दू व आधुनिक उर्दू यातील साम्य व फरक आता लक्षात यावीत. आद्य उर्दू म्हणून दक्षिणी उर्दूचा अभ्यास केल्याशिवाय उर्दू भाषेचा अभ्यास पूर्ण होत नाही. आता दक्षिणीउर्दूत कोणी लिहीत नाही. पण अद्याप ही भाषा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात व हैद्राबाद, विजापूर इ. शहरांत घरोघर बोलली जाते.

शिवाजीमहाराजांच्या प्रेरणेने रचल्या गेलेल्या या कोशात १६७८ मध्ये रूढ असलेल्या दक्षिणीउर्दूतील १००० हून अधिक शद्व आलेले आहेत. अभ्यासकांना ही मोठी पर्वणीच आहे. या दृष्टीने शिवाजीमहाराज हे उर्दू भाषेचे पहिले कोशकार तर ठरतातच, पण उर्दू संस्कृत या एकमेव कोशाचे प्रेरक ठरतात हे लक्षात घेतले पाहिजे. दुर्दैवाने उर्दूच्या विद्वानांनी या महत्त्व-पूर्ण घटनेची अजिबात दखल घेतली नाही. मुंबईमध्ये मी ही गोष्ट काढली तेव्हा लोकांचा विश्वासच बसेना. शिवाजीमहाराज आणि उर्दूचे कोशकार? त्यांच्या मनाला धक्काच बसला. ज्या गृहस्थांना मी ही गोष्ट सांगितली ते महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या पदावर असलेले गृहस्थ होते. त्यांचे नांव सांगण्याचे अनौचित्य मी करणार नाही. आता मात्र महात्मा गांधी मेमोरियल रिसर्च सेंटरचे संचालक डॉ. अब्दुस्सत्तार दळवी यांनी उर्दूमधून राजव्यवहारकोशाचे संपादनकार्य हाती घेतले आहे. गेली तीन वर्षे छपाईचे काम रेंगाळत आहे असे माझ्या ऐकिवात आहे. हे पुस्तक बाहेर पडावे आणि या निमित्ताने तरी उर्दू भाषिकांना शिवाजीमहाराजांच्या थोरवीची कल्पना यावी ही अपेक्षा.

राजव्यवहारकोशाच्या आतापर्यंत ५ आवृत्त्या निघाल्या. त्यापैकी चार आवृत्त्यांत फक्त संहितापाठ आहे. पाचवी आवृत्ती कै. डॉ. चिदंबर कुळकर्णी, मुंबई विद्यापीठ यांनी १९७६ मध्ये प्रसिद्ध केली. या आवृत्तीत कोशातील शद्बांची चर्चा करण्यात आली आहे. पण ती अपूर्ण असल्याची जाणीव होते. आता श्री. मराठे यांनी अत्यंत परिश्रम घेऊन ही आवृत्ती संपादित केली आहे. या आवृत्तीचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांनी रघुनाथ नारायणचे समकालीन संस्कृत कवी कवीन्द्र परमानंद आणि जयराम पिंडचे यांच्या शिवभारत, राधामाधवविलासचंपू आणि पर्णाल-पर्वतग्रहणाख्यान या ग्रंथांतील समानार्थी शद्बांची तुलना राजव्यवहारकोशा-तील शद्बांशी केली आहे. महेश्वराची अमरकोशावरील टीका प्रसिद्ध आहे. तिचाही उपयोग त्यांनी या कामासाठी केला आहे. कोशाच्या अभ्यासाच्या निमित्ताने शिवकालीन समाजाचे दर्शनही त्यांनी घडविले आहे. हे दोन्ही विशेष हा ग्रंथ लोकप्रिय करण्यास समर्थ ठरतील अशी खात्री आहे.

राजव्यवहारकोशातील अनेक शद्बांचे संशोधनही त्यांनी परिश्रमपूर्वक केले आहे. उदा.–ताम्र या शद्बाची व्युत्पत्ती. ताम्र हा शद्ब परक्यांच्या

बाबतीत कोणत्या परिस्थितीत वापण्यात येऊ लागला, या बाबतीत त्यांचे विवेचन आहे. मराठीतील तांबे व संस्कृतातील ताम्र याला दुसरा पर्याय म्लेच्छमुख हा आहे. पण म्लेच्छमुख हा शब्द उघडपणे म्हणणे अवघड होते. म्हणून कूटभाषेत ताम्र हा शब्द उपयोगात आला. पुढे ताम्र याचा अर्थ तांबड्या तोंडाचा असा होऊन तो इंग्रजानाही वापण्यात येऊ लागला. हे एकच उदाहरण मराठे यांच्या व्यासंगाची साक्ष देण्यास पुरेसे आहे.

'वसुधा'
देवीदयाळ मार्ग, मुलुंड पश्चिम,
मुंबई.

सेतुमाधवराव पगडी
१०-६-८१

(ही प्रस्तावना लेखरूपाने रविवार १-१२-८१ रोजी लोकसत्तेत आली होती. परंतु याचवेळी संप झाल्याने त्या लोकसत्तेचे महाराष्ट्रात वितरण झाले नाही. पुढे लोकसत्ता पुन्हा सुरू झाल्यावर २१-२-८३ (रविवार) त्याचे पुनर्मुद्रण केले होते.)

— विवेचन —

राजव्यवहारकोश हे रघुनाथपंडिताच्या वैदग्ध्याचे व शिवाजी-महाराजांच्या सर्वंकष प्रज्ञेचे प्रतीक आहे. शिवछत्रपतींच्या प्रेरणेने रचल्या गेलेल्या या कोशाची नांवे पुढीलप्रमाणे आढळतात. १) राजव्यवहारकोश २) राजकोश ३) राज्यव्यवहार कोश ४) राजकोशनिघण्टु ५) व्यवहारकोश ६) शिवराजकोश ७) श्रीछत्रपतिराजकोश ८) श्रीशिवछत्रपतिराज-व्यवहार कोश.

'राजव्यवहारकोश' हेच या ग्रंथाचे मूळ अभिप्रेत नांव असावे असे उपोद्घातातील श्लोक क्र. ८१ मधील 'नृपव्याहारार्थं' या शद्बरचनेवरून दिसते. उल्लेख करण्यास सोपे व सुटसुटीत म्हणून राजव्यवहारकोशाचे 'राजकोश' असे नांव पुढे रूढ झालेले दिसते. प्रस्तुत आवृत्ती ज्या हस्तलिखितांना आधार मानून संपादित केली आहे त्या हस्तलिखितांवर राजकोश हेच नांव आहे व तेच नांव ग्रंथाला कायम केले आहे.

'राज्यव्यवहारकोश' हे नांव केवळ रा. गो. काटे यांनी संपादित केलेल्या प्रतीवर आहे. ही प्रत त्र्यं. शं. शेजवलकर यांनी संदर्भग्रंथ म्हणून स्वीकारल्याने त्यांनी आपल्या 'संकलिपत शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने' या ग्रंथातील काही लेखांमध्ये 'राज्यव्यवहारकोश' असे म्हटले आहे.

तंजावर येथील सरस्वतीमहाल लायब्ररीतील हस्तलिखितांची जी सूची[१] आहे त्यावरून असे दिसते की, त्यांतील सर्वच कोशांच्या नांवांपुढे 'निघण्टु' हा शद्ब जोडला आहे. मात्र पोथीवर तो निघण्डु असा लिहिला आहे. वास्तविक निघण्टु आणि कोश या शद्बांचे अर्थ एकच आहेत. पण कोशनामापुढे निघण्टु शद्ब जोडून भाषांतरसमास करण्याची दाक्षिणात्य पद्धती असण्याची शक्यता आहे.

वर दिलेल्या यादीतील शेवटची चार नांवे तंजावर हस्तलिखित संग्रहातील 'राजकोशनिघण्टु' च्या नकलेतील असून ती वर्गांची समाप्ति दर्शविणाऱ्या वाक्यात आली आहेत. हे वाक्य सर्वत्र असे असणे योग्य, 'इति श्रीमन्नारायणाध्वरिवरसूनुना शिवच्छत्रपतिप्रियामात्येन रघुनाथपण्डितेन

विरचिते राजव्यवहारकोशे ········ वर्गः समाप्तः ।' पूर्वी ग्रंथ हाताने लिहून काढावे लागत. या कामात शरीरकष्ट फार होत असल्यामुळे [२] प्रत तयार करणाऱ्या लेखकाची प्रवृत्ती पुन्हापुन्हा येणाऱ्या, कमी महत्त्व असलेल्या व वाचकाला कल्पनाशक्तीने जाणून घेता येणाऱ्या गोष्टी टाळण्याची किंवा लघुरूपाने लिहिण्याची असे. अशा प्रवृत्तीतूनच कळत नकळत ही नांवे निर्माण झाली असावीत. ग्रंथकर्ता कोण आहे हे निश्चित कळणारे असल्यामुळे त्याचे नांव व पदव्या गाळून 'शिवराजकोश' इ. इकडे तर संक्षिप्त व इकडे तर अर्थवाही नांवे अशा रीतीने हस्तलिखितांच्या मूळ लिपिकांनी केली असावीत.

आधुनिक काळात ज्याला राज्यशास्त्र म्हटले जाते, त्या विषयाची चर्चा करणारे प्राचीन भारतीय ग्रंथ अर्थशास्त्र, राजनीति, राजधर्म, नीतिसार अशी नांवे धारण करणारे आहेत; ही नांवे भिन्न असली तरी या ग्रंथांत हाताळलेले विषय सारखेच आहेत. या शास्त्रांचा संबंध केवळ राजा या व्यक्तिपुरताच मर्यादित नसून सैन्य, खजिना, विविध तऱ्हेची संपत्ती, उत्पन्नाची साधने, लोकांचे व्यवसाय इ. जीवनव्यापी विषयांशी संबद्ध आहे. त्यामुळे या ग्रंथांमधून दागिन्यांची नांवे; हत्ती, घोडे यांचे प्रकार; सैन्याच्या हालचाली; शस्त्रे; शेती व इतर उद्योग; हेरगिरी इ. विषय हाताळले आहेत. पूर्वाचार्यांचे ऋण मानणाऱ्या रघुनाथपंडिताने सुद्धा हेच विषय आपल्या कोशात हाताळले आहेत. फरक एवढाच की, त्या ग्रंथांतून त्या त्या विषयांवरील मतमतांतरांची चर्चा केली आहे; तर हा ग्रंथ कोश असल्यामुळे येथे त्या त्या विषयातील दख्खनीयावनी भाषेतील शब्दांचे संस्कृत पर्याय दिले आहेत. या पर्यायी शब्दांचे वर्गीकरण ज्या दहा वर्गांत केले आहे, त्या वर्गांची बव्हंश नांवे प्राचीन परंपरेतील राज्यशास्त्रीय ग्रंथांना अनुसरणारी वाटतात. त्यामुळे प्राचीन भारतीय राज्यशास्त्रात राजा या शब्दाला जो समावेशक संदर्भ होता, तोच रघुनाथपंडिताच्या कोशाच्या नांवातील राजा या शब्दाला आहे. यासाठी या कोशाची 'राजव्यवहारकोश', 'राज्यव्यवहारकोश' 'राजकोश' ही नांवे अर्थवाही आणि स्वीकार्य वाटतात.

ग्रंथकर्तृत्व कोणाचे ?

या कोशाची प्रेरणा शिवछत्रपतींनी रघुनाथाला दिली. त्यांच्या आज्ञेवरून रघुनाथाने तो रचला असे उपोद्घातातील श्लोकांवरून दिसते.

परंतु या कोशाच्या अखेरीला हा कोश धुंडिराज व्यास याने लिहिला असे म्हटलेले असल्याने खरा ग्रंथकार कोण असा प्रश्न निर्माण होतो. कोशाच्या आंतर्गत रचनेवरून असे स्पष्ट दिसते की या कोशाचा आराखडा प्रथम निश्चित केला गेला होता. हा आराखडा तयार करणारा माणूस हा राजव्यवहाराशी अत्यंत जवळून परिचित असला पाहिजे. रघुनाथपंडित हा राजव्यवहारात मुरलेला तर होताच; पण अनेक कलांचे मर्म जाणणारा होता.[3] म्हणूनच त्याने कित्येक ठिकाणी मोठ्या साक्षेपाने तपशिलवार यादी दिली आहे. कोणत्या गोष्टींचा उल्लेख कोणत्या वर्गात करावा याचे तारतम्य रघुनाथासारखा मुरब्बीच दाखवू जाणे ! धुंडिराजाचे 'कोशोऽयं ढुंढिराजेन रघुनाथमुदे कृतः ।' हे वाक्य आणि उपोद्घातातील उल्लेख पहाता हा कोश 'रघुनाथपंडितानेच रचण्यास घेतला असला पाहिजे असे दिसते. धुंडिराज व्यास नेमका कोण होता हे कळत नाही. परंतु तो रघुनाथाचा एखादा विश्वासू सेवक असला पाहिजे रघुनाथाने कोशाचा आराखडा रचून व काहीं भाग स्वतः पूर्ण करून उर्वरित भाग धुंडिराजा-कडून आपल्या देखरेखीखाली करवून घेतला असण्याची शक्यता आहे. तसे असेल तर धुंडिराजाने हा कोश पुरा केला असे म्हणता येईल. सर्व कोश अनुष्टुभ छंदात रचला असूनसुद्धा लेखनवर्गातील 'अभिदधते यवनगिरा …' हा ७६ वा श्लोक मात्र आर्यावृत्तातील आहे. हा वृत्तबदल एकाचे कर्तृत्व संपून दुसऱ्याचे सुरू झाले हे सुचविण्यासाठीही केला असेल. अर्थात याबाबत निर्णायक विधान करणे अन्य प्रमाणांशिवाय योग्य नाही; हा केवळ तर्क आहे. परंतु कोणत्याही परिस्थितीत या कोशाच्या रचनेत रघुनाथपंडिताचा वाटा सिंहाचा आहे हे निश्चित.

रघुनाथपंडिताचे अल्प चरित्र[४]–रघुनाथ नारायण हणमंते असे आधुनिक पद्धतीने रघुनाथ पंडिताचे नांव सांगता येईल. नारोपंत दीक्षित किंवा नारो त्रिमळ हणमंते हे रघुनाथपंडिताचे वडिल. त्यांनी यज्ञयाग केल्यामुळे त्यांना दीक्षित ही पदवी प्राप्त झाली होती. त्यांचे वडिल त्रिमळ किंवा त्रिमल्ल (राजवाड्यांच्या मते त्र्यंबक) हे फार पराक्रमी योद्धे होते हनुमंताप्रमाणे ते रणांगणात सदैव आघाडीवर असत. त्यामुळे त्यांना हणमंते हे नांव मिळाले.[५] हे हणमंते मुद्गलगोत्री ब्राह्मण असून ते मूळचे गंगाप्रांतीय नगर, औरंगाबाद इकडील होते असे राजवाडे म्हणतात.[६] त्यांच्या मते हणमंते हे आडनांव गावावरून पडलेले आहे.

नारायणपंत हणमंते हे लखुजी जाधवांकडून जिजाबाईचे पाठराखणे म्हणून शहाजीकडे आले व त्याच्या कर्नाटकातील जहागिरीत कारभारी म्हणून राहिले. त्यांच्याकडे मुजुमदारी होती. ते शहाजीचे धीसचिव म्हणजे निकटवर्ती सल्लागार होते. रघुनाथ व जनार्दन हे त्यांचे दोन्ही सुपुत्र शहाजीकडेच होते. जनार्दन पंडित हा मोठा रुबाबदार चालचलणूक असलेला व शिव आणि विष्णू या देवतांचा उपासक होता. कर्नाटकात शैव आणि वैष्णव असे दोन परस्परविरोधी कट्टर पंथ आहेत. या दोहोंचा मिलाफ जनार्दन पंडिताने भागवतधर्मात केला. राजकोशाच्या उपोद्घातात त्याचे पडसाद उमटलेले दिसून येतात.[७]

रघुनाथ हा वयाने तरुण पण बुद्धीने अत्यंत पोक्त व अनेक कलांचे मर्म जाणणारा असा होता.[८] रघुनाथ पंडित शिवाजीला येऊन मिळाला तो काळ व त्याची कारणे याविषयी इतकी भिन्न माहिती मिळते की त्यातून ठाम निष्कर्ष काढणे कठिण आहे. शिवाजीचा दक्षिण दिग्विजय व त्यामागे असलेला रघुनाथाचा हात, रघुनाथाचा मृत्यू या घटनांही मतमतान्तरांनी गजबजलेल्या आहेत.

नारायण हणमंते यांच्या मृत्यूनंतर रघुनाथाचा भाऊ जनार्दन हा शिवाजीकडे आला (सरदेसाई–न्यू हिस्ट्री ऑफ मराठा). श्रीनिवासाचारी यांचे मत असे की १६६४ मध्ये शहाजीचा मृत्यू झाल्यानंतर रघुनाथ व जनार्दन हे दोन्ही बंधू व्यंकोजी एकोजीशी एकनिष्ठ होते. मात्र पुढे हे दोन्ही बंधू व व्यंकोजी एकोजी यांच्यातील मतभेद वाढत गेले व ते दोघेही शिवाजीला येऊन मिळाले. (J.I.H.1931 P.102) शहाजीच्या पश्चात रघुनाथ व्यंकोजीच्या नावाने बंगळूरच्या जहागिरीचा कारभार पहात असे. जदुनाथ सरकारांच्या मते व्यंकोजी लहान असताना रघुनाथाने सत्तेचा दुरूपयोग व द्रव्यापहार केल्याने पुढे दोघांच्यात वितुष्ट आले. डॉ. बाळ–कृष्णांच्या मते व्यंकोजी मुसलमान सल्लागारांच्या आहारी जाऊन राज्याकडे दुर्लक्ष करीत होता. रघुनाथाने त्याला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला; पण तो फसल्याने रघुनाथ शिवाजीकडे आला.

इ. स. १६७६ च्या फेब्रुवारी मार्च महिन्यात शिवाजीमहाराज सातारा येथे दीर्घमुदतीच्या आजारात सापडले होते. याच सुमाराला रघुनाथ

त्यांना येऊन मिळाला असावा. या वेळी त्याने चाफळला जाऊन रामदासस्वामींचे दर्शन घेतले. 'तुझे मनोरथ पूर्ण होतील' अशा स्वरूपाचा आशीर्वाद रामदासांनी त्याला दिला असावा. 'तंजावरहून तू मला रामाच्या मूर्ती पाठवून दे' असेही त्यांनी रघुनाथाला काम सांगितले. या मूर्ती माघ वद्य ५ म्हणजेच समर्थांच्या निर्वाणापूर्वी चार दिवस येऊन दाखल झाल्या.[९]

राजव्यवहारकोशाच्या उपोद्घातात (श्लो. ७८) दक्षिण दिग्विजय, गोवळकोंड्याचे राजकारण या सर्व गोष्टी शिवाजीमहाराजांनी आपल्या सल्लामसलतीने केल्या असे रघुनाथ म्हणतो. शेजवलकर मात्र याचे श्रेय अबुल हसन कुतुबशहाचा कारभारी मादण्णा याला देतात. हरून खान शेरवाणी मात्र वेगळेच मत देतात. रघुनाथ व्यंकोजीला आकस्मिकपणे सोडून हैद्राबादला आला. तिथे मादण्णाने त्याचे खुले स्वागत केले. कारण मादण्णा मुस्लीम राजाचा कारभारी असूनही, त्याचा संस्कृत भाषा, हिंदू धर्म व तत्त्वज्ञान यांच्याकडे कल जास्ती होता. त्याने अबुल हसन व रघुनाथ यांची भेट घडवून आणली. या भेटीत रघुनाथाच्या शुद्ध व अस्खलित फार्सी भाषेने अबुल हसन अतिशय प्रभावित झाला. शिवाजीबरोबर मैत्री जोडणे कसे फायद्याचे आहे हे रघुनाथाने मादण्णाला पटवून दिले. ही मैत्री आपल्या डोळ्यासमोर नष्ट होत चाललेल्या हिंदू धर्माला तारील असे रघुनाथ मादण्णाला म्हणाला.[१०]

शिवाजीमहाराजांच्या दक्षिण दिग्विजयात रघुनाथ पंडिताने मोलाची कामगिरी बजावली ही गोष्ट निर्विवाद. मद्रासेकडील प्रदेश जिंकण्याची सुलभता व फायदेशीरपणा रघुनाथ पंडितानेच महाराजाना पटवून दिला होता. शिवाजीमहाराजांनी कर्नाटक प्रांतावर स्वारी केली त्यावेळी रघुनाथ त्यांच्याबरोबर होता. त्याला कन्नड भाषा, प्रदेश व तेथील राजकारण उत्तम रीतीने माहिती असल्याने महाराजानी त्याला बरोबर घेतले होते. मात्र गोवळकोंडा येथे शिवाजी, अबुलहसन व मादण्णा यांची भेट झाली त्यावेळी रघुनाथ तिथे नव्हता. महाराज श्रीशैलास गेले असता त्या ठिकाणी श्रीमल्लिकार्जुनास आपले शिरकमल वहावे असे त्याना वाटले; पण रघुनाथाने त्याना उपदेश करून त्यापासून परावृत्त केले असे बखरीत आलेले वर्णन काल्पनिकच आहे. तिरुमलवाडा येथे महाराज छावणीत असता रघुनाथ महाराष्ट्रातून येऊन त्याना मिळाला. दक्षिण दिग्विजय समाप्त झाल्यानंतर जिंकलेल्या राज्यात अनुभवी, पोक्त व स्वराज्याच्या

ध्येयाशी एकरूप झालेला माणूस तेथे ठेवणे आवश्यक होते. रघुनाथपंत असा माणूस होता. त्याला तिकडील प्रदेश, भाषा, राजकारण यांचे उत्तम ज्ञान होते. त्यामुळे जिंजीचा सर्वाधिकारी म्हणून त्याची नेमणुक होणे स्वाभाविक होते. मात्र त्या प्रांताचा सुभेदार एवढीच त्याची नेमणुक नव्हती. त्याला अमात्य (मुजुमदार) हे पद देऊन कर्नाटक, बालेघाट हा प्रदेशही त्याच्या हाताखाली दिला. रघुनाथाने आपल्या हाताखालील प्रदेशाची मुलकी व लश्करी व्यवस्था चोख व उत्तम ठेवली होती. या प्रांतातील कितीतरी पडिक जमीन त्याने लागवडीखाली आणली. ज्या जमिनीवर केवळ काटेरी झुडपे होती ती जमीनही त्याने स्वच्छ करून लागवडीखाली आणली. त्याच्या बरोबर महाराष्ट्र व कर्नाटकातून अनेक ब्राह्मण नोकरीसाठी म्हणून गेले होते. त्यांच्याकडून त्याने हे शेतीचे काम करवून घेतले असे दिसते.[११]

तिरुवन्नमलाई येथील समोत्तिपेरुमल मंदिराचे म्हणजेच अरुणाचलम्चे यवनांनी मशिदीत रूपांतर केले होते. रघुनाथाने त्याचे पुन्हा मंदिरात रूपांतर केले. दक्षिण अर्काट जिल्ह्यात श्रीमुष्णम येथे याच नांवाने प्रसिद्ध असलेले भूवराहस्वामीचे मंदिर आहे. या मंदिराचे तसेच वृद्धाचलम आणि जगप्रसिद्ध नटराजमंदिराचे दरवाजे सुमारे ४८ वर्षे यवनानी बंद करून टाकले होते. श्रीमुष्णममधील बहुसंख्य हिंदूंना बाटवले होते. गावातील हिंदूंनी अनेकवार प्रयत्न करूनही या मंदिरांचे दरवाजे त्यांना उघडता आले नाहीत ४८ वर्षांच्या काळात पूजा व उत्सव होऊ शकले नाहीत. रघुनाथपंडिताने हे दरवाजे उघडून पूजोत्सव पुन्हा सुरू केले. मात्र त्यापूर्वी त्याने शैव, वैष्णव व माध्व या तिन्ही पंथांच्या लोकांना एकत्र येऊन देवळांची व्यवस्था ठेवण्यास सांगितले. अशा तऱ्हेने एकमेकांना पाण्यात पहाणाऱ्या या तीन पंथांना रघुनाथाने एकत्र आणले. बाटलेल्या बहुसंख्य लोकांचे शुद्धीकरणही रघुनाथाने करविले.[१२]

नोव्हेंबर १६७८ मध्ये फ्रेंचानी एक ब्राह्मण दूत जिंजीला रघुनाथाकडे पाठविला होता. फ्रेंचांनी पाँडिचेरी येथील व्यापार जवळजवळ बंद केल्याने राज्याचा महसूल घटत आहे, अशी तीव्र नाराजी त्याच्याजवळ रघुनाथाने व्यक्त केली. फ्रेंचांच्या या कृतीमुळे देवनापट्टण जवळील डचांनी आपलाही व्यापार बंद करण्याची धमकी दिल्याचे रघुनाथाने सांगितले. अशा परिस्थितीत फ्रेंचांनी रघुनाथाला सैनिकांच्या खर्चासाठी दहा हजार होन कर्ज द्यावे

तरच पाँडिचेरीला दोन वर्षे रहाण्यास त्यांना परवानगी दिली जाईल असे त्याने दूताला सांगितले. फ्रेंचांनी पाँडिचेरीजवळील अनेक गावांचे उत्पन्न स्वतःला घेऊन कर्जाच्या रकमेची वसुली करावी असेही त्याने सुचविले. त्यावर ब्राह्मण दूताने रघुनाथाच्या नजरेला आणून दिले की जून १६७७ मध्ये शिवाजीने फ्रेंचांच्या दूताला दिलेल्या आश्वासनांच्या विरुद्ध रघुनाथाची मागणी होती युरोपातून गलबते येताच आम्ही व्यापार वाढवू; सध्या आमच्याजवळ पैसा नसल्याने आम्ही कर्ज देऊ शकत नाही, असे दूताने सांगितले. रघुनाथानेही आपल्या मागणीचा अधिक पाठपुरावा केला नाही. मार्टिन म्हणतो की डचांनी रघुनाथाचे फ्रेंचांविरुद्ध कान फुंकल्याने त्याने हा पवित्रा घेतला होता.

जानेवारी १६८१ च्या सुरुवातीला रघुनाथपंडिताचे कानाचे जुने दुखणे पुनः सुरू झाले. पूर्वी त्यावर भारतीय वैद्य, हकीम, इंग्लीश व डच डॉक्टरानी उपचार केले होते; परंतु गुण आला नव्हता. त्याने मार्टिनला एखादा फ्रेंच डॉक्टर पाठविण्यास लिहीले. त्यानुसार १० जानेवारी १९८१ रोजी सिऊर पेटिटबॉइस हा फ्रेंच डॉक्टर त्याच्याकडे जिंजीला आला. परंतु त्याची व रघुनाथाची भेट झाली नाही. स्वराज्यात शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर सत्तांतर घडून आले होते. संभाजी गादीवर आला होता. रघुनाथ आपल्याविरुद्ध गोवळकोंड्याचा राजा व इतर हिंदू राजे यांच्या मदतीने कट रचित आहे अशी अफवा संभाजीच्या कानी गेली. त्यामुळे त्याने रघुनाथाला अटक करण्याची आज्ञा सोडली. त्यानुसार रघुनाथाला त्याच्या रहात्या घरात अटकेत ठेवले होते. कोल्हापुरला असलेल्या जनार्दन पंडितालाही अटक झाली होती. रघुनाथ अटकेत होता याचा अर्थ त्याचे अधिकार स्थगित केले होते व त्याच्या हिंडण्या-फिरण्यावर निर्बंध घातले होते. त्याला वागणुक चांगली दिली गेली होती. तो भेटीगाठी घेऊ शकत होता. मात्र त्याच्याभोवती सतत सशस्त्र पहारा होता. पेटिटबॉईस जानेवारीच्या मध्यावर पुन्हा एकदा जिंजीला गेला. यावेळी तो रघुनाथाला भेटला व त्याच्या कानावर त्याने यशस्वी उपचारही केले.[१३]

फेब्रुवारी महिन्यात संभाजीने जनार्दन पंडिताला मुक्त केले व रघुनाथावरील कैद उठवून त्याला पूर्वीचेच अधिकार परत दिले.[१४]

रघुनाथपंतांच्या मृत्यूबद्दल विविध मते दिसतात. संभाजीने राज्याची सूत्रे ग्रहण करताच अनेक जुन्या मुत्सद्दी लोकांना मारून टाकले. या घटनेने कष्टी होऊन संभाजीला उपदेशाचे चार शब्द सांगण्यासाठी रघुनाथ आला असता संभाजीने संतापून त्याला रायगडावरून लोटून देऊन ठार केले, असे शेडगावकर बखरीत म्हटले आहे. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या ज्ञानकोशात अशी माहिती आहे–रघुनाथपंतांच्या उपदेशाने थोडे ताळ्यावर येऊन संभाजी वागू लागला. पुढे रघुनाथ कर्नाटकात जात असता चंदी या गावी १६८२ साली मरण पावला.

श्री. सरदेसाई (पूर्वोक्त ग्रंथ) व डॉ. कमल गोखले यांच्या पुस्तकां–वरून असे कळते की संभाजी व रघुनाथ यांची १६८२ च्या अखेरीला भिरवडीला भेट झाली. या भेटीत संभाजीने रघुनाथाला चांगले वागविले. पुढे ४ मे १६८३ ला रघुनाथ वळण येथे मरण पावला.

कोशाचा रचनाकाल :– शिवाजी महाराजांनी हा कोश आपल्या अभिषेकप्रसंगी रचवून घेतला अशी सर्वसाधारण कल्पना आहे. परंतु त्याकाळी म्हणजे १६७४ मध्ये रघुनाथपंडित महाराजांच्या पदरी नसून बंगलूरला व्यंकोजी राजाच्या सेवेत होता. १६७७ मध्ये तो महाराजांना येऊन मिळाला. उपोद्घातातील श्लोकांवरून असे दिसते की शिवाजी–महाराजांनी दक्षिणदिग्विजय केल्यानंतर रघुनाथ पंडिताला जिंजी प्रांताचा सरसुभेदार केले. त्याला अमात्यपद दिले. जिंजीमध्ये राहून रघुनाथपंडिताने सुधारणा घडवून आणल्या. जमीन लागवडीखाली आणली–ब्राह्मणांना कामधंदा मिळवून दिला. तिथल्या देवदेवतांची पुन्हा प्रतिष्ठापना केली. व सर्व स्थिरस्थावर करीत असतानाच कोशरचनेचे काम हाती घेतले. हा काळ १६७७-७८ हा असावा असे दिसते. महाराजांच्या मृत्यूपूर्वी कोश तयार झालेला होता व महाराजांचे ज्या प्रकारे कारभाराकडे लक्ष होते त्याचा विचार करता तो त्यांनी निदान नजरेखालून तरी घातला असावा असे दिसते.

राजव्यवहारकोशाच्या आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या मुद्रित आवृत्त्यांचा काही तपशील येथे नमूद करणे योग्य वाटते.

१) राजव्यवहारकोश :- संपादक व प्रकाशक–काशीनाथ गंगाधरजी क्षत्री (खत्री)

मुंबईतील गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यात छापून हा ग्रंथ इ. स. १८६० (शके १७८१) मध्ये छापला. ही या कोशाची पहिली छापील आवृत्ती. या कोशाची ३६ पाने कोशाकरिता असून दोन पानांची छोटी प्रस्तावना आहे. पुस्तकात केवळ कोशसंहिताच असून ती दहा वर्गात क्रमाने दिली आहे.

त्याकाळी मराठी व्याकरणाचा ग्रंथ सरकारी आश्रयाने प्रसिद्ध झाला होता. पण व्याकरणाचे भावंड शोभणारा संस्कृतप्राकृतमिश्रित कोश भाषा–ज्ञानासाठी आवश्यक होता. राजव्यवहारकोश ही गरज भागविणारा असून त्याच्या वाचनाने हजारो संस्कृतशब्द मनात ठसून मराठी भाषेची प्रौढता आणि माहितगारी वाढेल असे वाटल्यावरून क्षत्री यांनी लोकोपयोगार्थ हा ग्रंथ प्रसिद्ध केला.

"आम्ही हा कोश छापावा हे मनात धरून महत् प्रयासाने दोन तीन प्रती मिळविल्या. त्यात कित्येक हस्तदोष, शब्दभेद व प्राचीन काळच्या दरबारात जे शब्द वापरीत होते त्यांचे तर अगदी अपभ्रंश आढळण्यात आले. त्या प्रती एकत्र करून संस्कृत व फारसी जाणणाऱ्यांचे साहाय्य घेऊन त्यात होईल तितकी सुधारणूक करून छापून प्रसिद्ध केला."

क्षत्रींनी प्रसिद्ध केलेल्या या आवृत्तीला पुढे 'सर्व प्रचारातील आवृत्ती' The Vulgate चे महत्त्व प्राप्त झाले. (या आवृत्तीची प्रत मुंबई मराठी ग्रंथ -संग्रहालय, दादर येथे आहे

२) राजव्यवहारकोश :– संपादक – काशिनाथ नारायण साने
मुद्रक :– शिवाजी छापखाना, पुणे.
प्रकाशनवर्ष – इ. स. १८८० (शके १८०२)

श्री. साने यांना या कोशाच्या दोन पोथ्या मिळाल्या होत्या. त्यातील एक सातारा येथील राजोपाध्ये यांच्याकडून मिळाली. ही प्रत फारच जुनी म्हणजे शके १७२५ (इ. स. १८०३) मधील होती–दुसरी प्रत पुणे येथील

रा. रा. गणपतराव सोहोनी यांच्याकडील असून ती बरीच अशुद्ध होती. साने यांनी काशिनाथ गंगाधरजी क्षत्री यांची प्रत मूळ मानून ती प्रसिद्ध केली व त्याखाली त्यांना मिळालेल्या प्रतीवरून पाठभेद दिले. अशा रीतीने पाठभेदयुक्त अशी ही पहिलीच आवृत्ती होय. साने यांनी प्रथमच या आवृत्तीत काही शद्बांची सूची बनवून त्यांचे अर्थ दिले आहेत. मात्र या आवृत्तीला चिकित्सक आवृत्ती किंवा संशोधित आवृत्ती म्हणता येणार नाही.

आपल्या प्रस्तावनेत साने यांनी पुढील विधाने केली आहेत. 'या कोशाच्या रचनेनंतर लौकरच महाराजांचा मृत्यू होऊन या कोशाचा उपयोग होण्याचा संकल्प मागे पडला. संभाजीला अशा काही गोष्टींची पर्वा नव्हती व राजारामाचे आयुष्य धामधुमीत गेले. शाहूराजा मोगली रीतिरिवाजात वाढल्याने त्याला यावनी रीतिरिवाज, थाटमाट व शद्ब प्रिय होते. त्यामुळे त्याने त्यांचे उच्चाटन तर केले नाहीच, पण नवीन शद्बांची भर मात्र केली. पुढे यावनी साम्राज्यात मराठेशाहीचा विस्तार झाला व यावनी शद्बांची संख्या वाढली."

का. ना. साने संपादित या ग्रंथाची एक जीर्णशीर्ण प्रत मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे (Mar / P. C. / Rag 245545)

३) शिवचरित्रप्रदीप या सन १९२५ मध्ये स. म. दिवेकर, भा. इ. सं. मं., पुणे यानी प्रकाशित केलेल्या ग्रंथात समाविष्ट केलेली राजव्यवहारकोशाची प्रत. (पृ. १३७ ते १७७)

ही प्रत काशिनाथ नारायण साने यानीच संपादित केली असून या प्रतीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे तिला असलेला संस्कृत भाषेत रचलेल्या ८४ श्लोकांचा उपोद्घात व ५ श्लोकांचा उपसंहार.

साने यांना विष्णू धोंडदेव भागवत वीरमाडकर यांनी कोल्हापूरहून एक फारच जुनी व चांगली लिहिलेली हस्तलिखित प्रत पाठवून दिली होती. त्या प्रतीत हा उपोद्घात उपसंहार होता. अशा तऱ्हेची आणखी प्रत मिळते काय याचा शोध साने यांनी घेतला. पण त्यात त्यांना अपयश आले. पुढे ते आपली नवी आवृत्ती प्रकाशित करणार होते. पण त्यांना असे कळून आले की प्रसिद्ध इतिहास संशोधक श्रीमंत सरदार गंगाधरराव नारायणराव तथा

आबासाहेब मुजुमदार आणि द. वि. आपटे राजव्यवहारकोश प्रसिद्ध करू इच्छित आहेत. कोशातील यावनी शद्ब फारसी लिपीत लिहून त्यांचा समावेश एखाद्या आवृत्तीत करावा अशी साने यांची इच्छा होती. आपटे, मुजुमदार द्वयी फारसी भाषा उत्तम जाणणारी होती. त्यामुळे साने यांनी आपली कोल्हापूर प्रतीसह सर्व सामग्री आपटे-मुजुमदारांना दिली.[१५]

आपटे-मुजुमदार हा कोश प्रसिद्ध करू शकले नाहीत. पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळात जाऊन मी श्री. ग. ह. खरे यांना भेटलो असता त्यानीही या म्हणण्याला दुजोरा दिला. मात्र आपटे मुजुमदार यांनी त्या कोल्हापुर प्रतीचे काय केले हे सांगण्यास ते असमर्थ ठरले. आपटे-मुजुमदार यांनी आपणाकडील सर्वच कागदपत्रे मंडळाला दिली असल्याने ती प्रतही मंडळाकडेच असणार असे वाटून खरे यांनी स्वत: सूची इ. पाहिले. मंडळाकडे या कोशाच्या दोन प्रती असल्याचे आढळले; पण त्यात कोल्हापुर प्रत नाही असे दिसून आले. खरे यांनी राजव्यवहारकोशाच्या संदर्भात असलेली कै. द. वि. आपटे यांनी लिहिलेली एक छोठी अत्यंत जीर्णशीर्ण झालेली वही दाखविली. या वहीत देवनागरी लिपीत लिहिलेले यावनी शद्ब, संस्कृतशद्ब व यावनी शद्बांचे फारसी लिपीतील लेखन एवढ्याच गोष्टी होत्या. क्वचित एखाद्या शद्बापुढे इंग्रजीतून टिपण केलेले होते.

४) राज्यव्यवहारकोश-संपादक - श्री. गो. काटे. प्रकाशक-रा. बा. माढेकर, अध्यक्ष, मराठवाडा साहित्य परिषद, इसामियाँ बाजार, हैद्राबाद. प्रकाशनवर्ष-१९५६ पृष्ठे ५५+३१

पॉकेट बुकच्या आकाराची ही छोटेखानी प्रत शिवचरित्रप्रदीपातील राजव्यवहारकोशावरून जशीच्यातशी उपोद्‌घात, उपसंहार, पाठभेदांसह तयार केली आहे. शेवटच्या ३१ पानात कोशातील सर्व यावनी शद्बांची अकारादिविल्हे पूर्ण सूची दिली आहे. संदर्भासाठी शद्बांपुढे श्लोकांचे क्रमांक दिले आहेत. मात्र संस्कृत प्रतिशद्ब आणि अर्थ दिलेले नाहीत.

आपली आवृत्ती ही कोशाची काशित झालेली तिसरी आवृत्ती आहे, असे काटे प्रस्तावनेत म्हणतात. त्यांच्या दृष्टीने १८८० मधील शिवाजी छापखाना प्रत पहिली व शिवचरित्रप्रदीपात समाविष्ट असलेली प्रत दुसरी होय.

५) राजव्यवहारकोश–संपादक – डॉ. चिदंबर कुळकर्णी, प्रकाशक – अ. ल. लिमये, प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, १७२ मुं. म. ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई १४, प्रकाशनवर्ष १९७६

डॉ. चिदंबर कुळकर्णी हे मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे रीडर होते. त्यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयात असलेल्या, १८८० मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रतीच्या झेरॉक्स प्रती काढून त्यावरून आपली प्रत तयार केली. या प्रतीला अर्थातच उपोद्‌घात, उपसंहार नाही. तसेच पाठभेदही गाळले आहेत. शिवाजी छापखान्याने १८८० मध्ये प्रसिद्ध केलेल्या ग्रंथाच्या प्रती दुर्मिळ होऊ लागल्याने कुळकर्णी यांनी आपली संशोधित म्हणून आवृत्ती काढली व त्या आवृत्तीला दुसरी आवृत्ती असे म्हटले आहे.

या आवृत्तीला त्यांनी ३–४ पानांची प्रस्तावना लिहून राजव्यवहार–कोश हा शिवकालीन राज्यशासन, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक स्थितीवर उपयुक्त प्रकाश पाडतो असे म्हटले आहे. त्यांनी केलेले पुढील विधान उपयुक्त म्हणून अधिक चिन्तनीय आहे. 'इतर इतिहास साधनांत आढळणारी माहिती या कोशावरून निश्चित करता आली तरी देखील हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरेल.'

डॉ. कुळकर्णी यांच्या कोशाचे एक अपूर्व वैशिष्टच असे की त्यानी कोशसंहितेनंतर एक सूची करून तिच्यात कोशातील त्या त्या वर्गात येणाऱ्या शब्दांची अकारादिविल्हे यादी दिली आहे. यावनीशब्द, मराठी अर्थ व इंग्रजी अर्थ अशा क्रमाने या सूचीची रचना आहे.

डॉ. कुळकर्णी यांचा संपादनाचा सर्व प्रयत्न मात्र दुर्दैवाने निरुपयोगी ठरला आहे. डॉ. कुळकर्णी हे कोश लावण्याच्या कामी अनधिकारी व्यक्तींवर अवलंबून राहिल्याने खुद्द त्यांचीच दिशाभूल झालेली दिसते. तशातच मुद्रणदोष दुरुस्त करण्याच्या प्राथमिक महत्त्वाच्या कामातही अत्यंत हलगर्जीपणा झालेला आहे. त्यामुळे सूची व संहिता यात कित्येकदा तफावत दिसून येते व सूचीतील शब्द खरा की संहितेतील खरा याविषयी संदेह निर्माण होतो. शब्दार्थांवर प्रकाश पाडण्यातही त्यांना अनेक ठिकाणी अपयश आले आहे.

शिवचरित्रप्रदीपाच्या प्रस्तावनेत (पृ. १०) राजव्यवहारकोश यापूर्वी (१९२५ पूर्वी) तीन वेळा छापला गेला असे म्हटले आहे. पैकी दोन आवृत्त्या म्हणजे १८६० व १८८० मधील पूर्वोक्त आवृत्त्या होत. मात्र तिसरी आवृत्ती कोणती याचा शोध लागत नाही. कोणाला याविषयी माहिती असल्यास कळविण्याची कृपा करावी.

✓ **प्रस्तुत आवृत्ती :–** मी संपादित केलेली ही आवृत्ती मुख्यतः तीन हस्तलिखित प्रतींवर आधारलेली आहे. १) राजापुर प्रत. तंजावर येथील सरस्वती महाल लायब्ररीतून मिळविलेल्या पुढील दोन नकला (Transcription)- २) राजकोशनिघण्टु-हस्तलिखित क्रमांक D50 9/B5544/ ३) राजकोशनिघण्टु D50 0/B5545

राजापुर प्रत विष्णुंभट वल्लाळभट रानडचे यांनी स्वहस्ताने पोर्तुगिज कागदांच्या १८ पत्रांवर मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी शके १७६७ (इ. स. १८४५) गुरुवार या दिवशी लिहिली आहे. पत्रांचा आकार ३१cm×१० ५ cm असून प्रत्येक पृष्ठावर दहा ओळी लिहिल्या आहेत. उपोद्घात, उपसंहार नाही. प्रत्यक्ष कोशसंहिता जिथे संपते त्या सतराव्या पृष्ठावर –

किं त्वं न वेत्सि जगति प्रख्यातं लाभकारणे मूलम् ।
विधिलिखिताक्षरमालं फलति कपालं न भूपालः ॥

असा श्लोक लिहून पुढील १४ ओळीत कपाळावर लावण्याच्या तिलकाच्या विविध पद्धती दिल्या आहेत. अठराव्या पत्राच्या एका पृष्ठावर दोनच ओळी असून त्यात पूर्वोक्त लेखनकालादींची माहिती दिली आहे.[१६] शेवटच्या मलपृष्ठावर वेलबुट्टींच्या चौकटीत 'अथ (इति असायला हवे होते) राजकोशः समाप्तः । धूतपापेश्वरार्पणमस्तु ॥ रामकृष्ण ॥' असे लिहिले आहे. धूतपापेश्वर हा राजापुरचा प्रमुख ग्रामदेव आहे.

विष्णुंभट रानडयांनी ही नक्कल दुसऱ्या एखाद्या प्रतीवरून केलेली आहे. ती प्रत त्रुटित असल्याने काही ठिकाणी मजकूर मिळू शकला नाही. अशा ठिकाणी ...... अशी खूण केली आहे. नक्कल करतांना झालेल्या शुद्धलेखनाच्या चुका नंतर त्यांनी स्वतः सुधारल्या आहेत.

हे हस्तलिखित मला माझ्या जन्मग्रामी राजापुर (रत्नागिरी जिल्हा) येथे आमचे घरमालक व विष्णुंभट रानडयांचे वंशज, राजापुरातील कापड

व्यापारी व अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विष्णु वासुदेव तथा भलुभाऊ रानडे यांच्याकडून मिळाले.

१८८० साली साने यांनी जी पाठभेदयुक्त आवृत्ति छापली त्यातील बव्हंशी सर्व पाठभेद साताऱ्यातील राजोपाध्यांकडून मिळालेल्या शके १७२५ (इ. स. १८०३) मध्ये लिहीलेल्या जुन्या पोथीतून दिले आहेत. माझ्याकडील राजापुरप्रतीची संहिता त्या पाठभेदांशी पूर्ण जुळणारी असून तिचा मूलाधार शके १७०० मध्ये प्रचलित असलेली एक जीर्ण प्रत आहे. तंजावर येथून मिळालेल्या दोन्ही नकला (Transcription) सुद्धा राजापुरप्रतीशी जुळणाऱ्या आहेत. या सर्व गोष्टींचा एकत्र विचार करून इ. स. १८६० पासून आजवर प्रचलित असलेली संहिता (The Vulgate) बदलण्याचा धृष्टपणा मी केला आहे.

माझ्या या आवृत्तीत आजवर अशुद्ध स्वरूपात असलेले पाठ पुढील-प्रमाणे मी सकारण बदलले आहेत.

बदललेले पाठ = १) कौशबार्दार: पादरक्षाधर: (राज. १४)

हा पाठ इतरत्र खासदार, कौशदार, खौशदार असा आढळतो. तंजावर प्रतीत मात्र कौशबार्दार असे आढळून आले. पण्यवर्गातील १४ व्या श्लोकात कौशदोज: पादरक्षाकारक: असे म्हटले असल्याने मी स्वीकारलेल्या पाठाला बळकटी येते. खरा मूळ शद्ब मात्र कफश्बर्दार आहे.

२) सफाय: काच ईरित: । (कार्यस्थान २०)

इतर सर्व प्रतीत हा शद्ब सफाप: असा आहे. सुप्रसिद्ध ज्योतिषी श्री. केदार गोस्वामी हे माझे सहकारी असून त्यांचा रत्नविषयक व्यासंग दांडगा आहे. त्यांनी सफाया नावाचे अल्पमोली, दुय्यम दर्जाचे इस्लामी रत्न असल्याचे सांगितले. तंजावर प्रतीत तर मी स्वीकारलेला पाठच आहे.

३) वराहो होन उच्यते । (कार्यस्थान ५)

वराटो होन उच्यते असाही पाठ आहे. मी आधारभूत मानलेल्या तीनही प्रतीत वराह असाच पाठ आहे. तसेच सहाव्या श्लोकात 'वराहपादो धरण: ।' असेच म्हटले आहे. होन या शब्दाचा तत्कालीन प्रचलित पर्याय वराह होता हे राधामाधवविलासचंपूतील अष्टमोल्लासातील पुढील उल्लेखावरून सिद्ध होते -

'अथ कदाचित कोशाधिकारिणा प्रत्यहं दीयमाने वराहे केनचित्प्रतिबंधेन द्वित्रिदिनं न दीयमाने सति तमुद्दिश्यैवमुक्तवान् –

काव्याटवीं पर्यटतस्त्वदीयाम्
कवेर्मृगेन्द्रस्य गजेन्द्रलाभः ।
तस्यामकस्मान्मम शाह कस्मा –
न्नित्यं वराहो ऽप्यतिदुर्लभो ऽभूत् ॥'

४) गुर्गुजस्तु गदा सोटा मुद्‌गरो वृश्चिको बिचुः । (शस्त्र. ५) पूर्वीच्या सर्वच प्रतीत ही ओळ पुढील प्रमाणे आहे –

गुर्गुजा तु गदा सोटा मुग्दरोथश्चिकंबिच । या ओळीचा समाधानकारक अर्थही लागत नव्हता. आपटे–मुजुमदार द्वयींच्या पूर्वोक्त वहीत 'मुग्दरोज्थश्चिकंबि च' यापुढे (बिचुवा ?) असे लिहिलेले आढळले. त्यांचा संशय खरा ठरला. कारण तंजावर प्रतीत 'वृश्चिकं बिचुः' असा पाठ आढळला. मी तो शुद्ध करून 'वृश्चिको बिचुः' असा स्वीकारला आहे.

इतर बदल – तंजावरच्या एका प्रतीत (D 5029) उपसंहाराचे पहिले तीन श्लोक आहेत. उरलेले दोन श्लोक व उपोद्‌घात मी शिवचरित्रप्रदीप प्रतीवरून घेतले आहेत. त्यात काही संस्कृत व्याकरणाच्या चुका होत्या. या चुका मुद्रणदोष आहेत की मूळ पोथीवरून जसेच्या तसे घेतलेले पाठ आहेत हे कळण्यास अन्य मार्ग नसल्याने मी त्या चुका सुधारून उपोद्‌घात लिहिला. त्यातील ३३ व्या श्लोकाची दुसरी ओळ मात्र शुद्ध करणे कठिण असल्याने 'शृंगाग्रजाग्रदिव ..' अशीच ठेवून दिली आहे.

उपोद्‌घाताचे भाषांतर अनेक ठिकाणी क्लिष्ट झाले आहे याची मला कल्पना आहे. परंतु स्वैर भाषांतराने अभ्यासकांचे गैरसमज करण्यापेक्षा कमी क्लिष्ट व जास्तीतजास्त शब्दशः भाषांतराचा मार्ग मी स्वीकारला आहे.

या खेरीज कोणतेच पाठभेद मी स्वीकारले नाहीत अथवा तळटीपांद्वारे निर्देशित केले नाहीत. काही महत्त्वाचे पाठभेद मात्र सूचीतच समाविष्ट केले आहेत. साने यांनी पाठभेद देताना कोणता भेद कोणत्या प्रतीवरून दिला आहे हे सांगितलेले नाही. त्यामुळे पाठभेद देण्याचे काम अत्यंत कष्टाचे व मति गुंग करून सोडणारे झाले आहे. पाठभेदांचा मुख्य विशेष असा की ते कोशातील अरबी शब्दाला फारसी व फारसी शब्दाला अरबी

पर्याय सुचवितात. क्वचित अशुद्ध व अपभ्रष्ट शद्बांचे पाठभेद आहेत. क्वचित श्लोक वा श्लोकार्ध कमी जास्त सांगितले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करता पाठभेद देण्याचे काम माझ्या कुवतीबाहेरचे ठरल्याने ते देत नाही. माझीच आवृत्ती सर्वप्रमाण आहे असा दावा पाठभेद न देण्यामागे नाही हे कृपया ध्यानात घ्यावे.

या कोशाच्या उपलब्ध असलेल्या हस्तलिखित प्रती फार अशुद्ध आढळतात अशी खत्री, साने व सरस्वतीमहाल लायब्ररीच्या सूचीचे[१] संपादक तक्रार करतात. त्यात सत्यांश आहे. या कोशाची लोकप्रियता[१७] हेच त्याच्या अशुद्धपणाचे कारण असावे. सर्व दक्षिण भारतात हे दख्खनी-यावनी शद्ब दैनंदिन व्यवहारात रूढ झाले होते. त्यामुळे त्यांचे उच्चार विविध प्रदेशात भिन्न होत. एखाद्या भागातील मनुष्य या कोशाची नक्कल करून घेताना कोशातील मूळ शद्ब त्याच्या प्रदेशातील उच्चारल्या जाणाऱ्या त्या शद्बासारखा 'शुद्ध' करून लिहित असे. 'अफताब' हा मूळ शद्ब राजापुर प्रतीत 'अफटाब' असा आढळतो. याचे कारण कोकणी मुसलमानांत त्या शद्बाचा तसा उच्चार करतात. त्यामुळे रानडयांनी मूळ प्रतीतील शब्द परिचित उच्चारांना अनुकूल करून लिहिला आहे. याच पद्धतीने कफश्-बर्दारचे कौशबार्दार-कोशदार-खोशदार व अखेर खासदार झालेले दिसते! मूळ उर्दू (दख्खनीयावनी) भाषेशी परिचय नसणारे अनेक लोक त्या भाषेत 'ष' चा वापर करतात. बार्दार या शब्दाचे लेखन बारदार असेही केले जाते. तंजावर नकलांमध्ये तर हा शब्द बादरि असा वाचला जाईल अशा तऱ्हेने लिहिला आहे. काही प्रतींमधून श्लोकांचा क्रमही बदलला आहे. साने यांनी दिलेल्या पाठभेदांवरून असे दिसते की या कोशाच्या दोन आवृत्त्या प्रचलित होत्या. तंजावर प्रतीत ८-१० श्लोक कमी आढळतात. यावरून या कोशात काही प्रक्षेपही झाले असावेत असे दिसते. या साठी या कोशाची एक चिकित्सक आवृत्ती या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींनी काढणे आवश्यक आहे. पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळात या कोशाच्या दोन हस्तलिखित पोथ्या आहेत. धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळात ३७+९(९०९) या क्रमांकाचे हस्तलिखित असल्याचे कळते. तंजोर महाराज सरफोजीज् सरस्वतीमहाल लायब्ररीमध्ये याच्या तीन प्रती असून त्यातील दोनाच्या नकला माझ्याजवळ आहेत. चिकित्सक आवृत्ती तयार करू

इच्छिणाऱ्या संशोधकाला मी या नकला व राजापुर प्रत मोठ्या आनंदाने उपलब्ध करून देईन.

हा कोश प्रसिद्ध करण्यामागे मराठी भाषा संपन्न करण्याचा किंवा जुन्या शब्दांचे पुनरुज्जीवन करण्याचा माझा हेतू नाही हा कोश शिवकालीन परिस्थितीवर प्रकाश पाडू शकेल असे एक साधन आहे. या दृष्टीने त्याच्याकडे तसे दुर्लक्षच झालेले दिसून आले. अशा परिस्थितीत जास्तीत जास्त उपयुक्त ठरेल असे माझ्या बुद्धीला अनुसरून मी संपादन केले आहे. या कोशात उल्लेखिलेल्या अनेक वस्तू महाराष्ट्र व बाहेर असलेल्या वस्तुसंग्रहालयांत उपलब्ध असण्याची शक्यता आहे. त्या साक्षेपाने पाहून व त्यांची चित्रे देऊन प्रस्तुत कोश अधिक संपन्न करता येईल. शिवकालीन शस्त्रे नेमकी शोधून काढून त्यांची चित्रे देणे, भोग्यवर्गात उल्लेखिलेले तंबूचे प्रकार चित्रांच्या सहाय्याने दाखविणे, हत्ती, घोडे यांच्या अलंकारांची चित्रे देणे, किल्ल्यांच्या विविध भागांचे प्रत्ययकारी रेखाटन करणे असा आयुष्य-भर पुरेल असा एक उपयुक्त प्रकल्प आहे. तो साध्य करण्यासाठी अनेकांचे जिव्हाळ्याचे सहकार्य आवश्यक आहे. या बाबतीत अशा सहकार्याची मी अपेक्षा करीत आहे. हा कोश वाचून त्यातील वस्तूंची छायाचित्रे वा रेखाटने कोणी मला दिल्यास किंवा तशी ती उपलब्ध आहेत असे कळविल्यास मी त्यांचा आभारी होईन.

या कोशावरून शिवकालीन खजिने कोणत्या वस्तूंनी युक्त असत; त्यांची व्यवस्था कशी असे; गड, सैन्य यांची व्यवस्था कशी असे; लढाईत कोणती शस्त्रे वापरीत इ. गोष्टींवर प्रकाश पडतो. मात्र या कामी इतर साधनांचीही मदत अत्यावश्यक आहे. शस्त्रवर्गात डोक्यापासून पावलांपर्यंत घालण्याची अनेक कवचे सांगितली आहेत. ही सर्वच एका वेळी वापरणे शक्य नाही. अशावेळी कोणती कवचे कोणत्या युद्धाच्या वेळी व कोणत्या हत्यारांविरुद्ध वापरीत हे अन्य प्रमाणांवरून कळेल. शिवभारतात मनचेहर या मोगली सरदाराच्या हत्तींच्या सैन्याची मराठ्यांनी कशी जमिनीवरून दाणादाण उडवली याचे वर्णन आहे. यावेळी मराठ्यांजवळ तलवारी नसून त्रिशूळ, काण्ड, कोदंड, प्रास, गदा व परिघ ही दुरून फेकून मारण्याची अस्त्रे होती असे वर्णन आहे.[१८] दोन वीरांच्यात समोरासमोर होणाऱ्या युद्धात तलवारी वापरीत, असे शिवभारतावरून दिसते. राजकोशात तोफांचा

उल्लेख आहे; पण राधामाधवविलासचंपूत आलेल्या एका उपमेवरून असे कळते की तोफांचे गोळे जेथे पडत तेथे आगी लागू नयेत म्हणून त्यावर तात्काळ ओल्या थबथबीत घोंगडचा टाकीत.[१९] ढालींवर शोभेसाठी सोन्या चांदीच्या फुल्या मारीत असे राजकोशावरून दिसते; तर शिवभारतातील १४-९६-९९ मधील उल्लेखांवरून धनुष्यांवरही अशा फुल्या असत असे दिसते. पर्णालग्रहणातील उल्लेखावरून इतर हत्यारांवरही सोन्याचे बिंदू असत असे दिसते.[२०]

राजकोशाच्या कार्यस्थानवर्ग व भोग्यवर्ग यात सांगितलेल्या गोष्टी व शिवभारतातील उंबरखिंडीत मिळालेली लूट, अफजलवधानंतर मिळालेली लूट, राजापुरच्या इंग्रज वखारीत मिळालेली लूट यांची वर्णने तंतोतंत जुळतात. शिवभारत व राधामाधवविलासचंपू यात स्वारी-शिकारीच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या तंबू, राहुटचांची वर्णने आहेत. ती भोग्यवर्गातील शद्वांशी जुळतात. अशा अनेक गोष्टींचा शोध घेता येईल.

कोशरचनेची वैशिष्टचे - रघुनाथपंडित हा पांडित्य प्रदर्शनाची आवड असणारा कवी होता, हे त्याच्या उपोद्घातातील श्लोकांवरून दिसून येते. श्लेष व अर्थान्तरन्यास अलंकार वापरणे; इन्द्रनील ऐवजी स्वाराट्-मणि, आखण्डलरत्न; गजानन ऐवजी अनेकपाकृतिमुख, असे पर्यायी शद्वप्रयोग करणे; स्वतःचे रघुनाथ हे नांव सुद्धा राम या पर्यायाने देणे; कुळाला समुद्राची उपमा देऊन अमुक माणूस त्यातून चंद्राप्रमाणे उत्पन्न झाला असे वर्णन करणे; परंपरागत काव्यसंकेतांचा पुरेपूर उपयोग करणे इ. अनेक वैशिष्टचे त्याच्या पांडित्याची व रसिकतेची कल्पना आणून देण्यास पुरेशी आहेत.

कोशाची रचना करताना आठवतील व सुचतील तसे शद्व न जुळवता त्या शब्दांचे त्याने काळजीपूर्वक वर्गीकरण केले आहे. कोणते विषय कोणत्या वर्गात व कोणत्या क्रमाने यावेत याचा त्याने आराखडा आखला होता व त्याला अनुसरून त्याने शब्द बसवले हे स्पष्टपणे दिसून येते. व्यक्ती, वस्तू त्यांच्या महत्त्व व मूल्य यांच्या उतरत्या क्रमानेच सांगितल्या आहेत. रत्नांच्या यादीत नवरत्ने प्रथम येतात तर धातूंच्या यादीत सोने प्रथम येते.

अमरकोशात एकाच अर्थाचे अनेक संस्कृतशद्व एकत्र केले असून त्यांचे लिंगभेदही दिले आहेत. हे करण्यासाठी अमरकोशाची स्वतंत्र परिभाषा अमरसिंहाने प्रथम निर्माण केली. रघुनाथपंडिताला अशा परिभाषेची आवश्यकता नव्हती. कारण त्याचे काम दख्खनीयावनी भाषेतील शद्बांना संस्कृत पर्याय सुचविणे हे होते. प्राचीन परंपरेत हे पर्याय उपलब्ध होते. पण यावनी भाषेच्या आक्रमणाने सामान्य व्यवहारातून ते विस्मृतप्राय होऊ पहात होते. रघुनाथपंडिताने त्यांचे कोठे पुनरुज्जीवन केले आहे तर कोठे त्यांना नव्या संदर्भात नवा अर्थ दिला आहे. खड्ग, निस्त्रिंश, असि, करवालिका हे शद्व अमरकोशात समानार्थी म्हणून दिले आहेत. पण युध्दकलेतील नैपुण्या-बरोबरच तलवारींच्या आकारात फरक पडू लागला व प्रत्येक प्रकाराचा वेगवेगळचा वेळी उपयोग होऊन त्यांची नावेही स्वतंत्र होऊ लागली. त्यामुळे रघुनाथ पंडिताने पूर्वी समानार्थी असलेले शद्व नवीन संदर्भात वापरून त्यांना वेगवेगळे अर्थ दिले आहेत. उदा. – सैफ=खड्ग, दुदुमा= निस्त्रिंश, फिरंग = असि आणि कत्ती = करवालिका. दुसरे उदाहरण म्हणजे कमान = शार्ङ्ग व धणू = धनु:

कुलूप, बंदुक, बंदुकीची दारु, तोफ इ. नवीन परंपरेतील यावनी शद्बांसाठी नवीन शद्व तयार केले आहेत. मात्र अशा शद्बांची संख्या थोडी आहे.

कोशातील शद्बांची १) राजवर्ग २) कार्यस्थानवर्ग ३) भोग्यवर्ग ४) शस्त्रवर्ग ५) चतुरंगवर्ग ६) सामंतवर्ग ७) दुर्गवर्ग ८) लेखनवर्ग ९) जनपदवर्ग १०) पण्यवर्ग अशा दहा वर्गात विभागणी केली आहे. व्याकरणातील तत्पुरुष, बहुव्रीहि ही नावे स्वतंत्रपणे दिलेली नसून एका विशिष्ट प्रकारच्या समासांचा गट घेऊन त्या गटातील पहिला शद्ब सगळचा गटाचे नांव बनला आहे. रघुनाथपंडितानेही अशीच पध्दत स्वीकारलेली दिसते. त्यामुळे राजवर्गाचा पहिला शद्ब राजा असाच दिसतो. कार्यस्थान-वर्ग, शस्त्रवर्ग, सामन्तवर्ग, दुर्गवर्ग यांचीही नावे अशीच दिली आहेत. लेखनवर्ग व जनपदवर्ग यांची सुरुवात मात्र संस्कृत ऐवजी यावनी शब्दाने केली आहे. चतुरंगवर्ग, भोग्यवर्ग व पण्यवर्ग यांची सुरुवात अशी विशिष्ट शब्दाने करता आली नाही. याचे कारण त्या शब्दांचा बहुसमावेशक अर्थ हेच असणार.

एका श्लोकाचा (लेखन. ७६) अपवाद वगळता सर्व कोश अनुष्टुभ छंदात रचला आहे. मात्र अनेक ठिकाणी या छंदाची अपरिहार्य ओढाताण झाली आहे.

कोशातील विषय विभागणीचे विश्लेषण व टिप्पणी –

१) राजवर्ग – या वर्गात राजा, युवराज, राजपुत्र व अन्तःपुर या गोष्टींचा सर्वप्रथम उल्लेख आला असून नंतर प्रधान, अमात्य इ. राजनियुक्त अधिकारी सांगितले आहेत. विविध खात्यांत काम करणारे मुलकी व लश्करी पगारी अधिकारी नंतर येतात. याच वर्गात सूर्य, चंद्र, अग्नि इत्यादींचा येणारा उल्लेख हा राजाने दर्शन घ्यावयाच्या पवित्र वस्तूंचा असावा. या वस्तूंच्या उल्लेखानंतर आदरणीय व्यक्तींचे उल्लेख आहेत. त्यातील पैगंबर, कलंदर, मुल्ला व काजी यांचे संस्कृत पर्याय त्यांच्या विषयी आदराची भावना व्यक्त करणारेच आहेत. या व्यक्तींच्या नंतर गणवेशधारी सेवक, इतर आवश्यक पण कमी दर्जाची कामे करणारे राजसेवक, विविध तऱ्हेचे हेर यांचे उल्लेख केले आहेत. दरबारात बसलेल्यांचे जोडे सांभाळ-णारा नोकर, पिकदाणी इ देणारे नोकर, विविध तऱ्हेची राजचिह्ने धरणारे नोकर यांचे उल्लेख नंतर आहेत. दरबारातील विविध आसनेही सांगितली आहेत. येथे दरबारातील विषय संपतात व राजाच्या वैयक्तिक जीवनात लागणाऱ्या राजमहालातील बाबींचे उल्लेख पुढे सुरू होतात. त्यामध्ये पलंग, पालख्यांचे प्रकार, विविध उपयोगांचे दिवे, राजाचे मनोरंजन करणारे स्त्रीपुरुष कलाकार, अन्तःपुर इ. गोष्टी समाविष्ट केल्या आहेत. हवामानाचे उल्लेख याच वर्गात येतात.

वल्ली या शब्दाला रघुनाथाने सिद्ध हा पर्यायी शब्द दिला असून शिवभारतकारांनी शहाजी व सरफोजी हे सिद्धनामांकित होते असे सांगताना सिद्ध हा शब्द मुस्लीम सत्पुरुषांना उद्देशून वापरला आहे. (शिव. १-८९-९०) 'यवनाचार्य' (शिव. १८–५४) असाही शब्द त्यांनी वापरला आहे. शिवभारतकारांनी मुस्लीम संदर्भात वापरलेल्या सिद्ध, आचार्य या शब्दांची पुढली पायरी राजवर्गातील 'ऋषिः पैगंबरो ज्ञेयो' इ. श्लोकांत दिसून येते.

सर्पदार – वेत्रधर हा या वर्गात उल्लेखिलेला गणवेशधारी सेवक आहे. सोन्याचा व चांदीचा दंड हातात धरणारे आणखी दोन प्रकारचे

'वेत्रधर' शिवभारत व पर्णालग्रहण यात उल्लेखिले असून ते राजवर्गात अपेक्षित होते. (शिव.=हैमवेत्रधर २९-३१ पर्णालग्रहण = रौप्यवेत्रधर १-१२) राजाकडे आलेल्या दूताची राजाला तिथल्या तिथेच खबर देण्याचे औपचारिक काम हे वेत्रधर करीत असे दिसते. राजा जिथे अधिकृत कार्या- साठी जाईल तिथे हे त्याच्याबरोबर बहुसंख्येने असत असे दिसते.

राजवर्गात उल्लेखिलेल्या व्यक्तींचे उल्लेख जयराम पिंडये व कवीन्द्र परमानंद यांच्या काव्यात वारंवार आढळतात. (पर्णालग्रहण १.१-११)

२) कार्यस्थानवर्ग – राजसेवेशी संबंधित असलेल्या विविध कचेऱ्या या वर्गात सांगितलेल्या असून त्या कचेऱ्या कोणती कामे करीत यावरही या वर्गात प्रकाश पडतो. खजिना, सैन्य, खर्चव्यवस्था, द्रव्यविषयक कचेरी, रत्नशाला, वस्त्रशाला हे कारखाने क्रमाने दिले असून त्या त्या कारखान्यात असलेले अधिकारीही सांगितले आहेत. या कारखान्यांकडे असलेल्या वस्तूंची यादीही तपशिलवार दिली आहे. ही यादी मूल्याच्या उतरत्या क्रमाने दिली आहे. रत्नशालेत असणारे विविध अलंकार प्रथम देऊन मग नवरत्ने व दुय्यम दर्जाची रत्ने दिली आहेत. मौल्यवान, कमी मौल्यवान व इतर उपयुक्त धातूंची नांवे नंतर येतात. वस्त्रशालेत असलेली अनेक त्यायची वस्त्रे, प्रावरणे, पलंगपोस, चादरी यांसारखी महत्त्वाची वस्त्रे सांगितली आहेत. ती सांगतांना एकाच वस्त्राचे विविध प्रकार आवर्जून सांगितले आहेत. उदा.–शालींचे प्रकार, कापडांचे सुती, रेशमी, मखमली, भर्जरी, चर्मवस्त्रे, विविध लोकरींची वस्त्रे इ. प्रकार दिले आहेत. कापड मोजण्याची मापेही दिली आहेत. अखेरीला कपडयांचे बाही, नेफा, पुढचा भाग, मागचा भाग इ. अवयव दिले आहेत.

या वर्गातील श्लोक क्र. ११-१७ यांत येणाऱ्या दागिन्यांची नांवे पर्णालग्रहण (१.८-९ व ४.३३-३७) मध्यें बहुशः येतात. यापैकी नथ, सिस्फुल, भांगटिळा अशासारखे स्त्रियांचे काही खास अलंकार वगळता इतर अलंकार स्त्रीपुरुषांना समान होते असे दिसते.

रेशमी, सोन्याचांदीच्या तंतूंची व रंगीबेरंगी वस्त्रे जयराम व कवीन्द्र सतत उल्लेखितात. शिवभारतात तर गवती वस्त्रे, फळांपासून केलेली वस्त्रे,

कातड्याची वस्त्रे यांचे सुद्धा उल्लेख आढळतात.[२१] मात्र राजकोशात उल्लेखिलेल्या मंदिल व कमरबंद या शिवाय अन्य कपड्यांचे उल्लेख या दोन्ही कवींनी केलेले नाहीत. शिवभारतात अफजलखानाला भेटणारा शिवाजी केशराचा शिडकावा केलेले 'आंगिक' धारण करतो, एवढेच सांगितले आहे. पण हे 'आंगातले' म्हणजे कार्यस्थानवर्ग श्लोक २५-२७ यापैकी नेमके कोणते हे कळत नाही.

या वर्गात सिचय = गोधडी, रजई या शद्बाचा उल्लेख अपेक्षित होता; पण तो केलेला नाही. शिवभारतात मात्र तो आहे. (शिव. २.१५)

याच वर्गाच्या सुरुवातीला रघुनाथाने होन (वराह), प्रताप (अर्धा होन), धरण (पाव होन), चवल (अष्टमांश होन), दुवल (सोळांश होन), मोहरा (सुवर्णनिष्क), रुपया (रजतनिष्क), लाहरी (रजतवर्ती), फलम (पण) एवढी नाण्यांची नांवे दिली आहेत. ही सर्व नाणी दक्षिणेकडील राज्यांमध्ये प्रचलित असलेली नाणी आहेत. यातील होन हे नाणे स्वराज्याचेही होते. विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचे आपण पुनरुज्जीवन करीत आहोत असे दाखवायला हे नाणे शिवाजीने पाडले असे श्री. त्र्यं. शं. शेजवलकर लिहितात.[२२] मात्र याला वस्तुस्थितीचा आधार नाही. कारण विजयनगरच्या साम्राज्याचे जसे होन होते, तसेच होन दक्षिणेतील स ˆ राज्यांमध्ये प्रचलित होते व त्यातील सोन्याच्या किंमतीमुळे (Intrinsic Value) त्याला चलनी नाणे म्हणून मूल्य होते. आपल्या सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणून दक्षिणेतील प्रत्येक बादशहा हे होन पाडीत असत. या होनाचे प्रताप, धरण इ. भाग प्रचलित होते. अनेक नाणी-संग्राहकांकडे आदिलशाही नाणी, निजामशाही नाणी, कुतुबशाही नाणी अशी नाणी पहायला मिळतात. मात्र प्रताप, धरण, चवल, दुवल, मोहरा अशा नावांची नाणी कोणी दाखवीत नाही. कदाचित होनाच्या किंमतीशी संबंधित अशी ही लोकप्रचारातील नांवे असतील. शिवराई या नांवाने सध्या उपलब्ध असलेली नाणी या कोशात उल्लेखिलेली नाहीत. या शिवराईंची होनाच्या तुलनेत काय किंमत होती? त्यांना शिवकाळात शिवराईच म्हणत की त्यांच्या होनाशी असलेल्या सापेक्ष किंमतीनुसार प्रताप, धरण, चवल अशी नांवे होती ?

दक्षिणेत प्रचलित असलेला रुपया (रजतनिष्क) हा मोंगल साम्राज्याचा रुपया होता, असे दिसते.

दक्षिणेतील राजवटींत जे कारखाने असत त्यांच्या प्रमुखांना हवालदार म्हणत असत. उत्तरेत मोंगलांच्या राजवटीतील कारखानाप्रमुखांना दरोगा असे म्हणत.

मोंगल साम्राज्यातील कारखाने भरभराटीला आलेले होते. गोवळ-कोंडयाची कुतुबशाही राजवटसुद्धा संपन्न असल्याने तेथील कारखाने प्रगत होते. या कारखान्यांचा समाजाच्या आर्थिक जीवनावर मोठाच परिणाम झाला होता.[२३] स्वराज्याचे कारखाने मात्र नवीनच निर्माण झाले होते. त्यांचा विकास व्हायला वेळ लागणे स्वाभाविक होते स्वराज्याच्या कारखान्यांची संख्याही इतर राजवटींच्या तुलनेत कमी होती. इतर राजवटींप्रमाणे स्वराज्याला स्थैर्य लाभले असते तर कारखान्यांची संख्या वाढली असती व चित्रकला, वस्त्रकला, धातुकाम अशा एखाद्या कलेच्या क्षेत्रात मराठी शैली निर्माण झाली असती.

३) भोग्यवर्ग – भोग्यवर्गात विविध वस्तू क्रमाने दिल्या आहेत. अन्नपदार्थ करणारे विविध अधिकारी, पाण्याचा संचय करण्याची स्थाने ही माहिती प्रथम देऊन नंतर विविध पेये, मेवा, मादकद्रव्ये, धूम्रपानाची द्रव्ये, सुगंधी द्रव्ये, सुगंधी तेले, तांबूल द्रव्ये व ही द्रव्ये ठेवण्याची पात्रे यांची नांवे दिली आहेत. दवाखान्याच्या जोडीने मृत्यूचाही उल्लेख केला आहे ! शिकारखान्यातील प्राणी व त्यावरील अधिकारी सुद्धा उल्लेखिले आहेत. तंबूचे केवळ प्रकारच नव्हेत तर ते कोणत्या साधनांनी उभारीत त्यांची नांवेही दिली आहेत. या तात्पुरत्या निवासस्थानात वापरली जाणारी आसने, गाद्या, उशा यांचे शेवटी उल्लेख आहेत.

शिवभारतात काण्डपट, पटमण्डप यांचे उल्लेख आले आहेत. (शिव. १२.११८, १७.६८–७०, २०.५२, २१.६१–६२) ते ज्या संदर्भात आले आहेत त्यावरून असे दिसते की या तंबूंचा वापर विशेषतः स्वारीवर असताना, सैन्याचा तळ पडलेला असताना किंवा राजा शिकारीला गेला असतांना करीत. राधामाधवविलासचंपूच्या सातव्या उल्लासात शहाजीच्या नवगजी म्हणजेच आस्थानमंडपाचे वर्णन आहे. या तात्पुरत्या निवासस्थानांतून असणाऱ्या आसनांचे व उपयुक्त पात्रांचे शिवभारतात

पुढील उल्लेख आहेत. मंचक (१२.११७), विचित्रासन (१७.६९), इष्टभूयिष्ठवस्तुसंभार (१७.७०), त्रिपद, करंक, स्थाल, चषक, पतद्‌ग्रह चतुष्क, रूप्यकाञ्चननिर्मित मंचक, (१७.४३ व २२.६२), स्थाल, चषक, भृंगार व इतर सुवर्णपात्रे (२९.५८-५९)

शिवभारतात उल्लेखिलेला उल्लोच=छत, चांदवा (१२.११७, १७.७० व २२.६१) राजकोशात उल्लेखिलेला नाही.

शेखमहंमदकृत 'योगसंग्राम' वरदा बुक्स, पुणे यांनी प्रसिद्ध केला आहे. त्यांतील ७.५६ श्लोक असा आहे–

कोण्ही कोणास बैसो घातली तिवाशी
तो जन्मभरी आठवी उपकारासी ।
पहा ईश्वरे अंथरिले महीशी
मूढ उपकार न मानिती ।।

यातील 'तिवाशी' शद्वाचा अर्थ तळटीपेत तक्या दिला आहे. राजकोशाच्या भोग्यवर्गात 'चित्रासनं तिवाशी स्यात्' असे म्हटले असून 'तक्या' या अर्थी 'मृदुलासन' व 'पृष्ठोपधान' हे पर्याय दिले आहेत. यावरून असे दिसते की तिवाशी हे सतरंजीसारखे अंथरण्याचे रंगीबेरंगी आसन होते. राजकोशाचा उपयोग अर्थांवर प्रकाश पाडण्यासाठी कसा करून घेता येईल याचे दिग्दर्शन करण्यासाठीच हा उल्लेख केला आहे. या कोशाकडे जाण–त्यांचे लक्ष न गेल्यामुळे झालेला आणखीही एक प्रमाद दाखवण्यासारखा आहे. प्रा. श्री. मा. कुळकर्णी संपादित 'आज्ञापत्रात' (वीणा प्रकाशन, नागपुर १९४९) प्रकरण तीन मध्ये पुढील वाक्य आहे – 'बख्तरे, दुपट्टे, चिलखते, पाखरा, ताज, हुके, दारूगोळी बाणादि सामान बरे सजून मजबुदीत असावे.' यातील 'ताज' शद्वाचा अर्थ मुगुट असा दिलेला असून तो घोडयाच्या तोंडावर घालण्याचे कवच असा हवा.

४) शस्त्रवर्ग – शस्त्रागारावरील अधिकारीवर्गाची नांवे प्रथम देऊन नंतर शस्त्रांची नांवे क्रमाने दिली आहेत. प्रथम तलवार, कटयार इ. हातात धरून वापरण्याची धारदार व गदेसारखी बोथट शस्त्रे सांगितली आहेत. नंतर भाले, बरची, गोफण, धनुष्यबाण इ. फेकण्याची शस्त्रे येतात.

या शस्त्रांच्या मुठींची व इतर भागांची विविध नांवेही दिली आहेत. त्यापुढे ही शस्त्रे शरीरावर धारण करण्याच्या साधनांची व विविध अवयवांवर धारण करण्याच्या कवचांची, ढालींची माहिती येते. बंदुका व तोफा यांचीही माहिती आहे. या शस्त्रांचा उपयोग करण्याचे ज्ञान देणाऱ्या शाळा होत्या. त्यांचा व त्यातील सेवकांचा उल्लेख करून हा वर्ग संपतो.

शस्त्रवर्गात चक्राचा उल्लेख नाही. शिवभारतात तो सर्रास येतो.[२४] असि, खड्ग, निस्त्रिंश, करवाल, मंडलाग्रक, यमदंष्ट्र या समानार्थी शब्दांना रघुनाथाने जरी वेगळे अर्थ प्राप्त करून दिले असले तरी कवीन्द्र परमानन्द व जयराम पिंड्ये मात्र हे शब्द एकाच हत्याराच्या संदर्भात समानार्थी म्हणूनच वापरतात. त्यामुळे द्वंद्व युद्धाचे वर्णन करताना एका श्लोकात एखाद्या योद्धयाच्या हाती करवाल होती असे म्हणतानाच पुढील श्लोकात त्याने खड्गाने प्रहार केला असे म्हटलेले दिसून येते.[२५] शिवभारतामध्ये (१४.८२) करवालीचे वर्णन 'कालकाकोदराकार'–कृष्णसर्पाप्रमाणे वाकडी–असे आहे. परंतु कत्ती या नांवाखाली येणाऱ्या तलवारीच्या चित्रात ती इतकी वाकडी आढळून येत नाही. हे वर्णन 'इळी तु बागदारः स्यात्' या बाकदार तलवारीला लागू पडेल. तलवारीचे प्रहार करण्याचे जे प्रकार (तलवारीचे हात) होते त्यांना भ्रान्त, उद्भ्रान्त इ. नांवे होती (शिवभारत १४.६२) त्यांची माहिती राजकोशात नाही.

तलवारींच्या मुठीचे दोन प्रकार आढळून येतात. रघुनाथाने वर्णन केलेला व इंग्रजीत बॉक्स हिल्ट या शब्दाने वर्णन करण्यात येणारा व 'बॉक्स' विरहित असा दुसरा प्रकार. शिवकाळात या दोन्ही प्रकारच्या मुठींचा उपयोग होत होता का, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळू शकले नाही. या विषयी वाचन करतांना असे वारंवार वाटते की शिवकालीन शस्त्रे व युद्धपद्धती यांचा चिकित्सक अभ्यास होण्याची नितान्त आवश्यकता आहे.[२६]

धनुष्याची प्रत्यंचा प्रत्यक्ष बोटांनी न ओढता ती आंगठीप्रमाणे बोटात घालण्याच्या एका साधनाने ओढीत असत. विल्यम इरविनने त्याचे नांव 'झिहगीर' (Zihgir) असे दिले आहे.[२७] या साधनाचा उल्लेख रघुनाथाने नाही पण परमानंदाने मात्र अंगुलीयक असा केला आहे.[२८] इरविनने याच

अर्थी दुसरा शद्व 'शस्त' असा दिला आहे. त्याला रघुनाथाने अंगुष्ठक असा पर्याय दिला आहे. मात्र हा शद्व कार्यस्थानवर्गात अलंकारांच्या यादीत दिला आहे.

रघुनाथाने तोफेचा उल्लेख केला असला तरी तोफेच्या गोळ्यांचा उल्लेख केलेला नाही. शिवभारतकार त्याचा उल्लेख अयःपिण्ड, अश्मसार-पिण्ड इ शद्वांनी करतात, तर जयराम पिंडचे त्यांचा उल्लेख गोल, गोलक, पिंड या शद्वांत करतो. राधामाधवविलासचंपूत (५.१७६) हे गोळे विषाने माखलेले असत असेही म्हटले आहे. (गरलाक्तः पिण्डः) तोफेच्या वातीचा राजकोशात नसलेला उल्लेख राधामाधवविलासचंपूत 'अग्नियंत्रनलक-संधुक्षण वर्तिका' असा आहे. बंदुकीच्या गोळ्यांचा उल्लेख या दोन्ही कवींनी गुटिका, गुलिका असा केला आहे.

बाण या यावनी शद्वाने दोन शस्त्रांचा बोध होतो. एक म्हणजे मण्डलाग्रक नांवाचे तलवारीसारखे हत्यार व दुसरे दारूच्या सहाय्याने आकाशात उडत जाणारे पेटते बाण-रॉकेट. पोकळ नळीत दारू भरलेल्या या बाणांना उल्का म्हणत असत. हे उल्काबाण भयंकर आवाज करीत व गरगर फिरत जाऊन शत्रूंना भाजून काढीत व आगी लावीत.[२१] धनुष्यातून सोडण्याच्या बाणाला यावनी शद्व 'तीर' असून त्याचा संस्कृत पर्याय 'सायक' दिला आहे.

शिवभारत, राधामाधवविलासचंपू व पर्णालग्रहण यामध्ये शिरस्त्राण, तनुत्राण व हातावरील घोरपडीच्या कातड्याचे त्राण यांचे उल्लेख सर्रास येतात; परंतु जानुबंध, बिनी (घोणात्राण), पट्टी (रदबन्धनी) यांचे उल्लेख येत नाहीत.

शिवकालीन युद्धपद्धतीवर अधिक प्रकाश टाकू शकतील असे आणखी उल्लेख विवेचक पद्धतीने इतर साधनांतूनही शोधून काढले पाहिजेत.

५) चतुरंगवर्ग - या वर्गात लढाईला उपयुक्त ठरणाऱ्या हत्ती, घोडे, रथ, गाड्या, उंट व रणवाद्ये यांचे उल्लेख आहेत. या सर्वांशी संबंधित असलेल्या सेवकांचा पण उल्लेख आहे. या वर्गात घोड्यांविषयी अत्यंत तपशिलवार दिलेली माहिती लक्षणीय आहे. हत्ती व घोड्यांना बांधण्याच्या

दोऱ्या, त्यांचे अलंकार व वस्त्रे यांचे उल्लेख तर आहेतच, पण घोडयांच्या जाती व गती यांचेही उल्लेख आहेत.

चतुरंगवर्गातील हत्ती, घोडे, उंट, विविध वाहने, वाजंत्री यांचे उल्लेख कवींद्र व जयराम यांच्या ग्रंथांत सर्रास आढळतात. मात्र रघुनाथाने या वर्गात जे विविध तपशील दिले आहेत तसे तपशील त्यांच्या ग्रंथात नाहीत, हे उघड आहे. घोडयावरून लढताना खंडोजी पाटलाने घोडयाकडून विविध हालचाली करून घेतल्या. (शिव. १२.२९), शिरवळच्या लढाईत कावुकाने (कावजी) हत्ती, घोडे व त्यांचे विविध दागिने लूट म्हणून मिळविले. (शिव. १३.२७) अशा स्वरूपाचे हे उल्लेख आहेत. रघुनाथाने 'पाखर' म्हणजे अश्वकवच असे म्हटले आहे. विल्यम इरविनने मात्र 'पाखर' हे हत्तीचे कवच असल्याचे म्हटले आहे.[३०] शिवभारतात खंडागळयाचा हत्ती उधळल्याच्या प्रसंगाचे जे वर्णन आहे, त्यात त्या हत्तीच्या अंगावर कवच होते असा उल्लेख आहे. (शिव. ३.२०) यावरून हत्ती व घोडा यांच्या अंगावर कवच घालीत व त्यांना पाखर म्हणत हे स्पष्ट दिसते. घोडयाच्या तोंडावर घालण्याच्या कवचाला 'ताजा' असा शब्द रघुनाथाने दिला आहे. ईगरटन ऑफ टॅटनने जे अश्वमुखकवचाचे चित्र दिले आहे, त्यात त्याला 'कशकश' म्हटले आहे. पर्णालग्रहणात (५.१०२) कठिण प्रसंगीही न चळणाऱ्या सैंधव जातीच्या घोडयाचा उल्लेख आला आहे

६) सामंतवर्ग – हा या कोशातील सर्वांत छोटा वर्ग आहे. हा वर्ग सैन्याशी व सैन्याच्या हालचालींशी विशेष संबद्ध असून राजनीतीतील साम-दामादी डावपेच या वर्गात उल्लेखिले आहेत. या वर्गात सरनौबतापासून सामान्य शिपायापर्यंत अधिकारीवर्ग दिला आहे. सेनेचा तळ पडला असता कशी व्यवस्था असे या माहितीबरोबरच आक्रमणाचे प्रकारही सांगितले आहेत.

७) दुर्गवर्ग – या वर्गात किल्ल्यांच्या प्रकारांचा उल्लेख करून किल्ल्यांची माहिती दिली आहे. त्यात तट, बुरुज, माची, खंदक इ. किल्ल्याच्या बाह्यरूपाची माहिती दिली आहे. किल्ल्यावर हल्ला होत असे तेव्हा संरक्षणाची काय व्यवस्था असे याचीही माहिती दिली आहे. किल्ल्याची व्यवस्था ठेवण्यासाठी कोणते अधिकारी असत, कोणते कारखाने

असत, याची माहिती आहे. त्यापुढे किल्ला बांधण्यास उपयुक्त सामग्री व कामगारवर्ग यांचे उल्लेख आहेत. किल्ल्यावरील राजवाडयाचीही सविस्तर माहिती देऊन इतर सुखसोई व किल्ल्याच्या संदर्भात उपयुक्त ठरणारी अवांतर हत्यारे सांगितली आहेत.

किल्ल्यावर जी गस्त घालीत (यामाटनं) तिचे वर्णन पर्णालग्रहण (१.४८-४९) मध्ये आहे. गडाच्या आतबाहेर मशाली घेतलेले शेकडो लोक फिरत असत. घंटा व शिंगांचा आवाज करीत. ही गस्त सूर्योदय होईपर्यंत चालू असे. अनाजी पंडिताने पन्हाळा घेतला, त्याचे वर्णन करताना त्यांनी गडावर चढण्यासाठी जी साधने वापरली त्यात माळेच्या शिडयांबरोबरच वाघाच्या नखासारखी लोखंडी नखे वापरली असे म्हटले आहे. दुर्गवर्गात धबधब्याचा उल्लेख आला आहे. उन्हाळयाच्या दिवसात धबधब्याचा उपयोग हल्ल्याच्या वेळी गडावर चढण्याचा मार्ग म्हणून करीत असे दिसते. कुदळ, पहार, फावडे, शिडी इ. दुर्गवर्गात उल्लेखिलेल्या साधनांचा उपयोग भिंती खणून काढणे, सुरंग घालणे, खंदक बुजविणे, तटावर चढणे इ. कामांसाठी प्रत्यक्ष युद्धात करीत. कुऱ्हाडी, भाले, गदा यांचा उपयोग किल्ल्यांची दारे फोडण्यासाठी करीत असे शिवभारतावरून दिसून येते.

पर्णालग्रहणात येणारी किल्ल्यावरील व्यवस्था, अंबारखाने, पाण्याचे टाके इ. वर्णने व राजकोशाच्या दुर्गवर्गातील उल्लेख तंतोतंत जुळतात.

गजानां तुरगाणां च दुर्गाणां लक्षणानि च ।
निरूपितान्यशेषेण राजनीतिश्च शाश्वती ॥ १-४०

ही शिवभारतकर्त्याची प्रतिज्ञा पूर्ण होती तर या कोशावर व पर्यायाने शिवकालावर बराच प्रकाश पडता !

८) लेखनवर्ग –या कोशातील हा सर्वात मोठा वर्ग आहे. जमाखर्च, कर्जवसुली यांची तर माहिती या वर्गात आहेच, परंतु पत्रलेखन, करार, तहनामे, निरोप आणि अन्य राजकीय कामांसाठी वापरण्यात येणारे नाना तऱ्हेचे शब्द या वर्गात दिले आहेत. त्या दृष्टीने हा वर्ग म्हणजे राजव्यवहारकोशाचा गाभाच म्हटला पाहिजे. लेखनासाठी आवश्यक असलेल्या शाई,

१८०

लेखनी इ. सर्व सामग्रीचा उल्लेख या वर्गात आहे. वर्गाच्या अखेरीला कागदाची परिमाणे सांगितली आहेत.

या कोशाचा उपयोग प्रत्यक्ष राजव्यवहारासाठी शिवोत्तरकाली किती झाला हे ठरविण्यासाठी या लेखनवर्गाचा उपयोग होईल.

९) जनपदवर्ग – हा वर्ग लेखनवर्गाचा पूरक वर्ग वाटतो. लेखनवर्ग हा खऱ्या अर्थाने राजव्यवहाराशी संबद्ध आहे आणि जनपदवर्ग हा राजाला कर मिळवून देणाऱ्या जमिनीशी व वहातुकीशी संबद्ध आहे. या वर्गाच्या सुरुवातीला गावांचे निरनिराळे प्रकार देऊन गावांतील विविध अधिकारी सांगितले आहेत. उत्पन्न देणाऱ्या जमिनींचे प्रकार, विविध तऱ्हेचे महसूल, कर यांची माहिती दिली आहे. गावांतील धान्यकोठारे व त्यावरील अधिकारी यांचीही माहिती दिली आहे. वर्गाच्या शेवटी धान्याची मापे सांगितली आहेत.

जनपदवर्गात जहाज, टोकरे, नाव यांचे उल्लेख आहेत, पण पोतवणिक्, जहाजातून व्यापार करणाऱ्यांचा उल्लेख नाही. शिवभारत (२९.८९) व राधामाधवविलासचंपू मध्ये मात्र तो उल्लेख सापडतो. फिरंगी=पोर्तुगीज यांचा द्वैप्य असा उल्लेख आहे. मात्र शिवभारत, पर्णालग्रहण इ. मध्ये येणारे ताम्रानन = मोंगल, श्यामास्य = काळे हबशी, सिंधुमध्यज, अब्धिमध्यसंचाराः, यवनावर फैरंगाः= इंग्रज यांचे उल्लेख या वर्गात नाहीत.

१०) पण्यवर्ग = या वर्गात विविध तऱ्हेचे व्यवसाय करून उपजीविका करणाऱ्या लोकांची माहिती दिली आहे. हे लोक करदाते आणि दैनंदिन जीवनाला उपयुक्त वस्तू पुरविणारे असल्यामुळे त्यांचा कोशात समावेश केला आहे.

पाली जिंकल्यावर शिवाजी महाराजांनी ज्यांना अभय दिले त्यांची नांवे शिवभारतात [१०] आली आहेत. त्यातील बव्हंश नांवे पण्यवर्गाशी जुळणारी आहेत.

संपूर्ण कोशात सुलतान हा शब्द कोठेही नाही. इ. स. १२५० ते १३२० या काळात रचल्या गेलेल्या विश्वनाथाच्या साहित्य दर्पणातील अल्लाउद्दीन

खिलजीचे वर्णन करणाऱ्या पुढील श्लोकात सुलतानचे 'सुरत्राण' व 'निशाण' चे 'नि:शान' असे संस्कृतीकरण झालेले आढळते.

गंगांभसि सुरत्राण तव नि:शाननिस्वन: ।
स्नातीवारिवधूवर्गगर्भपातनपातकी ।।

यावनी शब्दाचे उच्चाटन करू इच्छिणाऱ्या रघुनाथाने उपोद्घाताच्या ६० व्या श्लोकात नि:साण हा शब्द वापरला आहे, ही गमतीची गोष्ट आहे. नि:साण किंवा नि:शाण असा वाद्यवाचक शब्द तोपर्यंत संस्कृत मध्ये रूढ झाला होता हेच त्याचे कारण.

सम्राट या अर्थाने असलेला सुलतान हा शब्द तुर्की आहे. तुर्की परंपरेतून न आलेल्या सर्व मुस्लीम राज्यकर्त्यांनी या शब्दाचा त्याग केलेला दिसून येतो राजपुत्रांना बिरुद म्हणून सुलतान हा शब्द देत; पण स्वत:ला राजा 'सुलतान' म्हणवून घेत नसे तर 'पादशाह' असेच म्हणवून घेत असे. अबुल फजलने पादशाह या शब्दाची व्युत्पत्ती अशी दिली आहे–पाद म्हणजे स्थैर्य, स्वामित्व आणि शाह म्हणजे निर्मिती, प्रभु: अर्थात पादशाह' या शब्दातून राजाचे अजिंक्यत्व ध्वनित केले आहे. [३१] या कारणासाठीच रघुनाथाने कोशात 'सुलतान' शब्द उल्लेखिलेला नाही. त्यावेळी तो चांगल्या अर्थाने प्रचलितही नसावा.

राजकोशात जलदुर्गाचा उल्लेख आहे. परंतु आरमार आणि त्याची तपशिलवार माहिती कुठेही नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे. या कोशाच्या रचनेच्या वेळी महाराजांचे प्रबळ आरमार होते. रघुनाथपंत हयातभर कर्नाटकात असल्यामुळे त्याचा समुद्र व आरमार यांच्याशी जवळचा संबंध आलेला नसावा। त्यामुळेच त्याने आरमाराची माहिती दिली नसावी असे दिसते.

राजव्यवहारकोश हा एका अर्थाने स्वराज्याचा कोश आहे; पण तो केवळ स्वराज्याचाच आहे असेही नाही. त्यामुळे त्यात दक्षिणेकडील राजवटींमध्ये दिसून येणारे मीरजुम्ला अशा सारखे अधिकारी नाहीत. मुस्लीम राजांच्या कारभारात अपरिहार्यपणे दिसून येणारा अशुरखाना नाही. पण

त्याचवेळी हेही लक्षात येते की स्वराज्याशी संबंधित नसलेली नाणी या कोशात उल्लेखिली आहेत. काही मुस्लीम रीतिरिवाज्ञ आवर्जून दिले आहेत. या गोष्टींचा विचार केला की, राजव्यवहारकोशाच्या निर्मितीमागे रघुनाथानें उपोद्घातात दिलेल्या कारणांशिवाय पुढीलही दोन कारणे संभाव्य वाटतात. १) दक्षिणेकडे राज्यविस्तार झाल्यावर तिकडील भागात काम करण्यासाठी जाणाऱ्या लोकांना दख्खनी भाषेचा राज्यकारभाराला आवश्यक तेवढा परिचय करून देणे. २) स्वराज्याचा पसारा विशेषतः मराठी भाषिक मुलखात होता. या मुलुखात जी फर्माने वगैरे काढावी लागतील ती मराठीत असणे इष्ट होते. त्यामुळे राज़व्यवस्थेचे मराठीकरण हे तसे अपरिहार्यही होते. त्याला अस्मिताजागृतीची जोडही मिळाली.

काही भाषाविषयक टीपा—या कोशात जी यावनी भाषा आली आहे, तिला त्याकाळी दख्खनीयावनी असे म्हणत असत. या भाषेचे उर्दू हे नांव तुलनात्मक दृष्टचा उत्तरकालीन आहे. या भाषेत फारसी, अरबी, हिंदी, मराठी, कन्नड एवढेच नव्हे तर संस्कृत भाषेतील सुद्धा शब्द आहेत. संस्कृत भाषा ही लवचिक व समावेशक असल्याने तिच्यात यावनी शब्दांनाही वाव मिळाल्याचे आढळून येते. मात्र असे करतांना यावनी शब्दांचे संस्कृतीकरण करणे, क्वचित समासाचे पूर्वपद यावनी ठेवणे (उदा०=पातशाहपदम्), क्वचित मूळ शब्दाचे भाषांतर करणे (उदा० सबनीस=सर्वलेखकः), क्वचित पूर्वपदात येणाऱ्या यावनी शब्दाचे संस्कृतीकरण करणे (उदा० वाकनवीस=वाक्यविलेखः), अशा सारख्या क्लृप्त्या वापरल्या आहेत. गुनीजन हा शब्द यावनी असून त्याला रघुनाथाने गायकः असा पर्याय दिला आहे. यातील मूळ फारसी शब्द गना=गाणारा असा असून उत्तर भारतात त्याचे गुनियन असे रूप शास्त्रीय संगीतातील ख्यालांमध्ये वापरले जाते. दख्खनीयावनीत हा शब्द गुनीजन असा वापरला जातो. जयराम पिंडचे याने राधामाधवविलासचंपूत गायक याच अर्थी त्याचे गुणिजनः असे संस्कृतीकरण करून टाकले आहे. [३२]

पूर्वी गाण्याच्या व्यवसायात साजिंदे म्हणजेच साथीदार वेश्यापुत्र असत. त्यांनाही गुनीजनच म्हणत. त्यामुळे वेश्यापुत्र आपले आडनाव गुणिजन असे लावताना क्वचित आढळून येते.

चिटणिस, कारखानिस, डबीर, सुभेदार इ. शद्ब महाराष्ट्रात आडनांवे म्हणून वापरले जातात. राजकोशात आलेले चित्तेवाल, मुद्‌बखी हे शद्बसुद्धा महाराष्ट्रात तुरळक लोकांची आडनांवे असल्याचे आढळते.

मराठी शब्दांना फारसी प्रत्यय (उदा० चिठ्ठी+नवीस=चिटनवीस, चिटणीस) तर फारसी शब्दांना मराठी प्रत्यय लावण्याचे प्रकार (उदा० अफ्तागिर + या = अफ्तागिऱ्या) या दख्खनीयावनी भाषेत दिसून येतील. यावनी शब्दांचा व्युत्पत्तीच्या दृष्टीनें होणारा अर्थ व एखाद्या प्रदेशात रूढ असलेला अर्थ यात केव्हा केव्हा जमीन-अस्मानाचे अंतर पडलेले दिसून येते.

ताम्र, ताम्रानन, ताम्रमुख, ताम्रास्य हे संस्कृत शब्द शिवकाली केवळ मोंगलाना उद्देशूनच वापरलेले दिसतात. त्यांचा अर्थ त्याकाळी तांबड्या तोंडाची माणसे असा दिसून येत नाही. मोंगलांना व शिवपूर्व प्राचीन काळातील मुसलमानांना ताम्र हा शब्द लावण्यामागे एक संकेत दिसतो.

अमरकोशात ताम्र=तांबे (Copper) या धातुविशेषाचे पर्याय देताना म्लेच्छमुख असा एक पर्याय दिला आहे. [३३] म्लेच्छ या शब्दाला आनन, आस्य इ. तोंड, चेहरा या अर्थाचे शब्द जोडून तांबे (Copper) या अर्थी शब्द वापरतात. तांब्याला म्लेच्छमुख हा पर्याय कसा आला याचे गूढ आता जरी गडद झाले असले तरी हा पर्याय उत्तरकाली एका संकेताला जन्म देऊ शकला.

भारतात मुसलमानांचे राज्य सर्वत्र स्थापन झाल्यानंतर समाजात त्यांचा जागोजाग विविध नात्यांनी संचार होत असे. हिंदू पूजाविधीच्या वेळी मुसलमानाचा शब्द ऐकणे, त्याचे मुखदर्शन होणे अपवित्र मानले जात होते. एखादा मनुष्य काही धार्मिकविधीला सुरुवात करणार तोच एखादा मुसलमान समोर दिसला तर त्याच्यासमोर ' अरे घात झाला ! मुसलमानाचे तोंड-म्लेच्छमुख-दृष्टीस पडले ! ' असे दहशतीपोटी बोलणे अशक्य झाले होते. अशावेळी ' अरे, तांबे-ताम्र-दृष्टीस पडले ' असे म्हणण्याचा संकेत रूढ झाला असावा. पुढे कालौघात ताम्र=म्लेच्छमुख=मुसलमानाचे तोंड हा संकेत विस्मृतीत गेला. संकेतांचे विस्मरण होणे, त्यांचा गूढार्थ

सहज न आकलणे व त्यामुळे त्यांचे नवीन अर्थाने नूतनीकरण होणे हे प्रकार लोकव्यवहारात नेहमीच घडतात. त्याला अनुसरून ताम्र =मुसलमान याचा मोंगल असा अर्थसंकोच तर झालाच, पण ताम्रमुख, ताम्रानन, ताम्रास्य हे मूळ संकेताच्या दृष्टीने चुकीचे शब्द रूढ झाले [३४] त्याच्याही पुढची पायरी म्हणजे उत्तर पेशवाईत इंग्रजांचा सुळसुळाट वाढल्यावर लाल तोंडाची माणसे या अर्थी ताम्र, ताम्रानन हे शब्द इंग्रजांना वापरले जाऊ लागले.

हबशांना उद्देशून असलेला श्यामास्य हा शब्द मात्र त्यांच्या काळ्या रंगाला व चेहऱ्याला उद्देशून ताम्रास्य या धर्तीवर कोणत्याही संकेताशिवाय निर्माण झाला आहे हे उघड आहे.

संस्कृत कोशांतून ताम्रानन या शब्दाचा अर्थ तांबे (Copper) असाच सापडतो; यवन, मुसलमान असा सापडत नाही.

यावनी भाषेचा पगडा आपल्या भाषेवर इतका बसला आहे की समई, मुकटा, शाल, सखलाद, अर्गज, बुक्का, गुलाल, खिरापत (खिरापत हा एकच शब्द राजकोशात न आलेला) हे हिंदूंच्या देवघरातील अगदी सोवळ्यातले शब्द सुद्धा यावनी आहेत. यातील खिरापतीचे क्षिरापती असे संस्कृतीकरणही आढळून येते.

महाराष्ट्र राज्य हे अनेक वर्षे युध्यमान राष्ट्र होते. याचा परिणाम मराठी भाषेवर इतका विलक्षण झाला आहे की ज्याचा विशेष स्वरूपात शोध घ्यावा असा हा विषय आहे. उदाहरण म्हणून पुढील दोन वाक्प्रचार पहा –

१) पाखर घालणे– दात्यांनी आपल्या वाक्संप्रदाय कोशात याचा रूढार्थ पुढील प्रमाणे दिला आहे.– आश्रयास घेणे; आधार देणे; रक्षण करणे; आपल्या पंखाखाली घेणे.

पाखर या शब्दाचा संबंध गैरसमजाने म्हणा किंवा आलंकारिकतेने म्हणा पक्ष्यांच्या पंखांशी जोडला जातो. पक्षी रात्रीच्या वेळी आपल्या पिलांना

पंखाखाली घेतात, कोंबडी संरक्षणासाठी म्हणून पिलांना पंखाखाली घेते; परंतु त्यावरून पाखर शब्दाचा पाखरू किंवा पंख यांच्याशी संबंध जोडणे दूरान्वयाचे आहे. पाखर या फार्सी शब्दाचा अर्थ हत्तीचे किंवा घोड्याचे चिलखत असा आहे. दुष्ट अदृश्य शक्तींपासून आपले संरक्षण व्हावे म्हणून ईश्वरी कृपेचे कवच, चिलखत आपल्या भोवती निर्माण करण्याची आपली फार जुनी परंपरा आहे. वैदिक काळात यासाठी हवनीय द्रव्यांभोवती अग्नी फिरवीत व त्या क्रियेला पर्यग्नीकरण म्हणत. देवीकवच, शिवकवच, रामरक्षा नांवाचे वज्रपंजरस्तोत्र या स्तोत्रांच्या नावांवरूनही दैवी संरक्षणाची पूर्वोक्त कल्पनाच स्पष्ट होते. म्हणून पाखर घालणे या वाक्प्रचाराचा अर्थ संरक्षणात्मक आवरण निर्माण करणे असा घेणे योग्य. मूळ भारतीय परंपरा अशा रीतीने महाराष्ट्राच्या युध्यमान काळात यावनी शब्दातून व्यक्त झाली आहे.

२) गाशा गुंडाळणे – यातील गाशा हा शब्दही फारसी असून युद्धाशी संबद्ध आहे. घोड्यावर पाखर घातल्यावर त्याच्यावरून जे मऊ कापड घालीत त्याला गाशा म्हणत. अर्थात गाशा गुंडाळून पाखर काढणे इ. क्रिया युद्ध संपण्याशी संबद्ध आहेत किंवा युद्धातून पळून जाण्याशी संबद्ध आहेत. त्यामुळे गाशा गुंडाळणे याचा अर्थ आटोपते घेणे, संपुष्टात येणे, तसेच पळ काढणे असा होतो. यज्ञयागादी धार्मिक क्रियांचे प्राबल्य असण्याच्या काळात आटोपते घेणे, संपुष्टात येणे या अर्थी सूप वाजणे / वाजविणे हा वाक्प्रचार रूढ झाला होता.

अ. द. मराठे

- टीपा -

१) A descriptive catalogue of the Sanskrit manuscripts in the Tanjore Maharaja Sarfoji's Sarswati Mahal Library
Vol. IX (1930)

२) शरीरकष्टांचे वर्णन करणारा पुढील श्लोक प्रसिद्ध आहे:-
भग्नपृष्ठकटिग्रीवः स्तब्धदृष्टिरधोमुखः ।
कष्टेन लिखितो ग्रन्थः यत्नेन परिपालयेत् ॥

३) सकलकलालंकारमण्डितं रघुनाथपंडितं ....

वि. का. राजवाडे (संपादक) जयराम पिंडयेकृत
राधामाधवविलासचंपू - चित्रशाळा, पुणे, शके १८८४

४) हे अल्प चरित्र पुढील दोन पुस्तकांवर आधारित आहे.
  १) राधामाधवविलासचंपू (पूर्वोक्त)
  २) त्र्यं. शं. शेजवलकर - संकलिपत शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने.

५) उपोद्घात - श्लोक क्र. ६८

६) चिंचवडचे सिद्ध पुरुष नारायण देव आणि नारायण हणमंते यांच्यात गल्लत केल्याने रा. गो. काटे यांनी ' हणमंते हे मूळचे चिंचवडचे ' असे म्हटले आहे. ते चुकीचे वाटते.

७) उपोद्घात - श्लोक क्र. २८ ते ५३. विशेषत: श्लोक क्र. ४२ व ४८

८) बालवयस्थमपि स्थविरबुद्धिशालिनं सकलकलालंकारमण्डितं रघुनाथपंडितम् ....
राधामाधवविलासचंपू (पूर्वोक्त) पृ. २३३-३४

९) समर्थशिष्य व तंजावर मठाधिपती भीमस्वामी यांनी लिहीलेल्या समर्थ चरित्रात समर्थांची अंतकाळची वचने पुढील प्रमाणे आहेत.

अनेक वचेने समईचीं । सांगितली नाना परीची
रघुनारायण त्याची । जाली सए ॥ २९ ॥
पूर्वी चाफळी येउनी । मागितले श्री लागोनी !
सिद्ध जालियावरी स्मरण । नाही त्यास ॥ ३० ॥
त्यासी येक वेळ लिहीणे । पडेल तेच हो कर्णे
ऐसे आज्ञापिले वचेन । करुणालए ॥ ३१ ॥

सांप्रदायिक विविध विषय – सत्कार्योत्तेजक सभा, धुळे. रामदास आणि रामदासी, भाग १५, सर २, मणि ४, प्रथमखंड पृ. १४४.

१०) History of the Qutb Shahi Dynasty - H. K. Sherwani.

११) उपोद्घात श्लोक क्र. ७९. तसेच पुढील पुस्तक. –
India in the 17th century : Social economic and Political. (Memoirs of Francois Martin) Vol 1, Part II Translatd and annoted by - Lotika Varadarajan
पृ. ६४३ शेवटून ५ वी ओळ

१२) रघुनाथाने लावून दिलेली त्रिपंथीय व्यवस्था आजतागायत चालू आहे असे कळते. ही माहिती मला मद्रास येथील श्री. ए. एम्. राजगोपालन् यांनी पत्राने कळविली.

१३) टीप क्र. ११ मधील पुस्तकातून हे दोन प्रसंग घेतले आहेत अनुक्रमे पृ. ६४२-४३ व ७१५-१७.

१४) टीप क्र. ११ मधील पुस्तक पृ. ७२२ – २३
मार्टिनने फेब्रुवारी ८१ मध्येच रघुनाथाला मुक्त केल्याचे म्हटले आहे परंतु सरदेसाई व डॉ. कमल गोखले यांनी हा काळ वेगळा दिला आहे या संबंधीची चर्चा या पुस्तकाच्या संपादिकेने ८६ क्रमांकाच्या तळटीपेत केली आहे. पृ. ७२३ – २४.

१५) हा वृत्तान्त शिवचरित्रप्रदीपातील राजव्यवहारकोशाच्या अखेरीला दिला आहे.

१६) इदं पुस्तकं रानडचोपनामक – बल्लाळभट्टात्मजविष्णुंभटेन लिखितं ।। स्वार्थं परार्थं च ।। शक्के १७६७ विभावसूनामसंवत्सरे दक्षिणायने हेमंतर्तौ मार्गशीर्षशुद्ध त्रयोदश्यां गुरुवासरे तद्दिने समाप्तं जातं ।। ।।

१७) राजव्यवहारकोशाचे अनुकरण करणारा एक देश्यकोशनिघण्टु नावाचा छोटासा कोश तंजावरच्या पूर्वोक्त लायब्ररीत आहे. पण तो अशुद्धपणामुळे दुर्बोध वाटतो. तशातच तो दाक्षिणात्य भाषेतील शब्दांचे पर्याय देणारा असल्याने त्याच्या दुर्बोधतेत अधिकच भर पडली. परंतु अशा कोशाची निर्मिती ही राजव्यवहारकोशाच्या लोकप्रियतेचे गमक म्हणून दाखविता येईल.

१८) दिवेकर – आपटे संपादित कवीन्द्र परमानंदविरचित शिवभारत व आनंदाश्रम, पुणे प्रकाशित प्रत.
अध्याय ४, श्लोक क्रमांक ५७, ५८ व ६२.

१९) ग्रीष्मौषधाभूतमनन्तकृशानुयन्त्र-
मादित्यगोलमचिरद्युतिवर्तिजुष्टम् ।
गर्जत्तदुद्भवविभावसुतापशान्त्यै
क्षिप्ता इमे सजलकम्बलका नु मेघाः ॥
राधामाधवविलासचंपू (पूर्वोक्त) ४ - १४६

२०) देवीसिंग चौहान संपादित जयराम पिंडये विरचित पर्णालपर्वत-ग्रहणाख्यान- (या ग्रंथाचा उल्लेख पर्णालग्रहण असा संक्षिप्त केला आहे.)
सौवर्णबिन्दुललितैः प्रोल्लसद्द्विविधायुधैः । १ - ९

२१) कौशेयान्यथ तार्णानि क्षौमाणि फलजानि च ।
राङ्कवाणि तथौर्णानि वासांस्यभिनवानि च ॥ ३० - ३१
राजापुरच्या इंग्रज वखारीतील लूट

२२) पूर्वोक्त ग्रंथ (टीप क्र. ४) पृ. १६७. दक्षिण दिग्विजय या प्रकरणात.

२३) I. H. Qureshi – The Administration of the Mughul Empire. पृ. ५९ - ६२

२४) श्लोक क्र. ३-३४, ४-५०, १०-३७, १२-१७ १२-७६, इ.

२५) परमानजिता मानजिता भल्लभृता युधि ।
भिन्नभल्लस्य जग्राह करे क्रूरां कृपाणिकाम् ।। ४२ ।।
कृतहस्तं खङ्गहस्तं ततस्तं प्रेक्ष्य सस्मितम् ।
बाजराजो महाबाहुराजुहाव महाहवे ।। ४३ ।।
कालदण्डकरालेन करवालेन पाटल: ।
तदा प्रहारमकरोत् बाजराजस्य वक्षसि ।। ४४ ।।

शिवभारत (पूर्वोक्त) – अध्याय १२
ततो मुद्राधिपो मुख्य: कौक्षेयकसहायवान् ।। ३७ ।।
मुद्राधिकारिणा केचित् क्षुद्रा निस्त्रिंशपाणिना ।। ४० ।।
पर्णालपर्वतग्रहणाख्यान (पूर्वोक्त) ३-३७ व ४० उत्तरार्ध.
··· ···· खड्गे तु निस्त्रिंशचन्द्रहासासिरिष्टय: ।
कौक्षेयको मण्डलाग्र: करवाल: कृपाणवत् ।।
अमरकोश २ - ८ - ८९

२६) हत्यारांच्या माहितीसाठी पुढील पुस्तके चाळली. या पुस्तकांचा आवाका मोठा असल्याने त्यात शिवकालावर केवळ काही ओळी येतात. तशातच लेखकांचा दृष्टिकोन इकडून तिकडून गोळा केलेली माहिती भरपूर देण्याचा असल्याने चिकित्सेचा अभाव वाटतो.

१) ल. य. माणिकराव, बडोदे – श्रीप्रतापशस्त्रागार.
२) Dr. G. N. Pant, New Delhi – Indian arms and armour Vol. II
३) Egerton of Tatton – Indian and Oriental armour.
४) Rawson P. S. – Indian Sword.

२७) W. Irvine – The Army of the Indian Mughals.

२८) शरासनानि कर्षन्त: साङ्गुलीयकपाणय: ।
पृथुस्कन्धा: कबन्धाश्च प्रत्यधावन्नितस्तत: ।।
शिवभारत (पूर्वोक्त) १२ . ८१

२९) उल्काबाण: क्षणे तस्मिन्नुपाहितसलक्षणा: ।
प्रोद्भूवद्दा ऽणारावमापतन्ति नभोङ्गणात् ॥
गरलज्वलनज्वालानना: किमनिलाशना: ।
भ्रान्त्वा भ्रान्त्वा परिभ्रान्तां विदधुर्यावनीं चमुम् ॥
शिवभारत (पूर्वोक्त) = १४-२७-२८

३०) विप्राश्च बाहुजास्तद्वद्दूरव्याश्च जघन्यजा: ।
कांस्यकारा: कलादाश्च व्योकारा: शौल्बिकास्तथा ॥ १७ ॥
तक्षाण: पलगण्डाश्च नापिता: प्रतिहारका: ।
मालाकारा: कुम्भकारा: कारूकाश्च कुशीलवा: ॥ १८ ॥
तन्तुवायास्तुन्नवाया रङ्गाजीवाश्च भूरिश: ।
ताम्बूलिकाश्चाक्रिकाश्च रजका: शौण्डिका अपि ॥ १९ ॥
अजापालाश्च गोपाला देवलाश्च कृषीवला: ।
गान्धिकाश्च तथा कान्दविका: काम्बविका: पुन: ॥ २० ॥
मार्दङ्गिकाश्च वेणुध्मा: पाणिवादाश्च वैणिका: ।
वाद्यविद्याविदग्धाश्च लुब्धकाश्चासिधावका: ॥ २१ ॥
कुसीदवृत्तय: काण्डकारिणश्चाहितुण्डिका: ।
पादूकृत: पुलिन्दाश्च जालिकाश्च जनंगमा: ॥ २२ ॥
शिवभारत (पूर्वोक्त) ३१ . १७-२२

३१) I. H. Qureshi – पूर्वोक्त पृ. ४०

३२) १) तत: स कदाचित्तेन सवाईमहाराजानुजेन गुणिजनगीततत्कविकृतचंपूचमत्कारचंद्रचकोरेण महाराजदत्तसमस्याप्रकरणं शृण्वता ....

२) ततो महाभारतनित्यपुराणाकर्णनानन्तरं गुणिजनगायनप्रसंगे पुनरप्येवमवदत् ।

राधामाधवविलास चंपू (पूर्वोक्त) उल्लास १० पृ. २४४-२४५
या शब्दाच्या या व्युत्पत्तीविषयी मी 'महाराष्ट्र टाइम्स्' (१७ ऑगस्ट ८३) मध्ये 'गुणीजन नव्हे; गुणवन्त' या शीर्षकाचे पत्र लिहून हा शब्द हल्ली चुकीच्या अर्थाने रूढ होऊ पहात आहे असे प्रतिपादन केले होते. त्यावर हा शब्द संस्कृतच आहे असे प्रतिपादन

करणारी काहीं पत्रे आली होती. त्यांच्या लेखकांनी अभिनिवेशाच्या भरात पुढील मुद्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे–

१) इन्नत शब्दांचा ' जन ' या पदाशी संस्कृतमध्ये समास केला जात नाही. तो तसा करण्याची आवश्यकताच नाही कारण जो अर्थ इन् प्रत्ययाने सूचित केला आहे तोच पुन्हा ' जन ' या पदाशी समास करून सूचित होणार आहे.

२) गुणीजन हा शब्द संस्कृत समास असता तर त्याचे लेखन गुणिजन असे करणे इष्ट तसे ते केले जात नाही.

३) गुणीजन या शब्दाचा मराठीतील रूढ अर्थ गायक, कलावंत असाच आहे. या शब्दाचे संस्कृतीकरण करणाऱ्या जयरामाने सुद्धा तो गायक याच अर्थाने (गुणिजन असा लिहूनसुद्धा) वापरला आहे.

३३) .... अथ ताम्रकम् ।
शुल्बं म्लेच्छमुखं व्द्यष्टवरिष्टोदुंबराणि च ।

— अमरकोश २ - ९ - ९७

३४) हा शब्द मोगलानाच का लावला गेला याचे स्पष्टीकरण ' शिवाजी ॲण्ड स्वराज्य ' या पुस्तिकेतील सेतुमाधवराव पगडी यांच्या पुढील उद्गारात मिळू शकेल त्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणापेक्षा मी दिलेले स्पष्टीकरण वेगळे आहे; पण हा शब्द कोणत्या परिस्थितीत रूढ झाला असावा याचे त्यात दिग्दर्शन आहे.

'Indeed the men who ruled India from the central throne of Delhi during the medieval period, and their leading noblemen, were all foreigners and not Indian Muslims. As Prof. M. Mujeeb observes in his scholarly work on the Indian Muslims, Muslim rule in medieval India was a minority government based on the apathy of the ruled and consisting heavily of foreign elements (M. Mujeeb : The Indian Muslims, George Allen and Unwin, London, 1967)

It was this alien rule, which became intolerable under the fanatic Emperor Aurangzeb, that Shivaji wanted to bring to an end. It is interesting to note in this connection that in Shivaji's documents Mughals are referred to as 'तुर्क' or ताम्र (the red faced ones). A mention of their religion is rarely made. The Siddis too are called not the Mnslims of Janjira but 'जंजिऱ्याचे श्यामल' (the dark complexioned people of Janjira). The emphasis in Maratha documents is thus on the racial characteristics of these foreigners.

Shivaji and Swarajya – PP. 32
by – Orient Longman Ltd. 1975

॥ अथ राजव्यवहारकोशः ॥

उपोद्घातः

॥ श्री गणाधिपतये नमः ॥

१) मदोत्कटकटभ्रमद्भ्रमरवृंदपक्षानिला-
शनप्रमुदित स्फुरत्फणिफणामणिज्योतिषा ।
घनीभवदनेकपाकृतिमुखे सखे चिन्तय
प्रवालदलमञ्जुलं किमपि तुन्दिलं तन्महः ॥ १ ॥

२) मुक्तादामरुचिः क्वचित् क्वचिदपि स्वाराणमणीभासुरम्
गंगाक्लिन्नजटं क्वचित् सुमरसक्लिन्नालकं कुत्रचित् ।
एकत्राजिनभृत्परत्रविमलक्षौमं क्वचिद्वासुकिम्
मंजीरं च पदे क्वचिद्दधदहं सेवेऽर्धयोषं महः ॥ २ ॥

३) भजेयं शर्वाणीचरणयुगुलं दैवतगणा-
नमन्तो यच्छोणच्छवि सुचिरमालोक्य रुचिरम् ।
नमद्भवतस्वान्तस्थितगुरुतमः पाटनपटु-
र्भवेद्बालादित्यः किमयमिति तर्कं विदधते ॥ ३ ॥

४) अधराहितमंजुवेणुनालम्
घननीलं व्रजबालिकाविलोलम् ।
अलकावलिभासमानभालम् ।
कलये चेतसि नन्दगोपबालम् ॥ ४ ॥

५) यस्योरसि रमा भाति चपलेव शरद्घने ।
सुधांशुधवलाकारं वासुदेवं विनौमि तम् ।

६) चिन्तामण्यवतार एव भगवान् यः पावनीरोधसि
ग्रामे चिंचवडाभिधे वितनुते वासं सतामग्रणीः ।
लोकानुग्रहकारिणं गजमुखध्यानाप्तसिद्ध्यष्टकम्
श्रीनारायणदेवमार्यमनिशं सेवे तमिष्टार्थदम् ॥ ६ ॥

७) पृथ्वी कदाचिद्यवनाभिधानैस्तिष्यावतीर्णैः किल यातुधानैः ।
संतापिता सर्वसुराग्रगण्यं लोकेशमागाच्छरणं शरण्यम् ॥ ७ ॥

८) वशिष्टमुख्यैर्विहितात्मसख्यैर्ब्रह्मर्षिभिः सन्नुतपुण्यकीर्तिम् ।
तपोनिकायैः प्रणतं सकायैर्वाग्देवतालंकृतदिव्यमूर्तिम् ॥ ८ ॥

९) कृतावलोकं त्रिदिवेशवृन्दे किरीटसंस्पृष्टपदारविंदे ।
चतुर्मुखं संसदि सत्यलोके पद्मासनं सा सहसा लुलोक ॥ ९ ॥

१०) कृतप्रणामाथ तदक्षिसंज्ञाज्ञाताभ्यनुज्ञा निजखेदमुर्वी ।
विज्ञापयामास न हि प्रभूणामाज्ञां विना केऽपि वदन्ति विज्ञाः ॥१०॥

११) लोकेश लोके शयितां कथं वा नावैषि को वैष विभोरुदासः ।
दीनामनाथामिव बाधते मां हीनाशयोऽयं कलिदैत्यसंघः ॥ ११ ॥

१२) भयादमीषां द्विजदैवतानांमर्चाविधौ संप्रति नैव चर्चा ।
धर्मांकुरे दुष्कृतिभिर्विलूने स्वप्नेऽपि नाज्ञासिषि हन्त यज्ञान् ॥१२॥

१३) अलं बहूक्त्या ननु दीनबन्धो त्वं मां तथाभ्युध्दर शोकसिंधो-
र्मग्ना यथा दैत्यभयादहं सा पुरोद्धृताब्धेः प्रथमेन पुंसा ॥ १३ ॥

१४) इतीरितः संसदि पद्मजन्मा मृद्वया समाश्वास्य गिरा धरित्रीम्
साकं तया सर्वसुपर्वभिश्च द्रुतं मुरारेः स जगाम धाम ॥ १४ ॥

१५) तत्रायमाखण्डलरत्ननीलं प्रतप्तजाम्बूनदतुल्यचैलम् ।
वक्षस्थलोद्भासितकौस्तुभालं कृतस्फुरन्मौक्तिकगुच्छमालम् ॥१५॥

१६) अंगप्रभाभिर्घनमेचकाभिः किर्मीरभूषामणिकान्तजालम् ।
भुजोपगूढांकनिषण्णलक्ष्मीपीनस्तनाश्लिष्टभुजान्तरालम् ॥ १६ ॥

१७) घोरारवक्षोभितसागराम्बु वामेन हस्ताम्बुरुहेण कम्बुम् ।
दधानमुच्छिन्नकठोरनक्रं सव्येतरेणापि करेण चक्रम् ॥ १७ ॥

१८) अभीतिमुद्राङ्कितहस्तपङ्कजं देवर्षिगीतामलकीर्तिपुञ्जम् ।
शार्ङ्गादिभिः शस्त्रवरैः सदेहैरुपस्थितं दारितदैत्यदेहैः ॥ १८ ॥

१९) सरत्नसिंहासनसन्निविष्टं पुरस्थितप्राञ्जलिताक्ष्यजुष्टम् ।
चराचराणां जगतामधीशं नारायणं कोटिरविप्राकाशम् ॥ १९ ॥

२०) दृष्ट्वा विरिंचिः प्रसृतेन दिक्षुतत्तेजसा व्याकुलितात्मचक्षुः ।
निमील्य चोन्मील्य मुहुः स्वनाम संकीर्त्य साष्टांगमथो ननाम ॥२०॥

२१) उत्तिष्ठ वत्सेति सुधातिशायी वचो मुकुन्दस्य निशम्य वेधाः ।
उत्थाय बाष्पाकुलितायाक्षस्तुष्टाव सन्तुष्टमना मुरारिम् ॥ २१ ॥

२२) जगद्विधात्रे रजसावृताय सत्वेन तत्पालनतत्पराय ।
संहारकायापि च तामसाय नमो नमस्ते त्रिगुणात्मकाय ॥ २२ ॥

२३) यदंघ्रिनिष्यंदपयः पुनाति यन्नामसंकीर्तनवज्जगन्ति ।
यद्दृग्द्वयीकालमिमं व्यनक्ति नक्तं दिनं चेति नमोऽस्तु तस्मै ।। २३ ।।

२४) भवानजन्मापि जगद्हिताय मत्स्यादि जन्मानि तनोति विष्णो ।
अनन्तरूपेण बिभर्षि भूमिं सहस्रशीर्षा पुरुषस्त्वमेव ।। २४ ।।

२५) त्वन्मायया मोहित एष लोकः कलत्रपुत्रादिषु बभ्रमीति ।
त्वदंघ्रिमेकं शरणं प्रपन्नस्तामाशु जन्तुः प्रतरीतरीति ।। २५ ।।

२६) यस्मिन्ननन्ताः श्रुतयोऽपि मूकाः खंजानि योगीन्द्रमनांसि यत्र ।
तं ते समस्तं महिमातिरेकं स्तोतुं प्रभुः स्यां कथमब्जनाभ ।। २६ ।।

२७) न यावनं दुर्नयजातमेषा सर्वंसहापि क्षमते विसोढुम् ।
तद्भारमस्याः परिहर्तुमाशु म्लेच्छापहाराय हरे यतेथाः ।। २७ ।।

२८) उदीरितामात्मभुवा गिरं तामाकर्ण्य मंदस्मितमंजुलास्यः ।
विचिन्त्य भूशर्मविधावुपायं वाचं गभीरां भगवानुवाच ।। २८ ।।

२९) कार्ये महत्यत्र नियोजयामश्चन्द्रार्धचूडं वयमेव गत्वा ।
ध्रुवं विधाता हितमस्मदीयं देवो जगत्त्राणधुरंधरः सः ।। २९ ।।

३०) विना तमेनान् किल यातुधानान् संहर्तुमीष्टे विबुधेषु को वा ।
गाढं तमिस्रासु तमः समस्तं प्रभुः प्रहर्तुं रविरेव नान्यः ।। ३० ।।

३१) इतीरयित्वा हरिरब्धिकन्याहस्तावलम्बी सहसोदतिष्ठत् ।
कैलासशैलं च सुरैः समेतस्तार्क्ष्यं समारुह्य रयादयासीत् ।। ३१ ।।

३२) उत्फुल्लदृष्टि मुहुरुन्नतकंटनालं शैलं शिवस्य गगनंलिहमुच्चशृंगैः ।
ईक्षांबभूवुरमरा जवनैर्विमानैराकाशभागमवकाशविहीनयन्तः ।।३२।।

३३) यश्चुम्बदम्बुददलेन शिरस्थितेन सानुद्वयेन कुहचित्समये विभाति ।
शृंगाग्रजाग्रदिव कूलविदारणेन जंबालजालमसितं दधदीशवाहः ।।३३।।

३४) यत्रेशमौलिहरिणांककरद्रुतासु चन्द्रोपलालिषु मुहुः स्खलनेन खंजः ।
विश्रम्य मंदमरविंदवने समीरः क्रीडाश्रमं हरति कुंजगतामरीणाम् ।।३४

३५) यत्र वीक्ष्य रहसि प्रतिबिंबान्रत्नभित्तिषु धृतेतरशंकाः ।
वारयन्ति सुरते सुरमुग्धाः कामिनो मुहुरपत्रपमाणाः ।। ३ ।।

३६) यत्र कीचकरवश्रुतितानैः कुंजवेश्मसु हयास्यवितानैः ।
काकलीकृतपिकालिविगानैः स्तूयते मृडयशो मृदुगानैः ।। ३६ ।।

३७) बकुलैः कुसुमाकुलैः प्रियालैरपि यः कूजितकोकिलै रसालैः ।
निबिडालिकुलैरनेकसालैः कृतमालैरपि भासते तमालैः ॥ ३७ ॥

३८) हरिणाः करिणश्च यत्र मूका हरिभल्लूकवृकाश्च दंदशूकाः ।
जहति श्रुतिकिन्नरालिगीता निजवैरं वनजन्तवोऽप्यभीताः ॥ ३८ ॥

३९) यानादवारुह्य महीधरेशे तस्मिन् जनानन्दकरप्रदेशे ।
आसेदुरीशस्य सभानिवेशं प्राप्याथ ते नन्दिमुखान्निदेशम् ।

४०) जय शङ्कर पार्वतीश शम्भो जगदीशेति शिवं मुहुः स्तुवन्तः ।
प्रणिपत्य यथाधिकारमेते विभुनेत्रांचलसंज्ञया निषेदुः ॥ ४० ॥

४१) स्वागतं तव हरे समास्यतामत्र पीठ इति विष्णुरादरात् ।
आसने पुरभिदोपवेशितः स प्रणम्य नुतिपूर्वमभ्यधात् ॥ ४१ ॥

४२) वीक्षितुं यदहमम्बुजासनस्पर्धया कलितकोलविग्रहः ।
नैव दीर्णसुतलोऽप्यपारयं हन्त तत्पदमरीक्ष्यतेऽधुना ॥ ४२ ॥

४३) दग्धकाममपि वामलोचना सात्कृतात्मकतयातिकामिनम् ।
त्वां धृतास्थिमपि सर्वमंगलालंकृतं कथमवैमि तत्त्वतः ॥ ४३ ॥

४४) देवदेव रिपवो वसुन्धरां पीडयन्ति यवना भृशातुराम् ।
तत्कुरुष्व जगतीसमीहितं म्लेच्छवर्गमधुना शृणीहि तम् ।

४५) आकर्ण्य बलिजिद्वाचं निर्वर्ण्य च महीरुजम् ।
शरण्यः शङ्करो वाणीमभाणीन्मधुसूदनम् ॥ ४५ ॥

४६) निहता भवता हरे पुरा ये ननु पौलस्त्यमुखाः सुखाय भूमेः ।
अहितान् पुनरेव जन्मभाजो जहि तान् प्राप्तनराकृतिस्त्वमेव ॥४६॥

४७) येषां कलौ दुर्नयमेव सोढुं बुद्धावतारः कलितो मयाभूत् ।
तेषां विनाशं स्फुटमेव कर्तमसांप्रतं मे मनुषे यदीत्थम् ॥ ४७ ॥

४८) उपायमप्यत्र वदामि भूमिमवाप्य मन्नामनिगूढभावः ।
साहाय्यमंशेन पुनर्भवान्याः लब्ध्वापि तानाशु सुखेन हन्याः ॥४८॥

४९) अस्ति प्रशस्तविभवो भुवि भानुवंशे
विख्यात भोसलकुलामृतसिन्धुचन्द्रः ।
श्रीशाहवर्मनृपतिर्विधिपार्वतीश-
श्रीशाः हविः क्रतुषु नित्यमदन्ति यस्य ॥४९ ॥

५०) तस्य प्रिया भूपतिभर्तुरार्या रूपेण संतर्जितकामभार्या ।
साध्वी जिजूर्नाम सुलक्षणास्ते पत्नी दिलीपस्य सुदक्षिणेव ॥५०॥

५१) त्वं शाहपृथ्वीपतिवीरपत्न्यामस्यां समासाद्य मनुष्यजन्म ।
म्लेच्छापहृत्या सुखमारचय्य भूमेः पुनः स्थापय वर्णधर्मान् ॥ ५१ ॥

५२) पार्थं प्रति प्राक् तव धर्महानौ सृजेयमात्मानमिति प्रतिज्ञा ।
जगत्सुगीतैव तदत्र कार्षीः कार्येऽधुना माधव मा विचारम् ॥ ५२ ॥

५३) तथेति तां पुंगवकेतुराज्ञां शौरिः प्रतिज्ञाय सुहृष्टचेता ।
विसृज्य सर्वानमरान् गृहाय प्रणम्य चेशं स्वगृहानियाय ॥ ५३ ॥

५४) अथ पाण्डुमुखेन सूचितं सा गृहिणी शाहनृपस्य धाम विष्णोः ।
यवनान्धतमिस्रहारिगर्भे शशिनं माघवनि दिशेव दध्रे ॥ ५४ ॥

५५) समये सुदती शुभावहे सा जगतीमानसशर्मनिर्मिमाणम् ।
सुषुवे तनयं शरीरभासा सहसा हन्त जयन्तमर्यमाणम् ॥ ५५ ॥

५६) नेदुर्दुन्दुभयो मुदाथ ननृतुर्देवाङ्गनाश्चारणाः
पुष्पौघं ववृषुर्जगुश्च सुकलं विद्याधराः किन्नराः ।
भास्वानप्यतिभासते स्म परितः शीताश्च वाताः ववु-
स्तस्मिन् सर्वजनावनाथकमलानाथेऽवतीर्णे भुवि ॥ ५६ ॥

५७) संस्कारकर्म निखिलं गुरुणा विधाय
बालः शिवेति कृतमङ्गल-नामधेयः ।
एधांबभूव जनतानयनोत्सवेन
साकं स सौष्ठवपुषा वपुषा शशीव ॥ ५७ ॥

५८) किं भाविदिग्जयमसूसुचदात्मनोऽगै-
र्बाल्ये क्रमादपगते नृपशाहसूनु : ।
यस्मात्कपाटमुरसा ककुदं वृषस्य
स्कन्धश्रिया भुजयुगेन युगं जिगाय ॥ ५८ ॥

५९) नयनोत्पलमालयैव पूर्वम्
वृतमप्यार्द्रमधूकमालिकाभिः ।
तमनन्यजसुन्दरं कुमारम्
वरयामासुरथ क्षितीशकन्याः ॥ ५९ ॥

६०) कृतोद्वाहः सोऽयं पितुरथ समादाय शिरसा
निदेशं भूदेवैः कृतविजयदस्वस्तिवचनः ।
प्रतस्थे दिक्चक्रं यवनगणसंक्रान्तमखिलम्
विजेतुं निःसाणध्वनिबधिरिताशः सह बलैः ।। ६० ।।

६१) त्वंगत्तुंगतुरंगमक्षुरपुटक्षुण्णक्षितिप्रोच्छल-
द्धूलिधूसरतांबरांगणमणिः भूतामराश्चर्यदम् ।
खड्गत्रोटितकुंभिकुंभविगलन्मुक्तावकीर्णं रणम्
संदष्टौष्ठपुटैर्भटैः सह तदा तस्योदभूद्यावनैः ।। ६१ ।।

६२) तत्खड्गोत्कृत्तमत्तप्रमुखरिपुगणोद्वृत्तनृत्यत्कबन्धैः
भल्लाग्रोदस्तमस्तालिभिरपि विकटाभिस्ततं खं समस्तम् ।
दृष्ट्वोद्यत्केतुराहुप्रकरमिवभयाच्छंकमानस्य भानो-
रुद्दीर्णं बिम्बमेव ध्रुवमरिनिकरद्वारभावं बभार ।। ६२ ।।

६३) दिल्लीशस्याथ पत्तिप्रकरमिषचलद्वीचिमालान् समन्ता-
दुग्रग्राहौघशंकावितरणनिपुणोद्दामवाहद्विपाद्यान् ।
सेनाम्भोधीननेकान्वलदसिभुजगोद्दण्डदोर्दण्डमथ्ना
निर्मथ्योदारकर्मा रणभुवि जगृहे वीरलक्ष्मीः स नैका ।। ६३ ।।

६४) शिवः स्वनामानुगुणं गुणज्ञः प्रायो निवासं स विधातुकामः
शैलावलिं दुर्गविधानदंभात् कैलासकल्पामखिलामकार्षीत् ।। ६४ ।।

६५) क्रमेण जित्वा स दिशश्चतस्रो राजा शिवच्छत्रपतिः प्रतापात् ।
निःशेषयन् म्लेच्छगणं समस्तं पाति स्म पृथ्वीं परिपूर्णकामः ।। ६५।।

६६) यः सिद्धिमावहति चिंचवडाधिवासी हेरंबपादभजनेन महानुभावः ।
नारायणाभिधसुधीतिलकादवाप तस्मादनुग्रहमसौ शिवसार्वभौमः।।६६।।

६७) आसंस्तस्य कुलामात्यः शिववर्मंमहीभृतः ।
केचिन्मौद्गल्यवंशाब्धिपूर्णचन्द्राः महीसुराः ।। ६७ ।।

६८) तेषु विख्यातकर्माभूत् त्रिमल्लाख्यो युधाग्रणीः ।
दधते हनुमन्नाम यद्वंश्याः विक्रमार्जितम् ।। ६८ ।।

६९) तस्यासीत्तनयो धीमान्यज्वा नारायणाभिधः ।
यद्यशोराजहंसस्यब्रह्माण्डं पंजरीयति ।। ६९ ।।

७०) ब्रह्मप्रमोदानुभवे विदेहः शस्तो नु षट्कर्मविधिः सदेहः ।
यो दानविस्मारितकामधेनुः स्वर्गद्रुचिन्तामणिभानुसूनुः ॥ ७० ॥

७१) यस्याध्वरे बुभुजिरे विधिनार्पितानि
हव्यान्यनादृतसुधा विबुधा रसेन ।
आतेनुरस्वरसतामथ मंत्रपूत-
मास्वाद्य सोममपि सोमकलास्वजस्रम् ॥ ७१ ॥

७२) प्रत्याम्नायः सुरर्षेः प्रतिनिधिरथवा किं दधीचेरयं किम्
विश्वामित्रावतारः किमखिलविबुधाचार्यपर्याय एषः ।
व्यासादेशः किमत्रेः प्रतिकृतिरथवा किं वसिष्ठागमोऽसा-
वित्थं यस्मिन्नुदाराद्भुततरचरिते तेनुरार्या वितर्कम् ॥ ७२ ॥

७३) शुद्धाशयस्याभवदस्य सूनुः सन्मार्गचारी विमलः कलावान् ।
भूदेववर्यो रघुनाथनामा पीयूषराशेरिव शीतधामा ॥ ७३ ॥

७४) योऽसौ सुधीगीतगुणप्रकाशो विश्राणनापूरितयाचकाशः ।
यशःसुधाभिर्धवलीकृताशः कथं न वर्ण्यः कृतवैरिनाशः ॥ ७४ ॥

७५) प्रथितयशसि यस्मिन् संतताभीष्टदान-
व्रतकृतदृढदीक्षे मोदिताशेषलोकम् ।
भुवममरगवी सा वीक्षितुं लज्जमाना
कलयति किमजस्रोत्तानसंचारमभ्रे ॥ ७५ ॥

७६) नारायणात्मा यः साक्षात्कमलाकरसंग्रही ।
कथं न स्यात्पदाक्रान्तबलिप्रत्यर्थिमस्तकः ॥ ७६ ॥

७७) नारायणांशभूतोऽपि शिवस्य हृदयंगमः ।
रामोऽस्य सुकवीशस्य न समो भूतकाकविः ॥७७ ॥

७८) क्रान्त्वा मंत्रबलेन यस्य निखिलामाशामवाचीं क्रमात्
कर्नाटक्षितिपांश्च भागनगराधीशं च कृत्वा वशे ।
आसेतुप्रसृतांश्च यावनगणानुच्छिद्य तत्रावनी-
पातारं व्यदधाद्यमेत्र तु शिवः सम्राडमात्यं निजम् ॥ ७८ ॥

७९) तद्राज्यमस्मिन् विनिवेश्य राजगिरिं शिवच्छत्रपतौ प्रयाते ।
शासत् क्षितिं धर्मपरः प्रदाय वृत्तीः स भूदेवगणानपुष्णात् ॥७९॥

८०) उत्सादितां चिरतरं यवनैः प्रतिष्ठाम्
शोणाचलेशितुरयं विधिवद्विधाय ।
श्रीमुष्णवृद्धगिरिरुक्मसभाधिपानाम्
पूजोत्सवान् प्रथयति स्म सहात्मकीर्त्या ॥ ८० ॥

८१) कृते म्लेच्छोच्छेदे भुवि निरवशेषं रविकुला-
वतंसेनात्यर्थं यवनवचनैर्लुप्तसरणिम् ।
नृपव्याहारार्थं स तु विबुधभाषां वितनितुम्
नियुक्तोभूव्दिद्वान्नृपवरशिवच्छत्रपतिना ॥ ८१ ॥

८२) सोऽयं शिवच्छत्रपतेरनुज्ञां मूर्धाभिषिक्तस्य निधाय मूर्ध्नि ।
अमात्यवर्यो रघुनाथनाम करोति राजव्यवहारकोशम् ॥ ८२ ॥

८३) उद्देशाय गृहीतात्र म्लेच्छभाषा न दुष्यति ।
नापेक्ष्यते किं रत्नानि खचितुं जतु जातुचित् ॥ ८३ ॥

८४) विपश्चित्संमतस्यास्य किं स्यादज्ञविडम्बनैः ।
रोचते किं क्रमेलाय मधुरं कदलीफलम् ॥ ८४ ॥

– उपोद्घाताचे भाषान्तर –

१) मदरसाने थबथबलेल्या गंडस्थळांभोवती फिरणाऱ्या भृंग-संघांच्या पंखांचा वारा लागल्यामुळे सर्पांच्या मस्तकावरील मण्यांचे तेज अधिकच उजळून ज्या गजमुखाकृतीवर दाटत आहे, अशा पोवळ्यांच्या तुकड्यांप्रमाणे सुंदर व तुंदिल अशा त्या श्रेष्ठाचे हे मित्रा तू चिंतन कर.

२) एकीकडे मोत्यांच्या माळांचे तेज तर एकीकडे इन्द्रनीलमण्याचे तेज; एकीकडे गंगेच्या पाण्याने ओल्या झालेल्या जटा तर एकीकडे फुलातील रसामुळे चिकट झालेले केस; एकीकडे हत्तीचे कातडे तर एकीकडे पांढरेशुभ्र रेशमीवस्त्र; एका पायात वासुकी सर्प तर एका पायात पैंजण धारण करणाऱ्या त्या अर्धनारीनटेश्वराची मी पूजा करतो.

३) ज्याचे लाल व सुंदर तेज चिरकाल पाहिल्यानंतरही त्यावर नमन करणारे देवांचे संघ, ' नम्र होणाऱ्या भक्तांच्या मनांत असलेल्या अज्ञानरूपी घनअंधकाराचा नाश करणारा हा बालसूर्य तर नाही ना ? '

असा तर्क करतात त्या पार्वतीच्या चरणयुगुलांचे मी भजन करतो.

४) ज्याच्या ओठावर मंजुळ बासरी आहे, जो ढगाप्रमाणे सावळा आहे, जो गोपींवर लुब्ध झाला आहे, केसांच्या झुलपांमुळे ज्याचे कपाळ सुंदर दिसत आहे-अशा नंदपुत्र कृष्णाचे मी मनात चिंतन करतो.

५) ज्याच्या छातीवर लक्ष्मी शारदीय ढगावर चमकणाऱ्या विजे-प्रमाणें शोभत आहे त्या चंद्राप्रमाणे शुभ्र अशा विष्णूला मी नमन करतो.

६) जो चिंतामणीचा अवतार आहे, जो सज्जनांमध्ये अग्रणी आहे, जो जगावर अनुग्रह करतो, गजाननाच्या ध्यानामुळे ज्याला अष्टसिद्धी प्राप्त झाल्या आहेत, जो पवनानदीच्या तीरावरील चिंचवड गावात रहातो-त्या भगवान श्रीनारायण देवाचे मी इच्छित प्राप्तीसाठी अहोरात्र पूजन करतो.

७) कलियुगात अवतीर्ण झालेल्या यवन नांवाच्या राक्षसांमुळे त्रासलेली पृथ्वी एकदा सर्व देवांचा अग्रणी व शरण जाण्यास योग्य अशा ब्रह्मदेवाला शरण गेली.

८) ब्रह्मैक्य साधणारे वशिष्ठादी मुख्य ऋषि ज्याची पवित्र कीर्ती गात आहेत, शरीर धारण करणारी तपे ज्याच्यासमोर नम्र झाली आहेत, ज्याचे दिव्य शरीर वाक्देवतेने भूषविले आहे,

९) आपल्या चरणकमलांना मुकुटांसह स्पर्श करणाऱ्या देववृंदांकडे जो पहात आहे अशा त्या ब्रह्मदेवाला तिने सत्यलोकाच्या सभेत कमला-सनावर बसलेले पाहिले.

१०) त्याला प्रणाम केल्यावर त्याने केलेल्या डोळ्यांच्या खुणेने परवानगी प्राप्त झाल्यावर पृथ्वीने त्याला आपले दुःख कथन केले. स्वामीने आज्ञा केल्याशिवाय कोणीही ज्ञानी सभेत बोलत नसतो.

११) हे परमेश्वरा, जगात वाईट अवस्थेत पडलेल्या माझे दुःख तू जाणीत नाहीस. काय ही तुझी उदासीनता ? कलियुगात अवतीर्ण झालेला हीन वर्तनांचा हा राक्षससंघ मी अनाथ असल्याप्रमाणे मला छळत आहे.

१२) त्यांच्या दराऱ्यामुळे देव ब्राह्मण यांच्या पूजेचे कोणी नांवही काढीत नाही. त्यांच्या दुष्ट कृत्यांमुळे धर्मरूपी वृक्षाचा अंकूरच नष्ट होत असून यज्ञयागादी कृत्ये स्वप्नातसुद्धा होत नाहीत.

१३) हे दीनबंधो, अधिक काय सांगणार ? या दु:खरूपी सागरातून मला वर काढ. राक्षसांच्या भीतीने समुद्रात बुडालेल्या मला विष्णूने जसे पूर्वी वर काढले तसेच तू कर.

१४) सत्यलोकाच्या सभेत असे बोलला गेलेला तो ब्रह्मदेव मृदु शब्दांनी पृथ्वीचे सांत्वन करून ती व इतर देव यांच्यासह विष्णूच्या निवासस्थानाकडे त्वरेने निघाला.

१५) त्या ठिकाणी, इन्द्रनील रत्नाप्रमाणे कान्ती असलेल्या, तप्त सोन्याप्रमाणे तेजस्वी वस्त्र धारण करणाऱ्या, छातीवर झळकणाऱ्या कौस्तुभाच्या तेजाने ज्याच्या छातीवरील मोत्यांच्या माळा अधिकच तेजस्वी झाल्या आहेत;

१६) ज्याच्या कृष्णमेघाप्रमाणे असलेल्या अंगकांतीवर, धारण केलेल्या अलंकारांतील रत्नांच्या विविध रंगांचे जाळे तयार झाले आहे; एका हाताने कवळून मांडीवर बसविलेल्या लक्ष्मीने आपल्या पुष्ट स्तनांनी ज्याच्या छातीला आलिंगन दिले आहे;

१७) ज्याच्या भयंकर आवाजाने समुद्राचे पाणी क्षुब्ध होते असा शंख डाव्या करकमलात धारण करणाऱ्या, मगराची कठिण त्वचा भेदून टाकणारे चक्र उजव्या हातात धारण करणाऱ्या;

१८) एका हाताने अभयमुद्रा धारण करणाऱ्या, देवर्षींनी गायलेल्या धवलकीर्तीचे निधान असणाऱ्या, दैत्यांचे देह विदारून टाकणारी शार्ङ्गादी श्रेष्ठ शस्त्रे ज्याच्यासमोर सदेह ठाकली आहेत;

१९) जो रत्नखचित सिंहासनावर बसला आहे; ज्याच्यासमोर गरुड हात जोडून उभा आहे; सर्व सजीव निर्जीव सृष्टीचा ईश असलेल्या, कोटी सूर्याप्रमाणें तेज असणाऱ्या

२०) अशा त्या विष्णूला पाहिल्यावर, त्याच्या सर्व दिशांना पसरलेल्या तेजामुळे दिपावलेले आपले डोळे पुन्हा पुन्हा उघडीत व मिटत ब्रह्मदेवाने स्वतःच्या नावाचा उच्चार करीत साष्टांग नमस्कार केला.

२१) ' बाळ ऊठ ' असे विष्णूचे अमृतापेक्षाही गोड शब्द ऐकल्यावर उठून विशाल डोळ्यांत अश्रू दाटलेल्या ब्रह्मदेवाने संतुष्ट मनाने विष्णूची स्तुती केली.

२२) रजोगुणाने वेढल्यामुळे हे जग निर्माण करणाऱ्या, सत्वगुणामुळे त्याच जगाचे परिपालन करण्यास तत्पर असलेल्या आणि तमोगुणामुळे त्याचा नाश करणाऱ्या अशा त्रिगुणात्मक तुला नमस्कार असो.

२३) ज्याच्या पायांपासून निघणारे गंगाजल व ज्याचे गायलेले नाम सर्व जग पवित्र करते; ज्याचे चंद्रसूर्यरूपी डोळे दिवस व रात्र व्यक्त करतात त्या तुला नमस्कार असो.

२४) हे विष्णो, तू अजन्मा असूनही जगाच्या हितासाठी मत्स्यादि जन्म घेतोस. अनंत रूपांनी पृथ्वीचे भरण करतोस. वेदात वर्णिलेला सहस्र-शीर्षा पुरुष तो तूच आहेस.

२५) तुझ्याच मायेमुळे मूढ बनलेले हे जग बायकामुलांच्या प्रेमात गुरफटत रहाते आणि तुझ्याच चरणांचा आश्रय घेणारा प्रत्येक जीव ही माया तरून पार होतो.

२६) ज्याचे वर्णन करताना अनंत श्रुती सुद्धा मूक होतात, श्रेष्ठ योग्यांची मने सुद्धा पांगळी होतात, त्या तुझ्या श्रेष्ठत्वाची स्तुती करणे, हे विष्णो, मला कसे शक्य आहे ?

२७) सर्व सहन करणारी ही पृथ्वी यवनांचे दुराचार मात्र सहन करू शकत नाही. तेव्हा तिचा दुःखभार तात्काळ दूर करण्यासाठी, हे विष्णो, म्लेंच्छांचा नाश करण्यासाठी प्रयत्न कर.

२८) ब्रह्मदेवाने उच्चारलेले ते शब्द ऐकल्यावर, पृथ्वीच्या दुःख-हरणाविषयी चिंतन करून मंद स्मिताने झळाळणाऱ्या आपल्या मुखाने भग-वान विष्णू गंभीर स्वरात म्हणाला,

२९) या फार मोठ्या कार्यासाठी आपण स्वतःच जाऊन शंकराची नियुक्ती करू या. आपले सर्वांचे हित तोच निश्चितपणे करू शकेल. जगाचे रक्षण करण्यात धुरंधर असा तोच देव आहे.

३०) या राक्षसांचा संहार करण्यास सर्व देवांमध्ये त्याच्याशिवाय दुसरा कोण समर्थ आहे ? अंधाऱ्या रात्रीचा घनांधकार पूर्णपणे दूर करण्यास सूर्याशिवाय दुसरा कोण समर्थ असणार ?

३१) असे बोलून सागरकन्या लक्ष्मीचा हात धरून विष्णू एकदम उठला व गरुडावर आरूढ होऊन इतर देवांबरोबर वेगाने कैलासपर्वताकडे निघाला

३२) आपल्या वेगवान विमानांची आकाशात गर्दी करणाऱ्या देवगणांनी, आपल्या शिखरांनी आकाशाला स्पर्श करणाऱ्या कैलासपर्वताला डोळे विस्फारून व मान पुनः पुनः उंच करून पाहिले.

३३) जो पावसाळ्यात, आपल्या दोन शिखरांवर दाटलेल्या ढगांमुळे, नदीचा तीर शिंगांनी खणताना त्यावर अडकलेल्या शेवाळ धारण करणाऱ्या नंदीप्रमाणे दिसतो.

३४) ज्या ठिकाणी, शंकराच्या मस्तकावरील चंद्राच्या किरणांनी पाझरणाऱ्या चंद्रकान्तांच्या दगडातून वारंवार घसरल्यामुळे मंदगती झालेला वारा स्वतः कमळांच्या ताटव्यात विश्रांती घेऊन लताकुंजात क्रीडा करणाऱ्या देवस्त्रियांचा श्रम दूर करतो;

३५) ज्या ठिकाणी एकान्ताच्या वेळी रत्नखचित भिंतींमध्ये प्रतिबिंब दिसताच कोणीतरी आले अशा शंकेने मुग्ध कामिनी लाजेने आपल्या प्रियकराला रतिक्रीडेपासून दूर करतात;

३६) ज्या ठिकाणी वेळूंमधून निघणाऱ्या श्रुती व तानांनी, लताकुंजात वास करणाऱ्या किन्नरांच्या तानांनी, कोकिलसंघाच्या गोड गायनांनी,

३७) फुलांनी बहरलेल्या बकुलवृक्षांनी, प्रियालवृक्षांनी, आंब्यांवर कूजन करणाऱ्या कोकिळांनी, सालवृक्षांच्या घनदाट गर्दीत गुंजारव करणाऱ्या भृंगांनी, आपल्या माळा घालणाऱ्या तमाल क्षांनी शंकराची सदैव मृदु गायनाने स्तुती केली जाते;

३८) ज्या ठिकाणी किन्नरांनी गायलेली स्तोत्रे ऐकून हरणे, हत्ती, सिंह, अस्वले, लांडगे सर्प इ. वन्य प्राणी मूक होऊन आपापले वैर टाकतात;

३९) अशा त्या लोकांना हर्ष वाटणाऱ्या पर्वताच्या प्रदेशात आपापल्या वाहनातून उतरून नंदीच्या मुखातून शिवाची अनुज्ञा मिळाल्यावर शिवसभेत प्रवेश करून ते सर्वजण आसनावर बसले

४०) ‘ पार्वतीपती शंकरा, शंभो, जगदीशा, शिवा तुझा विजय असो ’ अशी पुन्हा पुन्हा स्तुती करीत, शिवाला वंदन करून, त्याने डोळ्यांच्या खुणेने सांगितल्यावर सर्वजण आपापल्या अधिकाराप्रमाणे आसनावर बसले.

४१) ‘ हे विष्णो, तुझे स्वागत असो. येथे या आसनावर बस, ’ असे म्हणून शंकराने आदराने त्याला बसविले. तेव्हा विष्णू शंकराला वंदन करून नम्रपणे म्हणाला,

४२) जे शिवपद पहाण्यासाठी मी ब्रह्मदेवाशी स्पर्धा करीत वराह-रूप धारण करून पाताळाच्या तळापर्यंत गेलो आणि तरीही ज्याचा मला ठाव लागला नाही, तेच पद आता मी प्रत्यक्ष पहात आहे.

४३) कामविकार निर्माण केले म्हणून मदनाला जाळले पण अति-कामुकपणामुळे स्त्रीचे अर्धे शरीर धारण केले; अंगावर अस्थी धारण करीत असूनही सर्वमंगलांनी अलंकृत अशा विरोधाभासात्मक तुला मी कसा जाणून घेणार !

४४) हे देवाधिदेवा, अत्यंत व्याकुळ झालेल्या या पृथ्वीला यवनशत्रू अत्यंत छळीत आहेत. तेव्हा या म्लेंच्छवर्गांचे काय करावे या विषयीचे तिचे मनोगत ऐक

४५) बलीवर विजय मिळविणाऱ्या विष्णूचे ते बोलणे व पृथ्वीचे ते दु:ख समजून घेतल्यावर शंकर विष्णूला म्हणाला,

४६) हे विष्णो, पृथ्वीच्या सुखासाठी पूर्वी तू रावणादी प्रमुख शत्रूंना नष्ट केले होतेस, तसेच पुन्हा एकदा मनुष्यजन्म घेऊन तूच या सर्वांना ठार मार.

४७) ज्यांचा दुष्टपणा सहन करण्यासाठीच मी कलियुगात बुद्धावतार घेतला त्यांना पुन्हा मीच मनुष्यरूपाने ठार मारणे अयोग्य आहे, असे जर तू म्हणत असशील,

४८) तर त्यांवरही उपाय सांगतो. पृथ्वीवर अवतीर्ण झाल्यावर माझे नांव स्वत.ला घेऊन तू गुप्तपणें, अंशरूपाने अवतीर्ण होणाऱ्या भवानीच्या मदतीने त्यांना खुशाल ठार कर.

४९) या पृथ्वीवर, खूप श्रीमंत म्हणून प्रसिद्ध असलेला, सूर्यवंशी भोसल्यांच्या कुलसमुद्रातून चंद्राप्रमाणे जन्मलेला, श्रीमान् शाहवर्म नांवाचा राजा आहे. त्याने केलेल्या यज्ञातील आहुती ब्रह्मा, विष्णु, महेश सदैव सेवन करीत असतात.

५०) राजा दिलीपाची जशी सुदक्षिणा तशी त्याची अत्यंत आवडती, आदरणीय, सौंदर्यात मदनपत्नी रतीलाहीं जिंकणारी साध्वी, सुलक्षणा अशी जिजू नावाची पत्नीं आहे.

५१) तू या शाहराजाच्या पत्नीच्या ठिकाणीं मनुष्यजन्म घेऊन म्लेंच्छांचा नाश करण्यासाठीं भूमीवर खुशाल संचार कर आणि वर्णधर्माची पुन्हा एकवार स्थापना कर.

५२) जगात धर्माची हानी होईल तेव्हा मीं जन्म घेईन असे गीतेत तू पूर्वीच अर्जुनाला वचन दिले आहेस. तेव्हा त्याप्रमाणे करावयाच्या या कामात तू आता विचारही करू नकोस.

५३) 'ठीक आहे' असे म्हणून शंकराची आज्ञा प्रमाण मानून आनंदित झालेल्या विष्णूने इतर सर्व देवांना पाठवून दिले व शंकराला प्रणाम करून स्वतःच्या घरी तो निघून गेला.

५४) नंतर शाहराजाच्या पत्नीने, आपल्या फिकट चेहऱ्यावरून सूचित होणारे, यवनरूपी अंधाऱ्या रात्रीचा नाश करणारे, विष्णूचे तेज, पूर्व दिशेने चंद्र धारण करावा तसे गर्भात धारण केले.

५५) नंतर तिने पृथ्वीच्या मनातील शल्य दूर करणाऱ्या, इंद्राच्या जयन्ताप्रमाणे अंगकांती असणाऱ्या मुलाला शुभसमयी जन्म दिला.

५६) आणि त्या जगन्नाथ विष्णूचा पृथ्वीवर जन्म होताच दुंदुभी वाजू लागल्या, देवांगना हर्षाने नाचू लागल्या, चारणांनी फुलांची सतत वृष्टी केली, विद्याधर व किन्नर गोंड गायन करू लागले, सूर्य अधिकच तळपू लागला व सर्व बाजूंनी थंडगार वारे वाहू लागले.

५७) पित्याने सर्व संस्कारकर्मे करून शिव असे पवित्र नांव ठेवलेला तो मुलगा जनतेच्या आनंदाबरोबरच आपल्या सौष्ठवपूर्ण शरीराने चंद्रासारखा वाढू लागला.

५८) आपल्या भावी दिग्विजयाचे सूचन करण्यासाठीच की काय नकळे पण बालपण हळुहळु मागे टाकीत जाणारा शाहराजपुत्र आपल्या विशाल छातीने दारांच्या झडपांना, खांद्यांनी बैलांच्या वशिंडाना व हातांनी गाडीच्या जोखडांना मागे टाकू लागला.

५९) त्या अत्यंत सुंदर कुमाराला पूर्वीच आपल्या नेत्रकमलांच्या माळांनी वरले असूनही अनेक राजकन्यांनी पुन्हा एकदा त्याला मधाने भरलेल्या मधूक (मोहाच्या) फुलांच्या माळांनी वरले.

६०) विवाह झाल्यानंतर आपल्या पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून, ब्राह्मणांनी विजयदायी अशी स्वस्तिवचने उच्चारून आशीर्वाद दिलेला तो आपल्या सैन्यासह, निशाणांच्या आवाजांनी सर्व दिशांना बधिर करून टाकीत, यवनांनी व्यापलेल्या सर्व दिशांना जिंकण्यासाठी स्वारीवर निघाला.

६१) त्याच्या दौडत जाणाऱ्या घोड्यांच्या टापांनी उकरल्या जाणाऱ्या जमिनीवरील धूळ इतकी उसळली की सूर्यबिंब झाकून जाऊन देव मानवांना आश्चर्याचा धक्काच बसला. दातओठ खात धावून येणाऱ्या यवन वीरांच्या मस्तकांचा आणि तलवारीच्या प्रहाराने गंडस्थळ फुटल्याने त्यातून बाहेर पडणाऱ्या मोत्यांचा त्याने रणांगणावर खच पाडला.

६२) त्याच्या तलवारीने मस्तके तुटल्यावर सुद्धा उन्मत्त अशा प्रमुख शत्रुवीरांची धडे रणांगणावर नाचत राहिली व भाल्यांनी तुटून वर उडणाऱ्या मस्तकांनी आकाश व्यापून गेले. ते पाहून आपणास गिळायला राहुकेतूंचे तांडेच गोळा झाले की काय या भीतीने सूर्याने वासलेले तोंड शत्रुसैनिकांना स्वर्गात जाण्यासाठी प्रवेशद्वारच ठरले.

६३) नंतर दिल्लीपतीचे अफाट सैन्य हेच ज्यातील चहुबाजूंनी उसळणाऱ्या लाटा आहेत, बेफामपणे धाऊन येणारे हत्तीघोडे हे ज्यातील मकर इ. भयंकर जलचर आहेत असे अनेक रणसागर त्याने तळपणारी तलवार धारण करणाऱ्या आपल्या हातांच्या रवीने घुसळून काढून अनेकदा विजयलक्ष्मी हस्तगत केली.

६४) आपल्या शिव या नांवाचा अर्थ योग्य रीतीने जाणणाऱ्या त्या शिवाजीने आपले निवासस्थान निर्माण करण्यासाठी कैलासपर्वताप्रमाणे अभेद्य अशा दुर्गांची माळच निर्माण केली.

६५) आपल्या पराक्रमाने चारही दिशा एकामागून एक जिंकून, सर्व म्लेंच्छांचा संहार करून आपले मनोरथ पूर्ण झालेला तो शिवाजी पृथ्वीचे राज्य करू लागला.

६६) चिंचवड गावात रहाणारा, गणेशाच्या कृपेने सिद्धी मिळविणारा, सर्व बुद्धिमंतांमध्ये श्रेष्ठ असणारा असा जो नारायण महानुभाव त्याच्याकडून सार्वभौम शिवाजीला अनुग्रह प्राप्त झाला.

६७) मुग्दलवंश-सागरातून चंद्राप्रमाणे जन्मलेले काही ब्राह्मण त्या शिवराजाचे कुलपरंपरेने अमात्य होते.

६८) त्यांच्यामध्ये त्रिमल्ल नांवाचा आपल्या रणकर्माविषयी प्रसिद्ध असलेला, युद्धात सदैव आघाडीवर असलेला एक वीर होता. त्याचे वंशज त्याने आपल्या पराक्रमाने मिळविलेले हनुमत् (हणमंते) हे नांव धारण करतात.

६९) त्याचा (त्रिमल्लाचा) बुद्धिमान व यज्ञयाग करणारा नारायण नांवाचा मुलगा होता. त्याच्या कीर्तीरूप राजहंसाला कोंडायला अखिल विश्व पिंजरा बनले होते.

७०) तो (नारायण) ब्रह्मानंदाचा अनुभव घेण्यात जनकराजासारखा होता. ब्राह्मणांनी करावयाची षट्कर्मे त्याच्या रूपाने जणु अवतरली होती. आपल्या दानशूरपणाने त्याने कामधेनू, चिन्तामणी, कल्पवृक्ष, कर्ण यांनाही थक्क करून टाकले होते.

७१) त्याच्या (नारायणाच्या) यज्ञात विधिपूर्वक अर्पण केलेल्या आहुती सर्व देव अमृताला बाजूला सारून मोठ्या आवडीने स्वीकारीत असत आणि मंत्रोच्चाराने पवित्र झालेला सोम चंद्रकलेतील सोमाचा त्याग करून पीत असत.

७२) हा (नारायण) म्हणजे देवगुरु बृहस्पतीची प्रतिकृती तर नाही ना ? किंवा हा दधीचीचा प्रतिनिधी तर नव्हे ना ? हा विश्वामित्राचा अवतार आहे का ? सर्व देवांच्या गुरुचा हा दुसरा पर्याय तर नाही ? हा व्यास तर नाही ? किंवा अत्रि ऋषींची प्रतिकृति नव्हे ना ? हा वशिष्ठांचा अवतार तर नव्हे ? अशासारखे तर्क विद्वान सुद्धा त्याच्या (नारायणाच्या) अद्भुत चारित्र्याकडे पाहून करीत असत.

७३) शुद्ध चारित्र्याच्या अशा या नारायणाचा सन्मार्गी, शुद्धाचरणी, कलापारंगत असा रघुनाथ नांवाचा, समुद्राचा ज्याप्रमाणे चंद्र, त्याप्रमाणे एक मुलगा होता.

७४) बुद्धिमान त्याच्या (रघुनाथाच्या) गुणांचा गौरव करीत. याचकांच्या आशा त्याने द्रव्याने पूर्ण केल्या होत्या. आपल्या धवल यशाने त्याने सर्व दिशा उजळल्या होत्या. वैऱ्यांचा नाश केला होता. त्याचे वर्णन कां बरे न करावे ?

७५) याचकांनी इच्छिलेले दान देण्याचे दृढव्रत घेऊन त्याने सर्व जगाला इतके संतुष्ट केले होते की पृथ्वीकडे पहाण्याची लाज वाटून कामधेनू आपले तोंड मेघांच्या आड लपवीत होती.

७६) नारायण ज्याचा पिता व जो संपत्तीचा संग्रह करणारा आहे तो (रघुनाथ) बलवान शत्रूंना नमविल्याशिवाय कसा राहील ?

७७) नारायणापासून जन्माला येऊनही जो (रघुनाथ) शिवाच्या (शिवाजीच्या) मनात स्थान मिळवू शकला त्या कविश्रेष्ठ रामाची (रघुनाथाची) बरोबरी कोणताही भाडोत्री कवी करू शकणार नाही.

७८) ज्याच्या सल्लामसलतीने (किंवा मंत्रबळामुळे) शिवराजाने कर्नाटकातील राजे, हैद्राबादचा (भागनगरचा) राजा जिंकून क्रमाक्रमाने सर्व पूर्व दिशा जिंकली, आसेतु पसरलेले यवनसंघ नष्ट करून टाकले, त्यालाच (रघुनाथालाच) त्या शिवसम्राटाने तेथे राज्यरक्षणकर्ता अमात्य म्हणून नेमले.

७९) ते (पूर्वेकडील) राज्य याच्यावर (रघुनाथावर) सोपवून शिवछत्रपती राजगिरीवर (रायगडावर) निघून गेल्यावर धार्मिक अशा त्याने (रघुनाथाने) अनेक ब्राम्हणांना उपजीविकेची साधने देऊन त्यांचा प्रतिपाळ केला.

८०) ज्या शोणाचलपतीचे (तिरुवन्नमलाई येथील समोत्तिपेरुमल मंदिर, अरुणाचलम्) निवासस्थान यवनांनी दीर्घकाळ उध्वस्त केले होते, ते पुन्हा एकदा विधिपूर्वक स्थापन करून (रघुनाथाने) श्रीमुष्ण (भूवराहस्वामी), वृद्धगिरी (वृद्धाचलम् येथील महादेव), रुक्मसभाधिप (चिदंबरम् येथील नटराज) या देवांचे पूजोत्सव सुरू केले व त्यामुळे आपली कीर्ती वाढवली.

८१) या पृथ्वीतलावरून म्लेंच्छांचा पूर्ण उच्छेद केल्यानंतर सूर्यवंशाला ललामभूत ठरलेल्या त्या छत्रपती शिवाजीने यवनांच्या भाषेने लोपून गेलेल्या राज्यव्यवहार पद्धतीचा संस्कृतभाषेतून प्रसार करण्यासाठी (रघुनाथ) पंडिताची नियुक्ती केली.

८२) अशा रीतीने मूर्धाभिषिक्त छत्रपती शिवाजीने दिलेली आज्ञा मस्तकावर धारण करून श्रेष्ठ अमात्य रघुनाथ हा राजव्यवहारकोश रचित आहे.

८३) विशिष्ट हेतूने वापरलेली म्लेंच्छभाषा या ठिकाणी संस्कृत भाषेला दूषित करीत नाही. रत्ने जडविण्यासाठी लाखेचा नाही का उपयोग करावा लागत ?

८४) विद्वानांची मान्यता लाभल्यावर, मूर्खांनी या कोशाची कुचेष्टा केली म्हणून काय होणार ? उंटाला कधी गोड केळी आवडतात का ?

१) राजवर्गः ।

॥ श्री महागणेशाय नमः ॥

राजा ज्ञेयः पादशाहः स्वामी साहेब ईरितः ।
अन्तःपुरं तु दरनीत्याहुर्यवनभाषया ॥ १ ॥
युवराजा परिज्ञेयो वलीयहद नामकः ।
शाहजादा राजपुत्रः प्रधानः पेशवा तथा ॥ २ ॥
अमात्यः स्यान्मजुमदारः सेनाकर्ता हुकूमतः ।
प्रवीणस्तु दबीरः स्यात्सुरनीसः सचिवस्तथा ॥ ३ ॥
वाकेनीसोऽपि मंत्री स्यान्न्यायाधीशोप्यदालतः ।
कारमुल्की तु सुमन्त्रः स्यात्सभासत्स्यान्मजालसी ॥ ४ ॥
उपद्रष्टा तु नाजीरो दाता नाम सखी मतः ।
सरखेल इति तु प्रोक्तः कार्यस्थानाधिकारिकः ॥ ५ ॥
सन्देशलेखकश्चिटणीसो दूतो हेजीब नामकः ।
सौंदागरस्तु धनिकः कारभारी कार्यपूरुषः ॥ ६ ॥
सबनीसस्तथा सेनालेखकः परिकीर्तितः ।
पदातिलेखकः पांवसबनीस इतीरितः ॥ ७ ॥
पाककर्मी मुतालीको गुरुः पीर इतीरितः ।
शिष्यो मुरीद नामा स्यात् सिद्धो वल्लीति शब्दितः ॥ ८ ॥
अफताब इति सूर्यः स्यात् महताबस्तु चन्द्रमाः ।
आतश्नाम भवेदग्निर्वायुर्बाव इतीरितः ॥ ९ ॥
जलमाब इति प्रोक्तमास्मानाकाशमीरितम् ।
मेघो बादलनामा स्याब्दिजली विद्युदुच्यते ॥ १० ॥

दुर्दिनं स्यात्बदहवा मेहुः पर्जन्य उच्यते ।
ऋषिः पैगंबरो ज्ञेयो योगीशस्तु कलन्दरः ॥ ११ ॥

योगी फकीर इत्युक्तः काजी पण्डितनामकः ।
मुल्ला भट्टः परिज्ञेयो नुजुमी ज्योतिषस्तथा ॥ १२ ॥

सर्पदारश्चोपदारो वेत्रदण्डधरौ क्रमात् ।
स्यादन्तर्द्वारपालस्तु हरबंकी प्रकीर्तितः ॥ १३ ॥

दौलद्बंकी महाद्वारपाल इत्यभिधीयते ।
सर्खवासोऽप्यनुचराधिकारीति निगद्यते ॥ १४ ॥

हुजुरी स्यात्संनिहितोऽनुचरस्तु महालदार ।
हरकारा सर्वकारी स्यादफरादः परिचारकः ॥ १५ ॥

चाकरः सेवकः प्रोक्तो नफरः किंकरः स्मृतः ।
वेगलवारो वेगचारो जासूदश्चारनायकः ॥ १६ ॥

प्रणिधिश्चोरजासूदः खोजा सौविद उच्यते ।
वार्ताहरो बखैरदारः परिचर्या तु खिज्मति ॥ १७ ॥

गुप्तकारी तथा चोरहरकारा प्रकीर्तितः ।
कौशबार्दारः पादरक्षाधर इत्यनुवर्ण्यते ॥ १८ ॥

कलाचीधारकः पीकदानीबार्दार ईरितः ।
अफ्तागिन्या त्वातपत्रधरः छत्रधरस्तु यः ॥ १९ ॥

स छत्र्या चामरधरश्चौरीबार्दार उच्यते ।
तर्कश्बार्दार इति यः स तु तूणधरः स्मृतः ॥ २० ॥

धनुर्धरः कमानदारो बंकी तु द्वारपालकः ।
पताकाधर इत्येव विज्ञेयश्च निशानदार ॥ २१ ॥

मोर्तब्बार्दार इति च ज्ञेयो ध्वजधरो बुधैः ।
माहीदारस्तु मकरध्वजी दीपधरास्तु ते ॥ २२ ॥

दिवटचे स्युर्हिलाली तु प्रदीपधर उच्यते ।
दीपिका दिवटी प्रोक्ता हिलालस्तु प्रदीपकः ॥ २३ ॥

यस्तु तख्तहवालदारः स सिंहासनपालकः ।
चतुष्पदी तु चौरंगश्चौकी त्वासन्दिका मता ॥ २४ ॥

गुलाम बंदा फर्जंदा दास-चण्ड-प्रचण्डकाः ।
नेजदारः कुन्तधरः तख्तं सिंहासनं स्मृतम् ॥ २५ ॥

पलंगो मञ्चकः छप्रपलंगो मञ्चमण्डपः ।
दोला नाम तु दोल्हारा तस्तं गण्डूषपात्रकम् ॥ २६ ॥

पीकदानी नामनी द्वे पतद्ग्रह-कलाचिके ।
दीपशाखा तु समई पिलसोजः स्तंभदीपकः ॥ २७ ॥

दीपश्चिराग सेखचिरा तु ज्ञेयो रोपणदीपकः ।
स्यादन्तरालदीपस्तु खंदील इति नामतः ॥ २८ ॥

उत्सोजः स्याद्धूपतरुः उद्दानी धूपपात्रकम् ।
मैणकोशस्तु मोम्दानी मोम्बत्ती मैणवर्तिका ॥ २९ ॥

शिबिका पालखी डोली सुखासनमिती द्वयम् ।
तुल्यं भाषाद्वये दीपनीडं स्याद् बाजशान् इति ॥ ३० ॥

विलासो मौज नामा स्यात् गोशा त्वन्तःपुरस्थितिः ।
स्त्रीजातिस्तु जनानी स्यान्मर्दो पुरुष ईरितः ॥ ३१ ॥

दृष्टिप्रियस्तु नूरचश्म गायकस्तु गुनीजनः ।
कलावंताभिधा वेश्या मेहरी वनिता मता ॥ ३२ ॥

नाटचस्त्री सुरताभिख्या स्वरूपं शंबनी स्मृतम् ।
उष्णं तु गरमं शीतं ठंडा स्वेदस्तु खोय् स्मृतः ॥ ३३ ॥

॥ ति श्रीमन्नारायणाध्वरिवरसूनुना शिवछत्रपतिप्रिया-
मात्येन विरचिते व्यवहारकोशे राजवर्गः समाप्तः ॥

२) कार्यस्थानवर्गः ।

कार्यस्थानं तु कारखाना नामतः परिभाषितम् ।
कोशागारं खजाना स्याज्जामदारः कोशरक्षकः ॥ १ ॥

यस्तस्य तु हवालदारः कोशपालः स ईरितः ।
सर्वाधिकारिकः प्रोक्तः सरहवालदार नामतः ॥ २ ॥

निक्षेपस्तु दफीना स्यात् दास्तानं संचितं स्मृतम् ।
व्ययस्थानं खर्चपोते तदीयस्तु हवालदार ।। ३ ।।

व्ययाधिकारी तस्यैव जामदारो व्ययकिंकर: ।
तत्रत्यो निर्विशिदा यः स भवेत् व्ययलेखक: ।। ४ ।।

पोतदारो नाम बुधै: ज्ञेयो द्रव्यपरीक्षक: ।
द्रव्यं तु नख्तसंज्ञं स्यात् वराहो होन उच्यते ।। ५ ।।

तदर्धं तु प्रताप: स्यात्भाषयोरुभयोरपि ।
वराहपादो धरणश्चवलस्त्वष्टमांशक: ।। ६ ।।

दुवल: षोडशांश: स्यात् मोहरा तु बुधै: स्मृतम् ।
सुवर्णनिष्कं रजतनिष्कं स्याद्रुपयाभिधम् ।। ७ ।।

वाच्या रजतवर्ती तु लाहरी फलम: पण: ।
ताम्रद्रव्यं तु खुर्दा स्यात् बस्तनं बन्धनं स्मृतम् ।। ८ ।।

कर्दनं तु परिज्ञेयं त्रोटनं सूक्ष्मदृष्टिभि: ।
रत्नशाला जवाहीरखाना तस्य हवालदार ।। ९ ।।

रत्नाधिकारी जामदारो रत्नभृत्य: प्रकीर्तित: ।
भवेद्रत्नपरीक्षस्तु जोहारी भूषणं नग: ।। १० ।।

तुरावतंस: पदकं ज्ञेयं वै कतकाभिधम् ।
ग्रैवेयकं धुगधुगी स्यात् कूडिका कर्णकुण्डलम् ।। ११ ।।

सिस्फुलं तु शिर:पुष्पं भाङ्टिला तु ललामकम् ।
तिलक: स्यात् बिजवरा नासापुष्पं तु बेसरम् ।। १२ ।।

नासामणिर्नथो मुक्ताफलं मोतीफुलीती तु ।
नासापुष्पं बाहुमणिर्बाजूबंदाभिधायक: ।। १३ ।।

अंगदो तोलबंद: स्यात् मणिबन्धस्तथा जवे ।
पहूच्या स्यान्मणगटचा मुद्रिका त्वंगठीमुदी ।। १४ ।।

शस्तमगुष्ठकं हस्तकडे स्यात् हस्तकङ्कणम् ।
कर्णिका स्यात्तानवडे वांकी कूर्परभूषणम् ।। १५ ।।

तथा मोहनमाला तु ज्ञेया प्रालंबिका बुधै: ।
कटिसूत्रं जरकमरो घुंगुरु: किंकिणी स्मृता ।। १६ ।।

जंजेरिया शृंखलिका पैंजणं नूपुरं स्मृतम् ।
पोल्हारा तु तुलाकोटिर्वाला हंसकनामक: ॥ १७ ॥
हिरा तु वज्रं माणिक्यं लालो नील: समो द्वयो: ।
पाचिर्गारुत्मकमणि: पुष्पराग: समो द्वयो: ॥ १८ ॥
स्यात् वैदूर्य लसणिया गोमेदोऽप्युभयो: सम: ।
गुली नाम प्रवाल: स्यात् बिलोर: स्फटिको भवेत् ॥ १९ ॥
हुमा मौक्तिकनामा स्यात् कल्गी पक्षावतंसक: ।
काचसारस्तु मोना स्यात् सफाय: काच ईरित: ॥ २० ॥
जरखाना स्वर्णशाला सुवर्णं जर नामकम् ।
रौप्यं रुपा तथा ताम्रं तांबा पित्तलकं पितल ॥ २१ ॥
स्यात्संगबसरी धातुर्विशेषो रसकाभिध: ।
कांसे कांस्यं सिसे शीसं कथिलं वंगमुच्यते ॥ २२ ॥
कालायसं तु पोलाद: स्याल्लोहं उभयो: समम् ।
जामदारखाना तु वसनागारं तस्य हवालदार ॥ २३ ॥
वस्त्राधिकारी तत्रस्थो जामदारो वस्त्ररक्षक: ।
निर्विशिदा त्वस्य वस्त्रलेखक: परिकीर्तित: ॥ २४ ॥
शिरोवेष्टनमित्येतत् मुंडासा कंचुकं झगा ।
मंदिलं नाम विज्ञेयमुष्णीषं स्वर्णरौप्यजम् ॥ २५ ॥
कटिबन्ध: कमरबन्दो विजारुर्ध्वमुखी भवेत् ।
चादर: स्यात्प्रावरणी निचोलो दुतु नामक: ॥ २६ ॥
कार्पासकंचुको नाम डगला पांथकञ्चुक: ।
ज्ञेय: फतू नाम बुधै: कुड्ती कूर्परकञ्चुक: ॥ २७ ॥
थिरमा पार्वतीयोर्णा पल्लोदारस्तु पल्लवी ।
सलायीं तु सलाकी स्यान्माना मध्यम ईरित: ॥ २८ ॥
किनारा तु प्रदेश: स्यात् कस्बी हेमगुणान्वितम् ।
सौवर्णतान्तवं नक्दी पटेदारस्तु रेखित: ॥ २९ ॥
भर्जरी स्वर्णभरितं गंधाली चर्मपोस्तनी ।
ऊर्णावस्त्रं तु शाला स्यात् शशोर्णं तोशनामकम् ॥ ३० ॥

दुर्मा तु राङ्कवं ज्ञेयं सखलाद् द्वीपकम्बला ।
इन्द्रगोपस्तु मखमल तापत्ता कौशेयनामकः ॥ ३१ ॥

सोनेरीनिलखः स्वर्णपटो रौप्यपटस्तथा ।
रुपेरीनिलखः छीटं चित्रवस्त्रमुदाहृतम् ॥ ३२ ॥

यद् बुटेदारनिलखः स पुष्पितपटः स्मृतः ।
पुष्पितोर्णा चिकंदोजीशालाख्या परिभाषिता ॥ ३३ ॥

खिसा तु गोपकमुपावरणं दुपटा भवेत् ।
पासोडी द्विपटी ज्ञेया साडी स्त्रींवसनं तथा ॥ ३४ ॥

अन्तरीयं तोहबंदश्चोली कूर्पासनामिका ।
पाटावू चित्रकौशेयं दुकूलं मुकटा मवेत् ॥ ३५ ॥

गोशपेचः कर्णबन्धः स्यात् दुस्ता स्याद्वस्त्रपंचकम् ।
नीशार नाम फर्गोलो वराशिर्वुरुखा तथा ॥ ३६ ॥

तोसदानं जीवनकं संदूकस्तु समुद्गकः ।
समूरुचर्म गदितं सामरं नाम कोविदै ॥ ३७ ॥

ज्ञेयं सुवासचर्मेति बुलगाराभिधानकम् ।
तिमाचाविकचर्म स्यात् बस्तुनिर्माण नाम तु ॥ ३८ ॥

रासकरदनमित्युक्तं बेतणी रूपिकाभिधा ।
भवेदरत्निमानं तु गजमजू तूल आयतिः ॥ ३९ ॥

भवेदर्जस्तु विस्तारो व्यरत्निर्गज ईरितः ।
अरत्नि स्यादर्धगजः तसू व्यंगुलमुच्यते ॥ ४० ॥

पूर्वभागः पृष्ठभागः कञ्चुकस्य क्रमात्स्मृतौ ।
पेशपीठौ तथा जेहेपटी कण्ठपटी भवेत् ॥ ४१ ॥

अस्तनी नाम बाहा स्यात् दुटा बाहुकमुच्यते ।
बाहामुखं मोहलं स्यात् खपवा पार्श्वकं विदुः ॥ ४२ ॥

दौगोदाणवमित्येतत् द्वयं परिकरः स्मृत ।
तख्ताखण्डः कशाबंधश्चीनः स्यात्कटिकूर्चनम् ॥ ४३ ॥

प्रान्तस्यूतं तु नेफा स्यात् मोटा तु स्थूलमुच्यते ।
सूक्ष्मं बारिकनामा स्यात् श्लक्ष्णं नरम नामकम् ॥ ४४ ॥

पलंगपोस इति यः स प्रच्छदपटः स्मृतः ।
कौशेयजातं नर्मीना वस्त्रजातं तु कापडम् ॥ ४५ ॥

ऊर्णाजातं तु पश्मी स्यात् सोख्ता नाम पटच्चरम् ।
आच्छादकस्तु सरपोशो वसला चेलखण्डकः ॥ ४६ ॥

॥ इतिश्रीमन्नारायणाध्वरिवरसूनुना शिवछत्रपतिप्रियामात्येन
रघुनाथपण्डितेन विरचिते राजव्यवहारकोशे
कार्यस्थानवर्गो द्वितीयः ॥

३) भोग्यवर्गः ।

अथ पाकालयं मुद्बख्खानेति परिभाषितम् ।
मुद्बखी पाककारः स्याच्चासणीकार नाम तु ॥ १ ॥

रुचिकारः पाकपरीकर्मी तु स्यात् दवादवी ।
रसोयी स्यात् रसवती कन्दोरी त्वन्नमुच्यते ॥ २ ॥

आब्दारखाना जलस्थानं सक्का तु जलदः स्मृतः ।
पशुभस्त्रा पखालः स्यात् मशकं मेषमस्त्रिका ॥ ३ ॥

डोलो जलहरश्चर्मभृंगारः छगलः स्मृतः ।
अस्तावा नाम भृंगारी कुजा कर्करिका मता ॥ ४ ॥

आडे नाम तुला प्रोक्ता कुजदानमुदपंजर ।
आडेकरी तुलावाहः पखाली जलवाहकः ॥ ५ ॥

हौद नाम तटाकः स्यात् दीर्घिका बाविनामिका ।
हौदखाना निपानं स्यात् कूपो नाम भवेत्कुवा ॥ ६ ॥

सुधास्थानं तु शरबत्खाना तस्य हवालदार ।
सुधाकारः परिज्ञेयः मेवा स्यात् खाद्यवस्तूनि ॥ ७ ॥

फलजातं तु तरमेवा भंग नाम कलिंजकम् ।
काहवा नाम विश्रामकषायः परिभाषितः ॥ ८ ॥

अफीम नामाहिफेनः स्यात् अवलेह्यं तु मोरबा ।
